
ज्ञानगंगा घरोघरी

सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित


# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले)




# यशोगाथा

# यशोगाथा



जयदेव ठाकूर

## ऐंशीत पदवी मिळविणारा तरुण...(?)

शिक्षणावरील दृढ विश्वास आणि परिस्थितीवर मात करीत ते ग्रहण करण्याची जिद्द असेल तर वयाची अडचणही आड येत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, जयदेव किसन ठाकूर वय वर्षे ८०. वयाच्या एषंशिव्या वर्षीही जिद्दीने पदवी शिक्षण घेणाऱ्या जयदेव ठाकूर यांची शिक्षण निष्ठा तरुणांनाही लाजवेल अशीच आहे.

नुकतीच त्यांनी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एचपीटी महाविद्यालयातून पदवीची परीक्षा दिली. वयाच्या साठीनंतरचे वय म्हणजे, थकलेले असताना आधाराची गरज भासणारे वय. मात्र वयाच्या ऐंशिव्या वर्षी तरुणाच्या बरोबरीने शिक्षणाची आस लागलेल्या जयदेव आजोबांची शिकण्याची जिद्द पाहिल्यावर त्यांना आजोबा तरी कसे म्हणावे, हा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही, उलट लेक्चरला दांडी मारणाऱ्या तरुणाईने त्यांच्या शिक्षणाविषयीच्या जिद्दीचे अनुकरण करावे, असेच हे उदाहरण ठरावे.

धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे ७ जानेवारी १९३३ ला जयदेव ठाकूर यांचा जन्म झाला. वयाच्या दहाव्या वर्षीच वडिलांचे निधन झाल्याने त्यांना चरितार्थाच्या शोधात मुंबईत जावे लागले. मजुरी करता करता शिक्षणही सुरू ठेवले. काही दिवसांनंतर नाशिकला टपाल खात्याच्या मुख्यालयात त्यांना नोकरी मिळाली. दिवसभर टपाल विभागात कामकाज करताना त्यांनी रात्रशाळेत जाऊन शिक्षण सुरू ठेवले. रात्रशाळेतील शिक्षण म्हणजे केवळ औपचारिकता न करता अकरावीला बोर्डात पहिला वर्ग (फर्स्ट क्लास) मिळविला.

पूर्वी अकरावीला बोर्ड असल्याने बोर्डात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर टपाल खात्यात लिपिक झाले. शिक्षणावरील दृढ विश्वास आणि ते ग्रहण करण्याच्या जिद्दीच्या जोरावर वायरलेस इन्स्पेक्टर, असिस्टंट पोस्ट मास्तर, सुपरवायजर अशा एकेक पायऱ्या चढत राहिले. मात्र कामाचा वाढता व्याप आणि कुटुंब प्रपंचाच्या जबाबदारीमुळे पुढे शिक्षण घेणे जमेना. अर्ध्यावरच शिक्षण राहिले. मुलांच्या जबाबदाऱ्या वाढल्या. मुले नाशिकलाच स्थायिक झाली. कष्टाचे जगणे सार्थकी लागल्यानंतर निवृत्तीच्या निवांत आयुष्यात वाचनाशी गट्टी जमवीत श्री. ठाकूर यांच्या मनातील सुप्त इच्छेला चालना देणारी एक बातमी त्यांच्या वाचनात आली.

१९७५ पूर्वी जुन्या एसएससी झालेल्यांना प्रथम वर्षाला प्रवेश मिळेल अशा आशयाची ही बातमी वाचल्यानंतर त्यांच्यातील विद्यार्थी पुन्हा जागा झाला. पदवी पूर्ण करण्याच्या अपुऱ्या राहिलेल्या स्वप्नाच्या पूर्तीसाठी पुन्हा ठाकूर आजोबा कामाला लागले. दुसऱ्याच दिवशी प्रवेश घेत पुन्हा अभ्यास सुरू केला. प्रथम वर्षाच्या परीक्षेत ५१ टक्के गुण मिळवून उत्तीर्णही झाले. कॉलेज करताना नियमितपणे लेक्चरला जायचे. नातवांच्या वयाच्या वर्गमित्रांसोबत आणि घरी नातीसोबत रात्रीचे जागरण करून अभ्यास करायचे.

# यशोगाथा



स्वाती वानखेडे

## एकच ध्येय, शिकणे आणि शिकवणे

नदीतून जीव धोक्यात घालून शाळेत जायचे, ओले कपडे बदलून ज्ञानदान करायचे. रोजचा जिद्दीने धोकादायक प्रवास करताना आदिवासी पाड्यावर शिक्षण उपक्रम राबवायचे. त्यानंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी एक विद्यार्थिनी होऊन स्वतःलाही अधिकाधिक समृद्ध करायचे. विशेष म्हणजे हे सगळे स्वतःचे कुटुंब सांभाळून जिद्द असल्याशिवाय कुणी करूच शकत नाही. अशाच या जिद्दीचे नाव स्वाती रामराव वानखेडे...

शिक्षिकेची नोकरी म्हणजे तारेवरची कसरतच... कुटुंब सांभाळून ज्ञानदानाचा आनंद वाटताना विद्यार्थी घडविण्यात सोयीची शाळा मिळाली तर आनंद द्विगुणित होणार. पण घरापासून दूर दळणवळणाची साधनही नसतील अशा एखाद्या आदिवासी वाड्यापाड्यावर नोकरी असेल तर कुठल्याही महिला शिक्षिकेच्या दृष्टीने हा चिंतेचाच विषय. मात्र या अडचणीतही सामाजिक बांधिलकीतून रबरी ट्यूबवरून नदीतून प्रवास करीत एखादी शिक्षिका ज्ञानदानाचे कर्तव्य निभावत असेल तर, अशा उच्च कर्तव्यनिष्ठेला सलामच केला पाहिजे.

नाशिकपासून वीस किलोमीटर अंतरावरील शेरपाडा येथील त्यांची ही नोकरी म्हणजे कसोटीचा काळ. शाळेत जाण्यासाठी नदी पार करून जावे लागे. अशा ठिकाणी नेमणूक झाल्यानंतर मोठ्या जिद्दीने पाण्यातून चालत, काही वेळा रबरी ट्यूबचा आधार घेत त्यांनी त्यांच्यातील जिद्दीचे आणि शेरपाडा गावाचेही नाव जागतिक स्तरावर पोहचविले. रबरी ट्यूबचा वापर करीत, तरंगत, पोहत जाऊन ज्ञानदान करणारी पहिली महिला शिक्षिका म्हणून लौकिक मिळविला. नदीतून प्रवास केल्यानंतर ओले कपडे बदलून मग वर्गात शिकवायचे ही रोजची कसरत करताना दोन एक साड्या शाळेच्या कार्यालयातच त्या कायम ठेवीत.

पावसाळ्यात अडचणी आणखी वाढत. नदीचे पाणी डोक्यावरून जायचे. नदीतून प्रवास करण्यासाठी इतर गावांप्रमाणे येथे होडी, तराफा किंवा बोटीसारखी कुठलीच सुविधा नसल्याने मग ट्रकच्या चाकाचे रबरी ट्यूबमध्ये हवा भरून पाण्यात पाय मारत त्यांना नदी पार करावी लागायची. जीव धोक्यात घालून रोज दिवसातून दोनदा शाळा गाठायची विद्यार्थ्यांना शिकवायचे, नदीतून पुन्हा घरी परतायचे असा हा सगळा प्रवास म्हणजे दिव्यच. मनात जिद्द असल्याशिवाय कुठलीही महिला शिक्षिका एवढे कष्ट करूच शकत नाही. या जिद्दीचे दर्शन स्वाती वानखेडे यांच्या वाटचालीत दिसले.

### प्रयोगशीलता ही खासीयत

स्वाती वानखेडे यांचे मोठेपण नदीतून जीव धोक्यात घालून ज्ञानदान करण्यापुरते मर्यादित नाही. रोजचा असा धोकादायक प्रवास करताना आदिवासी पाड्यावरील शाळेत अक्षरदिंडी, अक्षरगुढी, शारदोत्सव, दत्तक पालक योजना, सावित्रीचा वर्ग, गीताई पठण, अक्षरशाळा, दिवाळीत अक्षरपणती असे एकाहून एक उपक्रम राबवीत आदिवासी पाडा साक्षर करण्याचे प्रयत्न केले. झोकून देत, ज्ञानदान करताना स्वतःतील शिक्षणाची ऊर्मीही कायम ठेवली.

समाजानेही स्वातीताईंच्या या जिद्दीची दखल घेतली. २००७ मध्ये राज्य शासनाच्या सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिकेसह अनेक पुरस्कार लाभले. नाशिक शहरात वास्तव्याला असलेल्या स्वाती वानखेडे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका आहेत. नेमणूक झाल्यापासून त्यांनी जिल्ह्यातील आदिवासी-ग्रामीण भागात नोकरी केली. मनासारखे व सोयीचे ठिकाण मिळविण्यासाठी कुठलीही तडजोड न करता मिळेल त्या ठिकाणी परिस्थितीशी जुळवून घेतले. परिस्थितीशी संघर्ष करताना प्रसंगी अनेक अडचणी आल्या पण त्यावर मात करीत या जिद्दी शिक्षिकेने शिक्षणावरील श्रद्धा आणखी बळकट केली.

# यशोगाथा

## कविता ठोणगे

### ध्येयनिश्चितीमुळे यश

ग्रामीण भागातील मुली उच्च शिक्षणात मागे असतात. पोलिस किंवा सैन्य दलातील भरतीचे त्यांना एकप्रकारे वावडेच असते. मात्र हे सर्व आक्षेप धादांत खोटे ठरवत कविता ठोणगे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षकपदाच्या परीक्षेत राज्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. पहिल्या प्रयत्नात अपयश आल्यानंतर निराश न होता पुन्हा मोठ्या जिद्दीने अभ्यास करून यश मिळवले. कुठलीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना केवळ जिद्द व प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर स्पर्धा परीक्षेत कविता ठोणगेचे हे यश ग्रामीण भागातील युवक-युवतींना प्रेरणादायी ठरणारे आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील कोहकडी (ता. पाअनेर) हे कविताचे मूळ गाव. वडिलांचा गॅरेज व्यवसाय, तर आई शेतात मोलमजुरीचे काम करते. मात्र आपल्या मुलीने खूप शिकावे, मोठे व्हावे असे आई-वडिलांचे स्वप्न असल्याने कविताने आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत होती. 'जीवनात आपल्याला मोठेपणी काय बनायचं?' या प्रश्नाचे उत्तर शालेय वयात उत्साहाच्या भरात अन् स्वप्नाळू मानसिकतेतून प्रत्येक जण देतो. मात्र, त्या वयात पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटणारे अन् परिस्थितीच्या माथ्यावर पाऊल ठेवून ते सत्यात उतरवणारे लोक अपवादात्मक असतात. कविता ठोणगे हेही असेच एक अपवादात्मक लोकांमधील नाव. सामान्य स्तरावर शाळेचा दहावीपर्यंतचा टप्पा पार पडला. नंतर इतर मैत्रिणींप्रमाणे तिनेही कॉलेजात पाऊल ठेवून मनात वर्षानुवर्षे जपलेल्या सुप्त स्वप्नाच्या आशा जागविण्यास सुरुवात केली. सारे काही आवाक्यात वाटत असतानाच एक दिवस तिच्या वडिलांचा अपघात झाला. परिणामी दवाखान्याच्या पायऱ्या वारंवार चढाव्या लागल्या. वडिलांना अचानक आलेल्या आजारपणामुळे कविताच्या घरातील परिस्थिती अचानक बदलत गेली. पोलिस अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या कविताला बारावीनंतर शिक्षण थांबवावे लागणार असल्याची स्थिती निर्माण झाली.

परिस्थितीचा हा कौल मात्र कविताला मान्य नव्हता. जिथून विद्यार्थ्यांच्या करिअरला धुमारे फुटतात त्याच टप्प्यावर महत्त्वाकांक्षेला विरामचिन्ह लागत असेल तर पुढचा प्रवास सुन्नता आणणारा असणार अन् हेच कविताच्या बाबतीत घडत होते. मात्र या सुन्नतेवर मात करीत तिने मामांच्या घरी राहून शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला अन् डी.एड.च्या सीईटमध्येही गुणवत्ता मिळवत सरकारी कॉलेजमध्ये तिने प्रवेश मिळवला. पोलिस अधिकारी बनून हातात छडी घेण्याऐवजी तिच्या हातात खडू आणि फळा पडला होता. यानंतरही आशा बाळगत कविताने जिद्दीने नाशिक जिल्ह्यातील गोंदेदुमाला (ता. इगतपुरी) येथील शाळेत शिक्षिकेची नोकरी स्वीकारली. पाठोपाठ लग्न होऊन नाशिकमध्ये वास्तव्य आणि इगतपुरी तालुक्यातील नोकरी असा प्रवास सुरू झाला. या चौकटीत तिसरी महत्त्वाकांक्षा बाळगणे हे शक्य नसले तरी दररोजच्या प्रवासात शालेय जीवनातील स्वप्न कवितापुढे उभे राहायचे.

तिच्या स्वप्नांना खरे पाठबळ मिळाले ते विवाहानंतर पती डॉ. समाधान हिरे यांच्याकडून. स्पर्धा परीक्षांसाठी ते स्वतः प्रयत्नशील होते. घरातील जबाबदारीच्या अपेक्षा न लादता स्वतःच्या अभ्यासासोबतच त्यांनी पत्नीलाही प्रेरणा दिली. गेल्या वेळीही या परीक्षेत त्यांचे झालेले सिलेक्शन अर्जातील काही त्रुटींमुळे रद्द झाले. स्वप्न संपल्याच्या परिस्थितीपासून स्वप्न अधुरे राहिल्यापर्यंतचा अनुभव त्यांचे मनोबल खच्चीकरण करणारा होता. मात्र, केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर निराशेला दूर सारत कविताने करिअर साकारले.

लग्नानंतर दोन महिन्यांनी एमपीएससीच्या परीक्षेत कविता व त्यांचे पती डॉ. समाधान या दोघांनाही यश मिळाले. लग्नानंतर सासरीही शिक्षणाला प्रोत्साहन देणारे वातावरण आणि करिअरला पाठबळ देण्याची

> **"अगोदर ध्येयनिश्चिती करण्याला प्राधान्य द्यायला हवे. करिअरच्या वाटेवर यश कदाचित उशिराही मिळते. मात्र प्रामाणिक प्रयत्नांनंतर ते मिळेल एवढे निश्चित. आपण निवडलेल्या क्षेत्रामध्ये उत्तुंगता मिळविण्याचे स्वप्न बळ देऊन जाते."**
>
> **- कविता ठोणगे**

मानसिकता असल्याने हे यश शक्य झाल्याचे कविता नम्रपणे सांगते. हे यश मिळवल्यानंतर २०१५ पर्यंत डीवायएसपी बनण्याचे नवे ध्येय एमपीएससीच्या निकालानंतर बाळगले. स्पर्धा परीक्षेच्या या टप्प्यावर काही महिन्यांसाठी क्लासेसचे मार्गदर्शन घेतले. मात्र त्यानंतर मुक्त विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर पदवी पूर्ण करीत कविताने जिद्दीने घेतलेली ही उभारी स्वयंअध्ययनाचा पाया बळकट करण्याचा संदेश देऊन जाते.

महिलांवरील वाढत्या अत्याचाराला आळा घालण्याचा प्रयत्न आपल्याला या माध्यमातून करायचा आहे. महिलांनी अधिकाधिक ज्ञान प्राप्त करून आपला नावलौकिक वाढवावा, असे कविताचे ठाम मत आहे.

**असा केला अभ्यास**

कविता शाळेची सकाळी दहा ते सायंकाळी पाच ही वेळ सांभाळून सकाळी व सायंकाळी दिवसाकाठी रोज किमान पाच ते सहा तास अभ्यासाला द्यायची. या परिश्रमामुळेच कविताला ६७५ पैकी ५०१ गुण मिळाले. त्यात लेखी परीक्षेत २५९, शारीरिक चाचणी परीक्षेत १९२, तर मुलाखतीत ५० गुण मिळवून ती राज्यात प्रथम आली.

**आईचे स्वप्न साकार**

आपल्याला शिक्षण घेता आले नसले तरी आपल्या मुलीने खूप शिकावे, मोठे व्हावे हे आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना कविताने व्यक्त केली. आता २०१५ मध्ये राजपत्रित अधिकारी होण्याचे तिचे स्वप्न असून, तेही मी पूर्ण करेन, असा प्रबळ आत्मविश्वास कविताने व्यक्त केला आहे.

# यशोगाथा



## मृणाल दुसाणीस

## अभिनेत्री मृणाल दुसानीस

रंगभूमी, छोटा पडदा, मोठा पडदा याद्वारे आपल्या कलेचे प्रदर्शन करणाऱ्या कलावंतांबद्दल आपल्या मनामध्ये एक नेहमीच उत्सुकता असते. त्यांच्या वैयक्तिक जीवनाविषयी, वाटचालीविषयी त्यांच्या यशाविषयी. आणि ही उत्सुकता आपण कधी वाचनामधून, श्रवणामधून पूर्ण करीत असतो. नाटक, नृत्य, संगीत, मालिका, छोटा पडदा, मोठा पडदा, चित्रपट क्षेत्रात आपल्या अभिनयाची झलक दाखून स्वतःचे अस्तित्व निर्माण करणारी आणि अल्पावधीतच लोकप्रिय झालेली अभिनेत्री मृणाल दुसानीस हिच्याशी मारलेल्या मनमोकळ्या गप्पा.

मृणालला पहिली एंट्री मिळाली ती थेट एकता कपूरच्या माझिया प्रियाला प्रीत कळेना या मालिकेत. नंतर तू तिथे मी, श्रीमंत दामोदरपंत चित्रपट अशी तिला संधी मिळत गेली. अभिनय क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या मृणाल दुसानीस हिच्या आजवरच्या यशस्वी कारकिर्दीविषयी तिच्याशी साधलेला हा संवाद....




**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेण्याचा निर्णय का घेतला ?**

**मृणाल** – मुळात मला पत्रकारिता करायची होती. आणि मी प्रवेश दुसऱ्याच क्षेत्रात घेतला होता. त्यामुळे माझी इच्छा अपूर्ण रहात होती. तेव्हा मला माझं करिअर सांभाळून आवडीच्या शिक्षणक्रमास सवडीप्रमाणे अभ्यास करता यावा म्हणून मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. एम.सी.जे शिक्षणक्रमास एच.पी.टी महाविद्यालयाच्या अभ्यासकेंद्रावर प्रवेश घेतला.

**मुक्त शिक्षण प्रणालीबाबत काय वाटतं ?**

**मृणाल** – मुक्त विद्यापीठातील शिक्षणपद्धती ही दूरस्थ शिक्षणपद्धती आहे. येथे विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी स्थळ, काळ, वेळेचे बंधन नसते. आपल्या गरजेनुसार घरी राहून शिक्षण घेता येतं. शिवाय दररोज प्रत्यक्ष लेक्चर अटेन करावं लागलं नाही. मात्र गेस्ट लेक्चर्समधून खूप काही शिकायला मिळाले. स्वयं अध्ययनावर अधिक भर असल्याने इथे मला अनुभवातून शिकायला मिळालं. याबरोबरच शिक्षणक्रमाची पुस्तकेच बोलकी असल्याने प्रत्यक्ष शिक्षकाने शिकविण्याची गरज भासत नाही. अशाप्रकारे तिन्ही वर्षे मला आनंददायी शिक्षण येथून घेता आले.

**मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणाचा तुला काय फायदा झाला ?**

मृणाल क्त विद्यापीठातून पत्रकारितेचे शिक्षण पूर्ण करीत असतानाच मी के. के. वाघ महाविद्यालयातून डिप्लोमाही करीत होते. एकाचवेळी दोन शिक्षणक्रम पूर्ण करतांच अभिनयाचे धडेही मला गिरविता येत होते. शिवाय त्याचवेळी महाराष्ट्र टाइम्समध्येही इंटर्नशिप करत होते. एकाचवेळी अनेक क्षेत्रात काम करण्याची संधी यामुळे मला मिळाली. पत्रकारितेचे शिक्षण घेण्याचे स्वप्न केवळ मुक्त विद्यापीठामुळेच पूर्ण होऊ शकले.

**रंगभूमीवरच्या पदार्पणाविषयी काय सांगशील ?**

**मृणाल** – इयत्ता आठवीत मराठा विद्यालयात असताना सावानाच्या बालनाट्य स्पर्धेत एका नाटकात भाग घेतला होता. तिथून आवड निर्माण झाली. आणि ठरवलं की आपण याक्षेत्रात काहीतरी करू. मला मुळात नृत्य शिक्षण पूर्ण करायचे होते. कथ्थकच्या जवळपास पाच परीक्षा दिल्या.

करुणा टिळे आणि जयकुमार खेले यांच्याकडून कथ्थकचे शिक्षण घेतले. यासाठी नालंदा विद्यापीठात प्रवेशही घ्यायचा होता मात्र काही कारणाने ते झाले नाही. नंतर माझी ओळख प्रवीण काळोखे यांच्याशी झाली. त्यांच्या जिनिअस ग्रुपला जोडले गेले. त्यानंतर नाट्य, क्षेत्रात काम करण्याच्या अनेक संधी मिळत गेल्या. जिनिअस ग्रुपमुळे अभिनेते ऋषिकेश जोशी यांची भेट झाली. मी आज याक्षेत्रात जी काही आहे ती प्रवीण काळोखे, ऋषिकेश जोशी आणि सुनील धोपावकर या तिघांमुळेच.

तू सूत्रसंचालन, अभिनय, नृत्य, नाटक, मालिका आणि चित्रपट अशा विविध क्षेत्रांत काम केले यापैकी सर्वात आवडलेले क्षेत्र कोणते ?

मृणाल प्रत्येक क्षेत्राची एक स्वतंत्र खासियत आहे. कुठल्याही गोष्टीला रियाज लागतो. अभिनयाच्या क्षेत्राला मी अधिक वेळ देवू शकत असल्याने ते मी करते. मात्र नृत्याला अधिक वेळ दिला असता तर मात्र चित्र वेगळं दिसलं असते. पण कुठलेच क्षेत्र वाईट नाही. सर्वच क्षेत्र चांगले आहेत. फक्त माझाच चॉईस होता आणि मी अभिनय क्षेत्र निवडले.

**अभिनय क्षेत्रात करिअर करतांना कुटुंबियांकडून कसं सहकार्य मिळाले ?**

**मृणाल** – आज इथे आहे ते फक्त माझ्या कुटुंबियांमुळेच. मी मध्यमवर्गातील मुलगी आहे. मराठमोळ्या घरातील आहे. घरातील कोणीही या क्षेत्रात नव्हते. त्यामुळे या क्षेत्रात काय असते. कसे असते याचा कोणताही अनुभव नव्हता. पण तरीदेखील एखाद्या मुलीला घरापासून एवढ्या लांब पाठवणे, जे क्षेत्र पूर्णपणे अनोळखी आहे. माझ्या आई बाबांचा माझ्यावरील विश्वास, पाठिंबा असल्यामुळेच मी आत्तापर्यंतची वाटचाल करू शकले. मात्र यामुळे कुटुंबाला फारसा वेळ देता येत नाही. ही खंत आहेच.

**आजवर मालिका नाटकांतून वेगवेगळ्या भूमिका साकारल्या. त्यापैकी सर्वात आवडलेली किंवा भावलेली भूमिका कोणती ?**

**मृणाल** – दोन्ही भूमिकांच्या वेगवेगळ्या आणि खास आठवणी आहेत माझ्याकडे. शामिका पहिली भूमिका त्यामुळे ती माझ्या मनाच्या फार जवळ आहे. आणि मंजिरी मी मला वाटतं माझ्या वैयक्तिक आयुष्यात कधीच तशी वागलेली नाही. यासगळ्यांचा कधी अनुभवच नव्हता. त्यामुळे मंजिरीसुद्धा मला जवळची वाटते. मला सर्वाधिक लोकप्रियता मिळाली ती मंजिरीच्या लोकप्रियतेमुळेच. त्यामुळे या दोन्ही भुमिका मला भावल्या आणि मला त्या साकारायला मिळाल्या याचा आनंद वाटतो.

**तुझे पुढचे पाऊल काय आहे ?**

**मृणाल** – केवळ नाटक, मालिका किंवा चित्रपटच करायचे असे काही ठरवले नाही. अनेक प्रोजेक्ट्स आहेत. चांगली संहिता मिळाली तर आव्हानात्मक भूमिका करायला निश्चितच आवडेल.

या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांना मी सांगेन की, तुम्ही तुमचे आवडीचे तेच क्षेत्र निवडा. कारण कित्येक मुलं/मुली केवळ ग्ल्यामरच्या, प्रसिद्धीच्या मोहापाई व झटपट पैसे मिळतात या गैरसमजातून या क्षेत्रात येतात आणि फसतात. काहींना पटकन संधी मिळाली नाही तर निराशही होतात. पण असे काही नाही. तुम्ही कोणतेही क्षेत्र निवडताना परिपूर्ण क्षमतेने त्यात उतरा यश तुमचेच आहे. आपल्याशी, आपल्या कामाशी आणि आजूबाजूच्या लोकांशी प्रामाणिक राहा एवढेच मी सांगेन

# यशोगाथा



पद्मशीला तिरपुडे

## पद्मशीलाच्या जिद्दीला सलाम...!

'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा या कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या काव्याची प्रचिती दिलीय ती नाशिक येथील पद्मशीला तिरपुडे या विद्यार्थिनीने. घरची परिस्थिती अत्यंत बेताची असुनही जिद्द अन् शिक्षकांनी लढण्यासाठी दिलेल्या पाठबळाच्या जोरावर पद्मशीलाने यश मिळविले आहे. ध्येय जर प्रबळ असेल, तर यश आपोआप आपल्या पायाजवळ चालत येते, याचा उत्तम नमुना नाशिककरांना अनुभवण्यास मिळाला.

गोदावरी नदी काठच्या पालात दोन लहानग्यांसह चाललेला संसार... पतीचे मोलमजुरीचे काम... घरात अठरा विश्व दारिद्र्य... अशा अनेक आव्हानांशी लढत तिने पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले अन् केवळ एवढ्यावरच न थांबता दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर चक्क फौजदारही झाली... ही गोष्ट आहे सामान्यातील असामान्य पद्मशीलाची...! सर्वसामान्य कुटुंबातील बेताची आर्थिक परिस्थिती आणि अनंत अडचणींशी संघर्ष करत पद्मशीला तिरपुडे यांनी मिळविलेले यश महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी आदर्शवत असेच आहे.

महाराष्ट्र पोलिस अकादमीत अलीकडेच पार पडलेल्या फौजदारांच्या तुकडीचा दीक्षान्त सोहळा पद्मशीलाच्या जीवनातील आनंदाचा आणि अभिमानाचा ठेवा ठरला. हा क्षण अनुभवण्यासाठी तिने केलेल्या प्रचंड संघर्षाची ही एक सुखद परिणती असल्याचे चित्र पाहायला मिळाले. भंडारा जिल्ह्यातील वाळकेश्वर जवळच्या पहेला गावातल्या श्री. पवन तुकाराम खोब्रागडे यांच्याशी पद्मशीला रमेश तिरपुडे हिचा दहा वर्षांपूर्वी प्रेमविवाह झाला होता. अतिशय प्रतिकूल परिस्थिती असतानाही पद्मशीला तीरपुडे यांनी पोलिस अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. दोन बाय चारच्या खोलीत राहून आपला सुखी संसार सांभाळत पद्मशीला आज या ठिकाणी पोचल्या आहेत. या प्रवासात त्यांना त्यांचे पती पवन खोब्रागडे यांची मोलाची साथ मिळाली आहे. मनात एखादी गोष्ट आणली तर जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपण ती सिद्ध करू शकतो, याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

पद्मशीला यांच्या अभ्यासात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी पवनने अक्षरशः जिवाचे रान केले. लहान मुलांना सांभाळणे, खाऊ-पिऊ घालणे सगळी कामे पवन स्वतः करीत. दहा बाय दहा आकाराचे घर स्टडी रूम झाले होते. कॉटखाली, कॉटवर सगळीकडे पुस्तकेच पुस्तके. या पुस्तकांनीच दोघांचे आयुष्य बदलले. प्रेम आंधळे असते असे म्हणतात. कदाचित ते खरे असावे, नाहीतर आयुष्यात इतकी मोठी किंमत मोजूनही तोंड देण्याचे बळ क्वचित कोणाच्या हातांना येईल.

विवाहानंतर दोघांनीही गाव सोडले आणि थेट औरंगाबाद गाठले. तिथे रोजंदारीवर मिळेल ते काम करण्यासाठी भटकंती सुरू झाली. मात्र बराच काळ लोटला तरी काही केल्या काम मिळेना. अखेर एका कंपनीत रोजंदारीवर मिळेल ते काम करू लागले. अशातच कंत्राटी कामही काही कारणास्तव सोडावे लागले अन् मग सामोसे विक्रीचा व्यवसाय करू लागले. प्रसंगी गहू-तांदळाचे पोते उचलून बराच काळ हमालीही केली. पण काही केल्या संसाराचा गाडा रुळावर येईना. ऊन, वारा, पाऊस असो की थंडी कशाचीही पर्वा न करता काबाडकष्ट करूनही यश मिळत नाही हे लक्षात आल्यावर दोघांनीही नाशिक गाठले. गोदावरी नदीच्या कडेला पाल ठोकून मजुरीवर गुजराण करणाऱ्यांनी आसरा देऊन दिलासाही दिला अन् यातच आशेचा किरण दिसू लागला. काही दिवसांतच पती पवन यांनी पेव्हर ब्लॉक काम सुरू केले आणि या व्यवसायात हळूहळू यश मिळवत पवन

**मुक्त शिक्षणाने मिळाली आयुष्याला दिशा**

**"घर-संसार, काम करता-करता शिक्षण घेण्याची संधी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत उपलब्ध झाल्याने, आज माझे पोलिस अधिकारी व्हायचं स्वप्न पूर्ण झाले याचा आनंद आहे. या प्रवासात माझ्या पतीची भूमिका निर्णायक ठरली. त्यांनी माझ्यासाठी खूपकाही सोसलंय. हमाली केली. सामोसे विकले. मजुरी केली. त्यांनी त्या वेळी घेतलेले कष्टच आज कामाला आले."**

**- पद्मशीला तिरपुडे (पोलिस उपनिरीक्षक)**

तरबेज झाले.

**पत्नीला फौजदार झाल्याचे पाहून आनंद...**

एकदा तर एक दिवस असा आला की, घरात दाणाही नव्हता. उसने आणलेले पन्नास रुपये बाजारात हरवले. दोघेही खूप रडलो नि तसेच उपाशी झोपलो. मनाशी एकच निश्चय केला, पद्मशीलाला शिकवायचं अन् मोठी अधिकारी करायचं. त्यासाठी खूप कष्ट केले. आज पत्नीला फौजदार झाल्याचे पाहून खूप आनंद होतोय.

**- पवन खोब्रागडे (पद्मशीलाचे पती)**

शिक्षणाशिवाय जीवन व्यर्थ आहे हे लक्षात आल्यानंतर शिक्षण घेऊन पुढे काहीतरी केले पाहिजे, ही ऊर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. मुलांचा सांभाळ, पतीला मदत आणि अभ्यास या सर्वांना वेळ देणे म्हणजे तारेवरची कसरत होती; मात्र हे आव्हान पद्मशीला यांनी स्वीकारले. दोघांनीही मोलमजुरी करता-करता शिक्षण घेण्याचा निर्धार केला. वेळ मिळेल तसे त्यांनी अभ्यास केला आणि अखेर परिश्रमाला फळ आले.

पद्मशीलाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतला. व्यवसायात पतीला मदत करतानाच संसाराचा गाडा ओढत, घरातील सर्व कामे सांभाळत बी.ए.चे पदवी शिक्षण पूर्ण केले. दरम्यान, याच काळात त्यांना प्रांजल आणि प्रज्वल ही दोन अपत्येही झाली. दोन मुलांना सांभाळताना 'एमपीएससी'च्या अभ्यासावरही पद्मशीलाने आपले लक्ष केंद्रित केले आणि कसून अभ्यास सुरू ठेवला. गेल्या वेळी अवघ्या एका गुणाच्या फरकाने त्यांची संधी हुकली. परंतु या अपयशाने हताश न होता पुन्हा तहान, भूक विसरून जिद्दीने अभ्यास केला अन् पूर्व आणि मुख्य अशा दोन्ही परीक्षा उत्तीर्ण झाल्या. बेताची परिस्थिती असल्याने मदतीचे अनेक हात पुढे आले. सुकामेवा, सकस धान्याची मदत आणि आत्मविश्वासाचे बळ मिळाल्याने अखेरीस शारीरिक चाचणीतही यश मिळाले अन् प्रशिक्षणासाठी नाशिकच्या महाराष्ट्र पोलिस अकादमीत दाखल झाल्या.

तब्बल दहा वर्षे सोसलेल्या वेदना, समाजाने दिलेला आधार, मायेचा हात, आत्मविश्वास, अन् काही झाले तरी पत्नीला वेळोवेळी पाठबळ देणारे पती पवन यांचे पाठबळ हा प्रचंड अनुभव त्यांना शांत बसू देत नव्हता. अखेर पद्मशीलाने अठरा महिन्यांचे कठोर प्रशिक्षण पूर्ण केले आणि केवळ शिक्षणामुळे गेल्या अनेक वर्षांपासूनचे अर्धवट राहिलेले पद्मशीलाचे स्वप्न पूर्ण झाले. त्यांना आता पहिलेच पोस्टिंग अमरावतीला दिले आहे. जिज्ञासू वृत्ती, जिद्द, महत्त्वाकांक्षा असेल तर अशक्य काहीही नाही, असे त्या आज ठणकावून सांगतात. दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर फौजदार झालेल्या पद्मशीला तिरपुडेंच्या संघर्षाची कहाणी वंचित समाजातील महिलांना दिशा आणि बळ देणारी आहे.

# यशोगाथा



## जयप्रकाश पवार

## पत्रकारितेतील 'जय' आणि 'प्रकाश'ही

जयप्रकाश पवार यांनी राष्ट्र सेवा दलातील सामान्य कार्यकर्ता ते नामांकित दैनिकाचा निवासी संपादक असा प्रवास केला आहे. असा यशस्वी प्रवास करतानाच त्यांच्यातला संवेदनक्षम पत्रकारही जागा होतो.त्यामुळेच जे त्यांनी, अनुभवले ते सर्व त्यांच्या पत्रकारितेतून आले. पत्रकारितेत जेपी म्हणूनच ओळख असलेल्या जयप्रकाश यांची जन्मभूमी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून त्यांनी पदवीचे शिक्षण घेतले आहे.

सामाजिक कार्याची आवड असल्याने च्या दशकात त्यांनी राष्ट्र सेवा दलामध्ये सामान्य कार्यकर्ता म्हणून कार्यास सुरुवात केली. शिक्षणापेक्षा सामाजिक कार्य अधिक महत्वाचे मानून निरनिराळ्या विषयांची व्याख्याने, समाज प्रबोधनाचे कार्यक्रम यात ते सहभाग घेऊ लागले. वैचारिक उपक्रमांची जोड मिळाल्याने तसेच समाजाच्या वेदना, प्रश्न समजून घेऊ लागले आणि जगाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलत गेला; चळवळीतील सक्रिय सहभाग, वाचनाची आवड असल्याने त्यांच्यातील कार्यकर्ता अधिक प्रगल्भ आणि बळकट होत गेला. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नावरून राष्ट्र सेवा दल दुभंगले. त्याची मोठी हानी होऊन सामान्य कार्यकर्ते दुरावले. प्रा. रणजीत देशमुख, अशोक परदेशी, मोहन गुंजाळ, सुभाष परदेशी यासारखी मंडळी सोबत असल्याने आपोआपच नव्या विचारांची फळी पुन्हा एकत्र आली आणि कॉम्रेड शरद पाटलांसोबत कार्य करू लागले.

समाजवादी चळवळीकडून साम्यवादी चळवळीच्या दिशेने, अर्थात सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीत काम सुरु झाले. आपोआपच सामाजिक जाणिवा वाढत गेल्या आणि त्यातूनच जयप्रकाश पवार यांच्या पत्रकारितेचा जन्म झाला. समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात वाचा फोडणे, प्रश्न मांडणे, चुकीच्या निर्णयानंतर सरकारला जाब विचारणे, सर्वसामान्य समाजाला न्याय मिळवून देणे या भावना जागल्या. पवार यांची घरची परिस्थिती बेताचीच. सामाजिक चळवळीतील त्यांच्यातला कार्यकर्ता त्यांना शांत बसू देत नव्हता. समाजासाठी लढलं पाहिजे हा विचार घेऊन ते पुढे स्वार झाले. त्यांचा पिंड मुळात लेखनाचा असल्याने त्यांनी पत्रकारितेत कारकीर्द करण्याचा विचार मनाशी पक्का केला.

मध्ये पुणे विद्यापीठाचा एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला. प्रा. शाम मानव यांच्या अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीतही तोंडन देताना भोंदुगिरी करणाऱ्या अनेक बाबांचा भांडाफोड करण्यास साथ दिली. चळवळी वाढू लागल्या तसे त्याचे प्रतिबिंब जनमानसात उमटविण्यासाठी वृत्तपत्रासारखी माध्यमेही आकार घेऊ लागली. त्यानंतर श्री. मधुकर बुवा संपादक असलेल्या दैनिक रामभूमीमध्ये पवार यांनी बातमीदार म्हणून नोकरीस सुरुवात केली. तेव्हा नाशिक शहर फारसे विकसित नव्हते. मात्र वर्तमानपत्राची ताकद मोठी असल्याने निरनिराळे विषय, प्रश्न, समस्या मांडण्यासाठी चांगली संधी त्यांना मिळाली. संपादकांनी शहर परिसरातील पूर्वाश्रमीच्या पालिकेच्या शाळांचा सर्व्हे पूर्ण केला आणि त्यात भेडसावलेले प्रश्न रामभूमीतून मांडले. बातमीदारीच्या काळात शिवजयंतीच्या मिरवणुकीत वाद होऊन दंगल उसळली. त्यावेळी तब्बल - दिवस रामभूमीच्या कार्यालयातच मुक्काम ठोकावा लागला. साहित्यिक, सांस्कृतिक, राजकीय लोकांशी संपर्क आला. अनेकांशी जिव्हाळ्याचे, आपुलकीचे नाते जोडले गेले. निर्भीडपणे पत्रकारिता करीत असताना नाशिकसह आसपासचे जिल्हे पिंजून काढीत दबदबा निर्माण केला.

वर्षभराच्या कारकिर्दीनंतर दैनिक देशदूतमध्ये ज्येष्ठ संपादक,

**अनुभवधारित पत्रकारिता करीत असतानाच बदलत्या काळात पत्रकारितेचे शास्त्रोक्त व तंत्रशुद्ध शिक्षण घेण्यासाठी मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. एमसीजे शिक्षणक्रमाची गरज होती. म्हणून मी प्रवेश घेतला. या शिक्षणक्रमामुळे मला पत्रकारितेची अधिक व्यापक दृष्टी मिळाली.**

**–जयप्रकाश पवार**

मार्गदर्शक की. सुरेश अवधूत यांच्या हाताखाली काम सुरु केले. जंवळपास सात वर्षे सातत्याने वेगवेगळ्या विषयांवर लेखन करत जयप्रकाश पवार यांनी पत्रकारितेला नवा आयाम दिला. त्यांचा पोस्टमार्टेम हा कॉलम खूप गाजला. पत्रकारितेत काम करताना समाजकारण, राजकारण, प्रशासनातील मंडळींशी रोज येणाऱ्या संपर्कातून नवनवीन अनुभवांनी त्यांच्यातील जाणिवा अधिक समृद्ध होत गेल्या. देशदूत तुमच्या दरी मोहिमेदरम्यान

सबंध जिल्हा त्यांनी पिंजून काढला.या काळात शेती, आदिवासी विकास, औद्योगिकीकरण, शहर विकासाच्या प्रश्नांचा अभ्यास करून हे सर्व विषय समाजासमोर मांडले. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांशी संपर्क आल्याने अनेक विषयांचे आकलन झाले. संपादक सतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली देशदूत टाइम्समध्येही बांतमीदारी केली. पुढे साप्ताहिक चित्रलेखाचे संपादक ज्ञानेश महाराव यांच्याशी संपर्क आल्याने चीत्रालेखात मुक्त पत्रकारिता सुरु केली. त्या काळात मालेगावचे नाव धार्मिक दंगलींसाठी संवेदनशील म्हणून ओळखले जात असले तरी प्रचंड थंडी पडत असे. त्यावेळी मालेगावातील कडाक्याची थंडी या पहिल्याच स्टोरीचे प्रचंड कौतुक झाले. त्यानंतर न चिरताच डोळ्यात पाणी आणणारा कांदा, नारायण नागबली यांसारख्या निरनिराळ्या विषयांवरील स्पेशल रिपोर्ट त्यांच्या सूक्ष्म, अभ्यासू, निरीक्षण शक्तीचे निदर्शक बनले. ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली निघणाऱ्या कालनिर्णयच्या प्रादेशिक आवृत्तीसाठीही त्यांनी लेखन केले.

नंतर पत्रमहर्षी दादासाहेब पोतनीस यांच्या मार्गदर्शनाने गांवकरीत दोन वर्षे काम केले. देशदूतच्या काळातच लोकमतचे विद्यमान संपादक आदरणीय श्री. हेमंत कुलकर्णी यांचा सहवास लाभला. त्यांनी पवार यांच्यातील कुशल बात्मिदाराचे गुण हेरून स्ट्रीन्जर (अंशकालीन वार्ताहर) म्हणून लोकसत्तेत काम करण्याची संधी दिली. त्यामुळे एकाचवेळी चित्रलेख, गांवकरी आणि लोकसत्ता या तिन्ही ठिकाणी पत्रकार म्हणून स्वतंत्र स्थान निर्माण केले. उगाच कल्पनेच्या भराऱ्या मारण्यात त्यांना अजिबात रस नाही. आपल्या वास्तव लेखनातून वाचकांच्या डोळ्यासमोर ते कालपट उलगडून दाखवीत आले. काही दिवसांतच हेमंत कुलकर्णी यांच्याब यथोचित प्रयत्नांमुळेच लोकसत्ता मध्ये रीतसर कार्यरत झाले. मालेगांव दंगलीचे वार्तांकन करताना मध्ये सलग दहा दिवस मालेगावात तळ ठोकून बातम्या दिल्याने ज्येष्ठ संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी खास प्रशस्तीपत्र दिले. पुढे लोकसत्ताच्या उत्तर महाराष्ट्र वृत्तांत पुरवणीची महत्वाची जबाबदारी जयप्रकाश यांनी पेलली. या आवृत्तीचे काम वेगळ्या पद्धतीने वाचकांसमोर आणले. विषयांची निवडक व आकर्षक मांडणी, सदरे यामुळे वृतांतने बाजी मारली आणि लोकसत्ताची उत्तर महाराष्ट्र आवृत्ती अल्पावधीतच लोकप्रिय झाली. हे सर्व करीत असतानाच त्यांना खंबीर साथ मिळाली ती अभिजित कुलकर्णी व अन्य सहकाऱ्यांची. याचाच परिपाक म्हणून लोकसत्ताकडून वारंवार कौतुकाची, शाबासकीची थाप मिळाली.

आदिवासींच्या कुपोषणासह सरदार सरोवर प्रकल्पातील विस्थापितांचे पुर्नवसन आदी विशेष बातम्या, तसेच नाशिकमधील भूखंड घोटाळ्याच्या वार्तांकनाची राज्यभर चर्चा झाली. दिंडोरीतील शेतजमीन घोटाळा चव्हाट्यावर आणला. विधिमंडळात हा विषय चर्चेस येऊन थेट सीआयडी चौकशीचे आदेश झाले. राज्य शासनाने कारवाईचा बडगा उगारताना अनेक वादग्रस्त सातबारा उताऱ्यांवर अहस्तांतरणीय व्यवहार वा बेकायदेशीर व्यवहार असे शिक्के मारत सुमारे तीन हजार एकर जमीन सरकारजमा करण्याची धडक कारवाई केली. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन लोकसत्ताने त्यांना एडिटर इन चीफ अवॉर्ड चा मान दिला.

पत्रकारितेचे शिक्षण मुक्त विद्यापीठातून


पत्रकारितेतील ही यशस्वी घोडदौड मोठ्या दिमाखात चालू होती. नवनवीन अनेक प्रसारमाध्यमे राज्यात विस्तारत असल्याने बदलत्या काळात आपणही पुढे जायला हवे, हा विचार डोकावत होता. त्यामुळेच पत्रकारितेच्या पदविका शिक्षणक्रमासाठी त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतला. मात्र, हे पुरेसे नाही याची त्यांना जाणीव झाली. यासाठी पदवी शिक्षण महत्त्वाचेच म्हणून जयप्रकाश पवार यांनी पुन्हा मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. एमसीजे या पदवी शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतला.

मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणामुळे त्यांच्या जीवनात अनेक दरवाजे खुले झाले. वर्तमानपत्रात काम करतानाच पत्रकारितेचे उत्तम ज्ञान मिळाल्याने अधिक प्रगल्भता येण्यास त्यांना मदत झाली. शिवाय पुस्तके सोप्या भाषेत आणि उत्तम दर्जाची असल्याने हे शिक्षण सहजपणे पूर्ण करता आले आणि अखेरीस पदवी संपादन केली.

प्रख्यात विचारवंत व ज्येष्ठ संपादक कुमार केतकर यांनी भारतातील अग्रगण्य भास्कर समूहाच्या दैनिक दिव्य मराठीच्या नाशिक आवृत्तीची जबाबदारी टाकली ती निवासी संपादक म्हणून. आता निवासी संपादक म्हणून तीन वर्षे यशस्वीरित्या पूर्ण होत आहेत. या वाटचालीत मुक्त विद्यापीठाचे योगदान अमूल्य असेच आहे.

**- संतोष साबळे**

# यशोगाथा



संजय पाखोडे

## सुवर्णपदकाने उजळले जीवन

पत्रकारितेत आलो ते अगदी योगायोगाने म्हणा अथवा अपघाताने मात्र या क्षेत्रात आल्यानंतर स्थिरावलो हेही तेवढेच खरे. १९९१ चा तो काळ होता. स्थापत्य अभियांत्रिकीच्या पदविका अभ्यासक्रमाला असतानाच मुंबईत एका खासगी बांधकाम कंपनीत नोकरी लागली. जेमतेम दीड वर्ष नोकरी केल्यानंतर काही अपरिहार्य कारणांमुळे अमरावतीला परतलो. मात्र त्यानंतर बांधकाम क्षेत्राकडे कधीच वळलो नाही. अमरावतीच्या एका स्थानिक दैनिकात पत्रकारितेला सुरुवात केली आणि त्यानंतर वेगवेगळ्या वर्तमानपत्रांत आणि ई टीव्ही मराठी, साम मराठी या टेलिव्हिजन न्यूज चॅनलला काम करण्याची संधी मिळाली. त्या वेळी पत्रकारितेचे कोणतेही शिक्षण घेतले नव्हते. मात्र कालांतराने असे जाणवायला लागले की, पत्रकारितेची किमान पदवी आपल्याकडे असावी. त्या वेळी १९९७ ला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा पत्रकारितेतील डिप्लोमा पूर्ण केला. पण पदवी प्राप्त करण्याची ओढ कायम होती. परंतु टेलिव्हिजन रिपोर्टींगच्या कामाचा व्याप आणि सतत व्यस्तता यामुळे महाविद्यालयामध्ये नियमित शिक्षण घेणे शक्यच नव्हते. दरम्यानच्या काळात श्रीनाथ वानखेडे नामक माझ्या मित्राने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पत्रकारिता विषयातील पदवी अभ्यासक्रमाची माहिती दिली. अभ्यासक्रमाची माहितीपुस्तिका आणली. मात्र शेवटच्या तारखेपर्यंत अर्ज दाखल केला नाही. प्रवेश घेण्याच्या अंतिम मुदतीला अखेर श्रीनाथ वानखेडे यानेच माझा अर्ज भरला आणि केंद्रात नेऊन दिला. त्यानंतर मात्र सलग तीन वर्षांत बीए एमसीजे हा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला. या अभ्यासक्रमाचे क्लासेस दर रविवारी असल्याने सुटीच्या दिवशी वेळ काढून नियमित अध्ययन करण्याची सुविधा होती. पत्रकारितेत लिखाण करीत असताना अनेक बारकावे नजरेत येत नाहीत. काही महत्त्वाच्या बाबी दुर्लक्षित राहतात. वृत्त संकलन करीत असतानाही काही विषयांना आपण न्याय देऊ शकत नाही. मात्र बीए एमसीजे या अभ्यासक्रमात पत्रकारितेच्या अनेक बारीकसारीक पैलूंवर लक्ष केंद्रित होते. अनेक वेळा तर आपल्या मुखातून असे वाक्य आपोआपच निघते की, अरे हे तर माहिती आहे. अरे हे तर आपण करू शकत होतो. पत्रकारितेच्या क्षेत्रात या अभ्यासक्रमामुळे माझ्या ज्ञानात आणखी भर पडली. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक साहित्य फारच मोलाचे आणि सामान्य ज्ञान वाढविणारे ठरले. ज्या क्षेत्रात आपण काम करतो त्या क्षेत्राविषयीची माहिती असावी असा साधारणतः दंडक आहे. पण प्रत्यक्षात आपल्याला त्या क्षेत्राविषयीच माहिती कमी असते. मात्र पत्रकारितेच्या या अभ्यासक्रमात मुक्त विद्यापीठाने जोहान गटेनबर्गच्या छपाई यंत्रापासून ते इंटअनेटपर्यंत सर्व विषय अतिशय सुयोग्य पद्धतीने मांडले आहेत. थोडक्यात काय तर ज्ञान, मनोरंजन आणि शिक्षण या तीनही बाबी मुक्त विद्यापीठाने सहज शक्य



**''मी ताठ मानेने सांगतो की, मी सुद्धा पत्रकारितेत मास्टर डिग्री संपादन केली बरे... अनुभवाबरोबरच डिग्रीचा अत्यानंद मात्र मुक्त विद्यापीठामुळे घेता आला.''**

**- संजय पाखोडे**

केल्या आहेत. सुदैवाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतून प्रथम येण्याचा बहुमान मिळाला. सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले. पदवी प्राप्त केल्यानंतर लगेचच दुसऱ्या वर्षी अमरावती विद्यापीठात मास्टर ऑफ जर्नालीझमच्या दोनवर्षीय अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. आणि आता पत्रकारितेत पारंगत झालो पण हे सगळे शक्य झाले ते यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामुळे. आता सध्या मी दैनिक भास्कर ग्रुपच्या दिव्य मराठी या वर्तमानपत्रात स्पेशल करस्पॉडंट या पदावर अमरावती येथे कार्यरत आहे. पत्रकारितेच्या माझ्या वाटचालीत मुक्त विद्यापीठाचा महत्त्वाचा वाटा आहे.

# यशोगाथा



रूपाली पाटील

## शिक्षणाच्या सीमा रुंदावल्या

माझा जन्म व डी.एड. पर्यंतचे शिक्षण नवी मुंबईतच झाले. वडिलांची कंपनी बंद पडल्यामुळे ते एका खाजगी कंपनीत नोकरीला होते. आईला शिवणकामाची आवड असल्यामुळे ती शिवणकामच करत होती पण दोघांची प्रबळ इच्छा हीच की, मुलगा नसला तरी तिन्ही मुलींनी निदान आपल्या पायावर उभे राहता येईल इतपत शिक्षण घ्यावे. आमच्या घरातील एकूण परिस्थिती मध्यमवर्गीय कुटुंबातील होती. उच्च शिक्षणाऐवजी आम्हाला आमच्या पायावर उभे राहता येईल इतपत शिक्षण परवडणारे होते. नववीत अध्ययनक्षमता चांगली असूनही अभ्यास कमी केल्यामुळे ग्रेस मार्क्स मिळाल्याचे शल्य वाटत असतानाच दहावीलाही आजारपणामुळे एक वर्ष गॅप घ्यावा लागला. आईला वाटले की, हिच्या शिक्षणात अडचणी येत आहेत. पण आई-वडिलांच्या आशीर्वादाने व प्रेरणास्थान श्री. मुळीक सर (नवी मुंबई) यांच्यामुळे दहावीला ६९ टक्के गुण मिळाले. सायन्सचा खर्च + पुढील करिअर याचा विचार करून कॉमर्समध्ये (इंग्रजी माध्यमातून) बारावी केली व ७९ टक्के गुण मिळविले. पुढील शिक्षणाच्या आशा प्रफुल्लित झाल्या. बरेच जण 'सी.ए. करा,' असाच सल्ला देत होते. पण वडिलांनी सांगितले, 'चांगले गुण मिळविले आहेत तर मोठ्या दोन बहिणींप्रमाणेच डी.एड. करू. कारण आधी पायावर उभे राहणे महत्त्वाचे. पुढील शिक्षण नंतर.' प्रक्रिया ऑक्टोबरपर्यंत लांबली. मधल्या काळात य.च.म. मुक्त विद्यापीठामध्ये बी.ए.साठी प्रवेश घेण्याचेही ठरविले होते. पण डी.एड. आणि बी.ए. एकाच वेळी करता येणार नव्हते. डी.एड. रिझल्टनंतर लगेचच अठ्ठावीस दिवसांतच माझ्या मोठ्या बहिणीच्या भावोजींशी (दिराशी) काही घरगुती कारणांमुळे माझे लग्न जुळविण्यात आले. माझे पुढील शिक्षण अपूर्ण राहील की काय? किंवा मागे पडल्याची भीती वाटू लागली. पुढे एक वर्षात कन्यारत्नही झाले. दरम्यानच्या काळात जळगाव जिल्हा परिषद अंतर्गत नोकरीचाही कॉल आला. माझ्या पतीने घरगुती कारणांमुळे सी.आर.पी.एफ.ची नोकरी सोडली. पुढील प्लॅनिंग वेगळेच होते पण तसे घडले नाही. स्त्रियांच्या शिक्षणात येणाऱ्या अडचणी माझ्याही आयुष्यात आल्या. लग्न, संसार, प्रपंच, दूरच्या खेड्यावरची नोकरी, खेड्यावरच राहणे, मुलीचे संगोपन या सर्व गोष्टींवर मात करण्यासाठी / ध्येयप्रेरित व्यक्तींसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हा मोठा दिलासा मिळाला. घरात पैशांची अडचण, वादविवाद, मानसिक त्रास, घरगुती ताणतणाव यांस सामोरे जात २००६ मध्ये या विद्यापीठात बी.ए.प हिल्या वर्षाला ॲडमिशनसाठी अर्ज केला. डी.एड.मुळे मला दुसऱ्या वर्षाला प्रवेश मिळाला. वरील सर्व अडचणींवर मात करून २००८ साली बी.ए. इंग्रजी विषय घेऊन ६५ गुण मिळविले. याविषयी मलाच काय पण माझ्या आई-वडिलांनाही खूप आनंद झाला. प्रत्येकाला माझे कौतुक सांगताना आईला खूप अभिमान वाटत असे. माझ्याबरोबरच माझी बहीण आणि जीजाजींनीही य.च.म. मुक्त विद्यापीठातूनच बी.ए. पदवी संपादन केली. त्यामुळे विद्यापीठाविषयी आम्हाला फार जिव्हाळा आहे. दरम्यान, श्री. सुभाष शेलार या सरांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत होते. जवळजवळ दर रविवारी सर्व्हिसच्या खेड्यावरून समंत्रणासाठी पारोळ्यापर्यंत यावे लागे. त्या वेळी सर आमच्याशी अडीअडचणींची चर्चा करायचे. प्रत्येक शंकेचे निरसन व्हायचे. सरांनी सांगितलेली जादा पुंस्तकेही (अभ्यासक्रमाव्यतिरिक्त) मी वाचायची. म्हणजेच संदर्भ वाचन करायचे. एकमेकांकडून आम्हाला प्रेरणा मिळावी व एकमेकांना मदत व्हावी म्हणून आमचा परिचय इतर विद्यार्थ्यांशी

**"शिक्षणापासून वंचित असलेल्यांना सुवर्णसंधीच प्राप्त होते. विद्यापीठाचा अभ्यासक्रमही इतर विद्यापीठांपेक्षा सोपा व सुटसुटीत वाटतो. विद्यापीठाची अनेक वर्षांपासूनची माफक फी व दर्जेदार पुस्तके ही या विद्यापीठाची जमेची बाजू आहे. अशी सुवर्णसंधी कोणीही गमवू नये असे वाटते. आई-वडील म्हणतात, आमच्या काळी अशी संधी आम्हाला प्राप्त झाली असती तर आम्हीही पदवीधर झालो असतो. विद्यापीठाद्वारे पदवीधर होणाऱ्या आमच्या येथील बऱ्याच शिक्षकांना मी पाहिले आहे व ते सर्व जण पदवीधर झाले आहेत."**

**– रुपाली पाटील**

सर करून द्यायचे. इंग्रजीविषयी असलेली थोडी भीती सरांमुळे दूर झाली. मला तर विद्यापीठाने ठेवलेल्या बक्षीस योजनेस पात्र होईल इतपत मार्क्स मिळवायचे होते. तसे झाले नाही पण मी एकदाची बी.ए. झाले. हाच मोठा आनंद होता. माझ्या पतीने मला पुढील शिक्षणासाठी प्रेरणा दिली म्हणूनच हे सर्व शक्य झाले.

माझ्या पतीने नोकरी सोडली तेव्हा त्यांचेही शिक्षण अपूर्णच होते. पुन्हा शिक्षणाची त्यांची मानसिकताही नव्हती. पण मी त्यांना प्रेरित केले व मुक्त विद्यापीठात प्रवेश घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी प्रवेश घेतला. कौटुंबिक वातावरण आनंदमय होण्यासाठी या शिक्षणाचा फायदा होत आहे. त्यांना चांगल्या संस्थेत नोकरीही मिळाली आहे. त्याचप्रमाणे माझ्याकडून प्रेरणा घेणारे मुले-मुली जी माझ्या (सर्व्हिसच्या) नोकरीच्या गावातली आहेत व माझ्याकडून सल्ला घेण्यास येतात. तेव्हा त्यांना मी कळकळीचे निवेदन करते की, त्यांनी शिक्षण अपूर्ण न सोडता मुक्त विद्यापीठाद्वारे पदवीधर व्हावे. त्याशिवाय विद्यापीठाद्वारे चालू केलेले विविध कोर्सेसची माहिती मिळवावी व आपले अपूर्ण शिक्षण पूर्ण करावे. यामुळे बऱ्याच मुला मुलींनी य.च.म. मुक्त विद्यापीठ, पारोळा केंद्रावर प्रवेश घेतला आहे. याचा मला अभिमान वाटतो. नोकरी, व्यवसाय, घर, संसार इत्यादी सांभाळून जास्तीत जास्त व्यक्तींनी, महिलांनी मुक्त विद्यापीठाद्वारे पदवीधर व्हावे, असे मी कळकळीचे आवाहन करते.

य.च.म.मुक्त विद्यापीठामुळे माझ्या शिक्षणविषयक ध्येयाच्या सीमा रुंदावल्या आहेत. त्यामुळे शिक्षणक्षेत्रातच उच्च पदावर कार्य करण्याची माझी इच्छा आहे. बी.ए. झाल्यावर लगेचच मी एम.पी.एस.सी.ची परीक्षाही दिली होती व आणखी स्पर्धा परीक्षा तसेच नेट/सेट परीक्षा देण्याचेही ठरविले आहे. त्यासाठी पुन्हा श्री. शेलार व इतर शिक्षकांचे मार्गदर्शन घेऊन यश संपादन करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. अर्थात यासाठी आपणा सर्वांच्या शुभेच्छा व आशीर्वाद यांची गरज आहे. य.च.म. मुक्त विद्यापीठ हे शिक्षणाचे माहेरघरच आहे, असे मी म्हणेन.

# यशोगाथा



**श्रीमती ललिता माने**

## मुक्त शिक्षणाने दिला आधार

मी ललिता लक्ष्मणराव माने-देशमुख शेतकरी कुटुंबात जन्माला आले. माझे मूळ गाव अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर.

माझे शिक्षण केवळ दहावी पास होते. आम्ही पाच बहिणी, दोन भाऊ. आईचे शिक्षण पाचवीपर्यंत तर वडिलांचे शिक्षण सातवी. आई-वडील दोघेही सुशिक्षित असल्यामुळे त्यांनी आम्हाला शाळेत घातले. दहावीनंतर शिक्षण बंद झाले. वयाच्या २३ व्या वर्षी विवाह झाला. घरात सासू-सासरे व तीन दीर होते. पती नोकरी करत होते व दीर शाळेत जात होते. घरातील कौटुंबिक जबाबदारी सांभाळून मी चांगली पुस्तके वाचत असे. मला वाचनाची खूप आवड. नंतर मला एक मुलगा व एक मुलगी झाली. यात पहिली पाच वर्षे गेली. मुलाला पहिलीला व मुलीला बालवाडीत सातारला शाळेत घातले (१९९५). त्याच वर्षी पतीचे निधन झाले. लग्नानंतर आठ वर्षांत सर्व काही संपले होते. डोळ्यांपुढे अंधार दिसू लागला. रडून काही उपयोग नव्हता.

मुलांचे भवितव्य डोळ्यासमोर उभे राहायचे. माझ्या सासरची माणसे स्वभावाने खूपच चांगली. त्यांनी मला आधार दिला. सासू-सासऱ्यांनी मला माहेर आठवू दिले नाही. माझे दीरपण खूप चांगले. त्यांनी मला भावासारखी माया दिली. सातारहून परत गावी (नांदगावला) आले. गावी सातवीपर्यंत मुलाचे व पाचवीपर्यंत मुलीचे शिक्षण झाले.

परत २००० साली मुलांच्या शिक्षणासाठी सातारला राहिले. मुलगा दहावीत व मुलगी सातवीत असताना सातारच्या सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. घोरपडे मॅडम मला देवासारख्या भेटल्या व त्यांनी मला 'तू यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बी.ए. कर' असे सांगितले. पूर्वतयारीचा फॉर्महो त्यांनी भरला व मी पूर्वतयारी पास झाले. तीन वर्षांत मी मुक्त विद्यापीठाद्वारे पदवीधर झाले. २००५ मध्ये पदवी प्रमाणपत्र (एल.बी.एस. कॉलेज, सातारा) आले. मला खूप आनंद झाला. माझ्या जीवनात एक प्रकारचा आनंद आला. याचे सर्व श्रेय मुक्त विद्यापीठाला व प्राचार्या घोरपडे मॅडमना आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने आज माझ्यासारख्या एकाकी महिलांना प्रेरणेची, स्वयंशिक्षणाची व स्वयंशक्तीची जाणीव दिली, याचा मला सार्थ अभिमान आहे.

माझ्या कामात काही त्रुटी राहिल्या, काही अडचणी आल्या तेव्हा केंद्रप्रमुख प्राचार्य डॉ. एस. डी. कांबळे सर व संयोजक प्रा. ए. पी. मारगम सर यांचे मला बहुमोल मार्गदर्शन लाभले.

इ.स. २००५ साली मी माझ्या मुलाला कोरेगाव डी. पी. भोसले येथे बी.सी.ए.ला प्रवेश घेतला. त्या वेळी तेथे मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रासाठी सहाय्यक म्हणून माझी नियुक्ती करण्यात आली. मी २००६ पासून आजपर्यंत केंद्र सहायक म्हणून काम पाहत आहे. मी माझे काम प्रामाणिकपणे करत असते.


आज माझा मुलगा पुणे येथे एमसीएच्या तिसऱ्या वर्षाला व मुलगी साताऱ्याला एमएच्या पहिल्या वर्षाला शिक्षण घेत आहे.

दूरशिक्षणाच्या प्रक्रियेत विविध संधी उपलब्ध करून समाजातील सर्व घटकांना सामावून घेतले आहे. मुक्त विद्यापीठाची शिक्षणप्रणाली माझ्या दृष्टीने मला खूपच फायद्याची ठरली आहे. मुक्त विद्यापीठामुळे मला खूप चांगले शिकायला मिळाले. माझ्याकडे ज्या महिला, मुले-मुली सल्ला घेण्यास येतात त्यांना मी कळकळीने सांगते की, शिक्षण अपूर्ण न सोडता मुक्त विद्यापीठाद्वारे पदवीधर व्हावे.

**"मुक्त विद्यापीठ एक नवजीवनाची दृष्टी देत आहे म्हणूनच मी आज समाजात एक सक्षम स्त्री म्हणून वावरत आहे. हे सामर्थ्य, हा सन्मान मला मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणातून मिळाला हे मी आवर्जून सांगते. माझ्यासारख्या इतर स्त्रियांनाही हाच संदेश देते की, शिका व आत्मसन्मान जगा."**

**– श्रीमती ललिता लक्ष्मणराव माने-देशमुख (बी.ए.)**

# यशोगाथा



## प्रा. वैशाली जाधव

## हौसलों से उडान होती है।

मित्रहो नमस्कार!

माझ्या प्रत्येक यशात आपल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा अत्यंत मोलाचा वाटा आहे. मी विद्यापीठाची शतशः ऋणी आहे.

मी दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर सुनंदा जाधव कन्या ज्युनिअर कॉलेज, कामेरी येथे कला शाखेत प्रवेश घेतला व मला इयत्ता बारावीमध्ये ८१ टक्के गुण मिळाले. ज्युनिअर कॉलेजमध्ये असल्यापासूनच मी स्पर्धा परीक्षा देण्याचे ध्येय उराशी बाळगले होते कारण माझ्यासारख्या सर्वसामान्य व ग्रामीण पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांसाठी तोच एक आशेचा किरण आहे. सन २००६-०७ ला मी डी.एड.ला प्रवेश घेतला. मात्र माझी अंतःप्रेरणा मला एमपीएससीकडे खुणावत होती. त्यासाठी तर पदवी शिक्षण हवे होते. या परिस्थितीवर माझे आदरणीय गुरुवर्य प्रा. अनिल पाटील सर व त्यांचे कर्मवीर शिक्षण संस्था अभ्यासकेंद्र, कामेरीने मला डी.एड. करत असतानाच पदवीसाठी आपल्या मुक्त विद्यापीठात प्रवेश घेण्याबाबत सुचवले. मुक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त नामांकित विद्यापीठ असल्याने स्पर्धा परीक्षांसाठी विद्यापीठाची पदवी ग्राह्य आहे. केंद्रप्रमुख प्रा. सौ. छाया पाटील व केंद्रसंयोजक प्रा. संजय पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे मी प्रथम वर्षास प्रवेश घेतला आणि २०१० मध्ये मला अर्थशास्त्रातून पदवी व डी.एड. पदविका दोन्ही प्रथम श्रेणीसह यशस्वीरीत्या मिळवता आल्या. विद्यापीठाची अभ्यासपद्धती व परीक्षेबाबतच्या लवचीकतेमुळे माझा मोलाचा वेळ वाचला, तसेच योग्य दिशा मिळाली. स्पर्धा परीक्षांची तयारी लवकर सुरू करता आली. दरम्यान, सीईटीतून प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी करत अभ्यास करण्याची प्रेरणासुद्धा मुक्त विद्यापीठामुळे मिळाली. माझ्यासारख्या महाराष्ट्रातील अनेक गरजूंसाठी आपले विद्यापीठ एक वरदानच ठरले आहे.

विद्यापीठाच्या अध्ययनार्थींशी संवाद साधण्याची संधी दिली याबद्दल हार्दिक आभार! विद्यापीठ व सर्व अध्ययनार्थींना भावी उज्ज्वल यशासाठी मनापासून शुभेच्छा! शेवटी कठोर परिश्रमातून जिंकण्याची आस मनात ठेवणाऱ्या सर्वांसाठी म्हणेन -

सपने उनके सच होते हैं, जिनके सपनों में जान होती हैं।
सिर्फ पंखों से कुछ नही होता, हौसलों से उडान होती हैं।

'ज्ञानगंगा घरोघरी' हे आपले ब्रीदवाक्य सार्थ करणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने ज्ञानाची गंगा शिक्षणापासून वंचितांच्या घरापर्यंत नेऊन पोहचविली आहे. शिक्षण घेण्याची इच्छा असूनही काही कारणांमुळे शिक्षण घेऊ शकत नाहीत अशा घटकांना शिक्षणाचे दरवाजे खुले करून त्यांचे जीवन यशस्वी करण्यास मोठा हातभार लावत आहे. विद्यापीठाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वंचित लोकांना उच्च शिक्षणाची संधी कमी खर्चात मिळते. या विद्यापीठाचे लाभार्थी हे प्रौढ व काहीतरी नोकरी, धंदा, घरकाम करणाऱ्या गृहिणी आहेत. पारंपरिक/औपचारिक विद्यापीठांपेक्षा याची रचना व कार्यपद्धती वेगळी आहे. या विद्यापीठामधून गरजेनुसार पायाभूत अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. जेणेकरून या अभ्यासक्रमाचा उपयोग लाभार्थ्याला आपले जीवनमान उंचावण्यासाठी होईल. अनौपचारिक शिक्षण हे महत्त्वाचे वैशिष्ट्य असल्यामुळे स्वयंअध्ययन पद्धतीने विद्यार्थी आपला अभ्यासक्रम पूर्ण करीत असतात. त्यामुळे निरक्षरतेचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये असा आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानते. कारण, माझे दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर घरच्या परिस्थितीमुळे शिक्षण थांबले. वडील शेतकरी असल्यामुळे घरच्या कामामध्ये आई-वडिलांना मदत करीत होते. शिक्षण बंद झाल्यामुळे घरकामामध्ये पुढच्या शिक्षणाचा विचार केला नव्हता. इतर चारचौघींप्रमाणे आपले आयुष्यही घरकामात जाईल असे

**''विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांना समाजातील एक सक्षम घटक बनवण्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने अनमोल असे कार्य केले आहे.''**

**- प्रा. वैशाली जाधव**

वाटत होते पण माझे पूर्ण आयुष्य बदलून टाकेल असा ज्ञानप्रकाश कामेरीचे प्रा. अनिल पाटील (दादा) व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने माझ्या जीवनात आणला. कर्मवीर अण्णांच्या प्रेरणेने निर्माण झालेले कर्मवीर शिक्षण संस्था अभ्यासकेंद्र कामेरीमध्ये अनेक मुला-मुलींचे जीवन शिक्षणाने बदलून टाकणाऱ्या दादांनी मला त्यांच्या सेंटरमध्ये पूर्वतयारीला प्रवेश घेण्यास भाग पाडले. माझ्या मोठ्या भावालाही त्यांनी आपल्या सेंटरमध्ये प्रवेश देऊन त्याचे बी.कॉम. पूर्ण करून पुढील शिक्षणाची वाट मोकळी करून दिली होती. मी घरी बसूनही अभ्यास करून परीक्षा देऊन शिक्षण पूर्ण करू शकते हे त्यांनी पटवून दिले व वेळोवेळी लागेल ती मदत केली. त्या प्रवेशाने माझ्यामध्ये आत्मविश्वास आला व मीही इतरांप्रमाणे कॉलेज पूर्ण करू शकते याचा आनंद झाला. माझे सन २००१ मध्ये बी.ए. पूर्ण झाले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या त्या पदवीने माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला व पुढील शिक्षणाची वाट मोकळी करून दिली.

# यशोगाथा

अ‍ॅड. मीरा डोईफोडे

## आयुष्याची 'केस' जिंकली

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने माझ्यासारख्या महिलांना शिक्षणाची दारे खुली करून एक नवनवीन दृष्टी दिली म्हणूनच मी आज समाजात सक्षम स्त्री म्हणून वावरते आहे.

आई सुशिक्षित असल्याचा फायदा एवढा झाला की, तिने आम्हाला शाळेत घातले. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. इयत्ता सातवीत असताना वयाच्या १३ व्या वर्षी लग्न. अपघातानेच हा विवाह झाला. कारण माझ्या पतीची पहिली पत्नी निवर्तली व ती आमच्या नात्यातीलच होती. पहिल्या पत्नीपासून त्यांना तीन मुले झाली. दोन मुलगे व एक मुलगी. मुलगी नऊ वर्षांची, मुलगा अनुक्रमे ७ व २.५ वर्षांचा सर्वांत लहान मुलगा, घरात थोरले माणूस कोणीही नव्हते. अशी सर्व कुटुंबाची जबाबदारी माझ्यावर पडली. माझे पती वकिली करीत होते. त्यांच्या व माझ्या वयातील अंतरही फार होते म्हणजे २४ ते २५ वर्षे एवढे. त्यामुळे आमचे वैचारिक नाते जुळणे अशक्य होते. १३ व्या वर्षी लग्न झाल्याने कुटुंबसंस्था, लग्न म्हणजे काय हे मला काहीच कळत नव्हते. अशा वातावरणात राहत असताना पक्षी पिंजऱ्यातून उडाला हा पाचवीच्या पुस्तकातील धडा मी वाचला. त्यात स्वातंत्र्यसंग्रामातील तरुणाची कथा होती. पण मला ती माझ्या बाबतीत खरी असल्याची वाटली. मी दैनंदिन कौटुंबिक जबाबदारी सांभाळून वाचन करीत असे. माझ्यावर मुलांच्या व मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी होती. त्यांना सावरकर विद्यालयातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण दिले. मुलीला डी.एड. केले. आज मुलगा एम.व्ही.एस.सी. करतो आहे व दुसरा मुलगा इंजिनिअरिंगला आहे. नुकतीच त्याने स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी उत्तीर्ण केली आहे.

मुलांच्या शिक्षणामुळे मी स्वतःला अपत्य होऊ दिले नाही व पूर्ण वेळ यांची आई-पालक-व्यवस्थापक म्हणून काम करीत राहिले. मी पाच मुलांचे मुलींचे जात-पात न मानता पालकत्व स्वीकारून त्यांचे शिक्षण केले. ते उच्चविद्याविभूषित आहेत. याच काळात श्री. प्रल्हाद तोगे या माझ्या पतीच्या मित्राने मला एस.एस.सी. परीक्षेचा फॉर्म भरून देण्यात मदत केली व मी एस.एस.सी. १९९३ साली पास झाले. तरीही माझ्यात शिक्षणाची ऊर्मी कायम होती. मी बलभीम महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या केंद्राशी संपर्क साधला, पण वय कमी पडल्याने मी पुढच्या वर्षी प्रवेशित झाले. त्या वेळी केंद्र संचालक डॉ. हणमंत पाटील व त्यांचे सहकारी श्री. (कै.) सुरेश म्हस्के यांनी मला मदतीचा हात दिला व मी मुक्त विद्यापीठाच्या पूर्वतयारीसाठी १९९५ साली प्रवेश घेतला. या वेळी मला मराठी, इतिहास, मानसशास्त्र, अर्थशास्त्र हे विषय होते. पुस्तके मिळाल्याने अभ्यास सुरू केला. पालक व विद्यार्थी या दोन्ही नात्याने मी वावरत होते. यां वेळी कौटुंबिक जबाबदारी सांभाळून नकारवादी लोकांशी खंबीरपणे वागावे लागत होते.

बी.ए. ते बी.ए. तृतीय वर्षापर्यंत दर वर्षी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन मी शिक्षण पूर्ण केले. आठवड्याची संपर्कसत्रे पूर्ण केली. याच वेळी पतीच्या इतर मित्रांपासून व त्यांच्या व्यसनापासून मी त्यांना दूर करण्याचा प्रयत्न केला. जिद्दीने अध्ययन करीत कौटुंबिक-शैक्षणिक जबाबदाऱ्या पार पाडून मी जीवन जगत होते. दूरदर्शनवर सावित्रीबाई फुलेंवर मालिका चालू होती. त्यातील सावित्रीबाई या महात्मा फुले यांच्या प्रेतयात्रेत तिरडी धरतात, हा खंबीरपणा पाहून आपणही तसेच व्हावे असे वाटले. तसेच डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावर एक मालिका होती, त्यातील गोपाळराव हटवादी हे आनंदीबाईंना शिकवितात, तिला डॉक्टर करतात. तिचा गर्भपात होतो, तेव्हा ते म्हणतात, मूल महत्त्वाचे नाही तर शिक्षण महत्त्वाचे आहे.

**"यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने आज माझ्यासारख्या दुर्लक्षित, एकाकी महिलांना प्रेरणेची, स्वयं-शिक्षणाची व स्वयंशक्तीची जाणीव दिली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ माझ्यासारख्या महिलांना शिक्षणाची दारे खुली करून एक नवीन दृष्टी देत आहे म्हणूनच मी आज समाजात सक्षम स्त्री म्हणून वावरते आहे. हे सामर्थ्य, हा सन्मान मला मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणातून मिळाला."**


– अ‍ॅड. मीरा डोईफोडे

हा संस्कार माझ्या मनावर खोलवर रुजला. डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनात व माझ्या जीवनात बरेचसे साम्य आहे. त्यामुळे मला ही मालिका आवडली व खोलवर रुजली. मला माझ्या पतीने शिक्षण घेण्याची मोकळीक दिली, सवड-सवलत दिली म्हणूनच आज एल.एल.बी. होऊन समाजसेवा करतेय.

मला आदर्श माता जिजाऊ पुरस्कार मिळाला. कृषी विद्यापीठ, परभणी यांचा उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार मिळाला. नुकतीच मी महात्मा गांधी ट्रस्टवर, तसेच विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची अशासकीय सदस्य म्हणून व युवक क्रांती दल राज्य सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहे. महिला दक्षता समिती, तंटामुक्त समिती इत्यादी कार्ये करीत आहे. हे मी आवर्जून सांगते.

माझ्यासारख्या इतर स्त्रियांनाही हाच संदेश देते की, शिका व आत्मसन्मानाने जगा.

# यशोगाथा




शरद गढीकर

## जलतरण कौशल्याने गाठला यशाचा किनारा

माणसाची जिद्द असेल, तर शिक्षण कोठेही घेतले तरी यश मिळविणे आपल्या हाती असते हे अमरावतीच्या शरद गढीकर या जलतरणपटूने दाखवून दिले. अश्वमेध क्रीडा स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणारा शरद आज राष्ट्रीय जलतरणपटू म्हणून नावारूपास आला आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने केवळ शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांसाठी ज्ञानार्जनाची कवाडे खुली केली नाही, तर विद्यार्थ्यांमधील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्यातील सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देण्यासाठी विविध महोत्सवांचे दालन खुले केले आहे. अशाच क्रीडा महोत्सवातून जलतरणात शरदने यश संपादन केले.



बालपणापासून क्रीडा क्षेत्राचे भारी वेड असलेल्या शरदची जडणघडण अमरावतीतील प्रसिद्ध श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडांगणावर झाली. व्यायाम विशारद, व्यायामपटू, कुस्ती, मल्लखांब तर कधी मंडळाच्या बँड पथकात त्याचा सहभाग असायचा. मंडळाचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य, प्रा. वसंत हरणे, प्रशिक्षक प्रा. लक्ष्मीकांत खंडागळे यांनी शरदला जलतरण क्षेत्राकडे वळविले. स्वीमिंग पूलमध्ये सळसळत्या वेगाने पुढे जात, अनेक राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत त्याने कौशल्य दाखवून दिले.

क्रिडाशिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या शरदला त्याचं ध्येय स्वस्त बसू देईना. त्यामुळे त्याने मुक्त विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका या शिक्षणक्रमाला प्रवेश घेतला. शिक्षण सुरू असताना पारंपरिक विद्यापीठाच्या विभागीय स्तरावरील जलतरण स्पर्धेसाठी त्याची निवड झाली. त्याही स्पर्धेत वैयक्तिक जलतरण प्रकारात त्याला यश मिळाले. त्यातूनच त्याची २००४-०५ मध्ये राजकोट येथे झालेल्या आंतरविद्यापीठीय अश्वमेध स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. त्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे, हे शरदने दाखवून दिले आणि मुक्त विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

अश्वमेध स्पर्धेतील सहभागाचे प्रमाणपत्र शरदकडे असल्याने शारीरिक शिक्षणक्रमासाठी त्याला सहजच प्रवेश मिळाला आणि त्यानंतर अनेक राष्ट्रीय जलतरण स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. बी.पी. एड. शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर त्याने वृत्तपत्रविद्या व पदव्युत्तर पदवीही मिळविली. शरदची शैक्षणिक प्रगती उंचवत असताना दुसरीकडे क्रीडा पत्रकार आणि अमरावती जिल्ह्यातील कुंड सर्जापूर येथील चंद्रभानजी विद्यालयात शारीरिक शिक्षकांची कायमस्वरूपी नोकरी मिळाली.

क्रीडा पत्रकार म्हणून काम करताना, अंध, अपंग, उदयोन्मुख खेळाडूंचा शोध घेऊन क्रीडा विषयावर अभ्यासपूर्ण वैचारिक लेखन सातत्याने केले. त्याच्या लिखाणाची दखल घेऊन स्व. अनिल मोहरीर राज्यस्तरीय क्रीडा पत्रकारिता पुरस्कार २००५, जिल्हा युवा पुरस्कार २००९, महात्मा गांधी तंटामुक्त मोहीम उत्कृष्ट लेखन पत्रकारिता पुरस्कार २००५ आणि २००९-१० च्या अरविंद बाबू देशमुख क्रीडा पत्रकारिता पुरस्कारासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते त्याला सन्मानित करण्यात आले. तसेच १० राष्ट्रीय राज्यस्तरीय खेळाडू घडविल्याची नोंद शरदच्या नावे आहे. प्रभात क्रीडा मंडळ, अमरावती जिल्हा भाषाध्यापक संघ, जिल्हा जम्प-रोप असोसिएशन, शारीरिक शिक्षक संघटनेचे सदस्यत्वही त्याने भूषविले आहे. शरदची आजपर्यंतची वाटचाल निश्चितच अभिमान वाटणारी आहे. मुक्त विद्यापीठात प्रवेश घेऊन त्याने इतर खेळांडूंसाठी आदर्श निर्माण केला आहे. त्याची जिद्द आणि मेहनत क्रीडा क्षेत्रात शरदचे नाव अधिक उंचावेल यात शंका नाही.

**आशिष यावले**

# यशोगाथा



भूषण मटकरी

## ... आणि सापडली प्रगतीची मुक्त वाट

माणूस हा आयुष्यभर विद्यार्थी असतो आणि तो नित्य काहीतरी शिकत असतो. पण बऱ्याच वेळा पोटापाण्यासाठी धावताना शिक्षणाची साथ इच्छा नसतानाही अर्ध्यावरच सोडावी लागते. या सर्व गोष्टी बदलून गेल्या त्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामुळे.

सुरुवातीला 'सकाळ' वृत्तपत्रात बातमीदार म्हणून माझ्या वाटचालीची सुरुवात केली. हे करतानाच मला रेडिओ मिर्चीमध्ये रेडिओ जॉकी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. साधारणतः २००७ च्या पहिल्यावहिल्या खासगी रेडिओ वाहिनीवर 'गुडमॉर्निंग... नाशिक' अशी दिलखुलास साद घालण्याची संधी मिळणारा मी पहिलाच तरुण. पण हे सगळे करीत असताना आपण पत्रकारितेचे व्यवस्थित शिक्षण घ्यायला हवे, असे कुठेतरी मनोमन वाटत होते. मात्र, माझ्या रोजच्या वेळापत्रकात वेळ मिळत नव्हता. मग मला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. मास कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझम या अभ्यासक्रमाची माहिती मिळाली. मी श्रीकांत सोनवणे सरांना जाऊन भेटलो. त्यांनी अतिशय चांगले मार्गदर्शन केले. माझी मूळ अडचण होती ती, सकाळी होणाऱ्या वर्गाला उपस्थित राहता न येणं. कारण माझा रेडिओ मिर्चीवरचा शो सकाळी ७ ते ११ असायचा. पण मला त्यांनी याबाबतीतही सहकार्य केले. मी हा सर्व अभ्यास घरी पूर्ण करायचो. काम करता-करता शिक्षण घेण्याचा मार्ग मला सापडला. या अभ्यासक्रमाचा मला माझ्या नोकरीत प्रचंड मोठा फायदा झाला.



पत्रकारितेतले अतिशय महत्त्वाचे बारकावे मला यामध्ये शिकायला मिळाले. एखादा विषय कसा निवडावा, तो कसा हाताळावा, मुलाखत घेताना प्रश्न कोणते असावे तसेच त्याचा क्रम कसा लावावा, या सर्व गोष्टी मला या अभ्यासक्रमातून कळत गेल्याने मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणाचा वापर करून मी आतापर्यंत रेडिओ मिर्चीमध्ये तब्बल १५००-१६०० लोकांच्या मुलाखती घेतल्या. यामध्ये मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर, आशा भोसले, गुलाम अली खान, कैलास खेर, शरद पवार, विलासराव देशमुख, आर. आर. पाटील, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, पोलिस महासंचालक डी. शिवानंदन ही आणि अशी बरीच नावे घेता येतील. या सर्व कामामुळेच रेडिओ मिर्चीतर्फे दिला जाणारा 'फ्लेम थ्रोवर' या पुरस्काराचा मी मानकरी ठरलो. याबरोबरच सुभाष घई यांच्या व्हिसलिंग वूड्स संस्थेतर्फे दिला जाणारा यंग अचिवर्स ऑफ द इयर हा बहुमानही मिळाला. याशिवाय इंडिया रेडिओ फोरमतर्फे देण्यात येणारा इंडियन एक्सलन्स इन रेडिओ २०१३

**"मागेल त्याला, म्हणाल तिथे आणि पाहिजे तेव्हा शिक्षण. शिक्षणाची ही अनोखी मुक्त वाट यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने समाजातील विविध घटकांसाठी खुली करून दिली.**

**'जो जे वांछील तो ते लाहो' पसायदानातील ही उक्ती सत्यात आणणारे जणू हे विद्यापीठ आहे. लाखो लोकांना याचा फायदा झाला, त्यातीलच मी एक विद्यार्थी."**

**- भूषण मटकरी**

चा 'आर.जे.ऑफ दि इयर' (मराठी) हा संपूर्ण भारतातून देण्यात येणारा मराठीतला सर्वोत्कृष्ट आर.जे. हा पुरस्कारही मला मिळाला आणि यावर पुन्हा शाबासकीची थाप म्हणून मुक्त विद्यापीठाने माझा जाहीर सत्कार केला. मानपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन यथोचित गौरव केला. अशा प्रकारे विद्यापीठाच्या सहकार्याने आजपर्यंत घडलेला प्रवास अतिशय सुखद होता. याबरोबरच जवळपास वर्षभर मला झी मराठीच्या 'राम राम महाराष्ट्र' या कार्यक्रमाचे निवेदन करण्याची संधीही याच काळात मिळाली.

या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांनी बी.ए. मास कम्युनिकेशन अँण्ड जर्नालिझम हा अभ्यासक्रम जरूर अभ्यासावा. तज्ज्ञांनी बनवलेला आणि अतिशय उपयोगी असा हा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमाची सर्व पुस्तके मी आजही जपून ठेवलेली आहेत. अधूनमधून ती वाचत असतो. पत्रकारिता क्षेत्रात आजही अनेक जण नोकरी करून पुढील पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छितात. त्यांच्यासाठी विद्यापीठाने पुढील काळात असा पदव्युत्तर अभ्यासक्रम तयार करावा असे मला वाटते. प्रगती आणि शिक्षणाच्या मुक्त वाटा या विद्यापीठाने सामान्यांसाठी खुल्या केल्याने नोकरी, व्यवसायामुळे ज्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न अर्धवट राहते अशांना ते पूर्ण करण्याची संधी मुक्त विद्यापीठाने उपलब्ध करून दिलीय. मुक्त शिक्षणाचा हा ज्ञानयज्ञ असाच तेवत राहो...!

विद्यापीठाच्या रौप्यमहोत्सवी वर्धापनदिनास खूप शुभेच्छा!

**...आणि वर्ल्ड कपचे थीम साँग बनले!**

क्रिकेटच्या विश्व करंडकला सलाम संकल्पनेतून विश्व पण येथील तरुणांनी एका अभिनव विक्रम करायचा प्रयत्न केला. नाशिकच्या तरुणांनी केलेल्या थीम साँगची संकल्पना भूषण मटकरी यांची असून, तेच या गीताचे गीतकार आहेत.

**'इंडिया जितेंगे हम आगे बढते रहेंगे हम'**

अशा स्फूर्तिदायी शब्दांनी गाण्याची सुरुवात करण्यात आलीय. दिल्ली, मुंबई येथे अशी गाणी तयार होतात आणि ती भारतभर गाजतात, पण नाशिकसारख्या शहरातही अशी उत्कृष्ट गाणी तयार होऊ शकतात, हे या तरुणांनी दाखवून दिले आहे. मुक्त विद्यापीठातून शिक्षणाचे धडे गिरविणाऱ्या भूषणची ही कामगिरी नाशिककरांसाठीच नव्हे तर उभ्या महाराष्ट्रासाठी भूषणावह अशीच आहे.

**- संतोष साबळे**

# यशोगाथा



श्री. बाळू भद्रिके

## शिक्षणाने मिळाली आयुष्यातली मोलाची 'ठेव'

मी श्री. बाळू सीताराम भद्रिके दिनांक २४ जानेवारी १९८३ पासून स्टेट बँक ऑफ हैदराबादमध्ये शिपाई पदावर कार्यरत होतो. बँकेत नोकरी लागण्यापूर्वी माझे शिक्षण दहावी नापास होते.

बँकेत नोकरी लागल्यानंतर मी बँकेची परवानगी घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून शिक्षणाला सुरुवात केली. मी संस्कारधाम कॉलेज, कुरार विलेज, मालाड, मुंबई येथील आपल्या विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रात प्रवेश घेतला. प्रथम पूर्वतयारी अभ्यासक्रम परीक्षा पास झालो आणि नंतर बी.ए.च्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. २०१२ रोजी मी तृतीय वर्ष बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालो.

मी पदवीधर झाल्यामुळे बँकेत शिपाई या पदावरून लिपिक (क्लार्क) या पदावर बढती मिळण्यास पात्र झालो. मी आमच्या बँकेच्या हैदराबाद येथील मुख्यालयात जाऊन बढतीसाठीची लेखी परीक्षा व मुलाखत पास झालो आणि त्यामुळे मला लिपिक पदावर बढती मिळाली आहे.

आता मी बँकेत लिपिकपदावर कार्यरत आहे आणि मी पुढील बढतीसाठी म्हणजेच लिपिक ते अधिकारी या बढतीसाठी प्रयत्न करीत आहे. याकरिता मी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग ॲण्ड फायनान्स (आय.आय.बी.एफ.) तर्फे घेतल्या जाणाऱ्या जे.ए.आय.आय.बी. परीक्षेस बसलो आहे.

**''बँकेतील माझी बढती आणि विविध अभ्यासक्रम शिकण्याची संधी आपल्या विद्यापीठातील शिक्षणामुळेच मिळाली आहे. या शिक्षणामुळे माझी बढती होऊन मी पगारवाढसुद्धा मिळविली आहे. मला प्रगतीची ही संधी मिळवून दिल्याबद्दल मी आपला आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा आभारी आहे.''**

**- बाळू भद्रि**

यशोगाथा



मंगेश जगताप

# अन् आयुष्य सुखकर बनले....

माझे नाव मंगेश डी. जगताप. मुक्त विद्यापीठाचा माझ्या वाटचालीत मोठा वाटा आहे. सरकारी व निमसरकारी नोकऱ्यांसाठी मुक्त विद्यापीठाची पदवी अथवा पदविका बाकी कुठल्याही विद्यापीठाप्रमाणेच ग्राह्य धरली जाते. इथे विविध क्षेत्रातील अनेक अभ्यासक्रम घेतले जातात आणि त्याच्या वैधतेबद्दल कोणतीही शंका घेतली जात नाही.

मी २४ वर्षांचा असताना माझ्यापुढे चांगली नोकरी मिळविण्यासाठी कोणता अभ्यासक्रम निवडावा असा प्रश्न होता. सुदैवाने याच सुमारास माझी भेट माझ्या नात्यातल्या एकाशी झाली. त्याने फायर अॅन्ड सेफ्टी (अग्निशमन आणि सुरक्षितता) इंजिनीअरिंग हा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला होता आणि या क्षेत्रात काही वर्षे काम करत होता. त्याने मला हा अभ्यासक्रम करण्याचा सल्ला दिला. या क्षेत्रात अनेक संधी आहेत. इथे काम करणाऱ्याला आपल्या समाजासाठी व देशासाठीही काहीतरी करण्याचे समाधान मिळते. ज्या आगीमुळे मनुष्यहानी आणि मालमत्तेची हानी होऊ शकते त्यापासून सर्वांना वाचविण्याचे पुण्य पदरी पडते. त्यामुळे लढाऊ वृत्ती वाढीस लागते. सर्व ऐकल्यावर मला या क्षेत्रात काम करण्याने समाधान मिळेल अशी खात्री झाली आणि ते खरेही झाले.

माझ्या नशिबाने मला नागपूरच्या इंन्स्टिट्यूट ऑफ फायर अॅण्ड सेफ्टी इंजिनिअरींग (आयएफएसइ) या नामांकित संस्थेत प्रवेश मिळाला. आशिया खंडातील सर्वोत्तम संस्थांपैकी एक असलेली ही संस्था मुक्त विद्यापीठ, नाशिकशी संलग्न आहे. सरकारमान्य असलेल्या या संस्थेत गेली अनेक वर्षे तरुणांना अग्निशमन आणि सुरक्षितता याविषयी शिकविले जाते. आता या विषयाचे तिथे अनेक छोटे अभ्यासक्रम तसेच पदवी अभ्यासक्रमही आहेत. हे सर्व कोर्सेस मुक्त विद्यापीठाच्या सहकार्याने चालतात. आयएफएसइचे प्रमुख श्री. कुमार अरविंद यांना अग्निशमन पशिक्षण या विषयात १५ वर्षांचा अनुभव आहे. विद्यार्थ्यांशी मायेने वागणारे श्री. कुमार वेळ पडल्यास शिस्तीचा बडगाही दाखवितात.

नागपूर येथील अग्निशमन कॉलेजमध्ये सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. येथील शिक्षक अनुभवी आणि प्रशिक्षित आहेत. काहींना राष्ट्रपती पुरस्कारही मिळाले आहेत. मी २००८-०९ या वर्षी आयएफएसइमध्ये प्रवेश घेतला. मी फायर अॅण्ड सेफ्टी इंजिनीअरिंग मॅनेजमेंट (अग्निशमन आणि सुरक्षितता) या विषयाचा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. इथे माझ्या आयुष्याला एक दिशा मिळाली. या अभ्यासक्रमादरम्यान पुस्तकी अभ्यास, प्रात्यक्षिके तसेच शारीरिक क्षमता वाढविणारे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे आज मी या क्षेत्रात एक कुशल प्रशिक्षित व्यक्ती म्हणून काम करू शकतो.

इथे नवीन उमेदवारांची निवड करण्यासाठी येणाऱ्या कंपन्यांपैकी कतारस्थित अल फुत्तेम इंजिनिअरिंग या कंपनीत एचएसई ऑफिसर या पदासाठी माझी निवड झाली. व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम देणाऱ्या मुक्त विद्यापीठाचा मी नेहमीच ऋणी राहीन. त्यांच्यामुळेच मला ही संधी मिळाली.

या अभ्यासक्रमामुळेच मी आज आयुष्यात सुखी समाधानी आहे. स्कूल ऑफ कॉमर्स अॅण्ड मॅनेजमेंट, मुक्त विद्यापीठ, नाशिकचे संचालक डॉ. सुरेंद्र पाटोळे यांचा मी नेहमीच कृतज्ञ राहीन. त्यांच्याच सुयोग्य मार्गदर्शनाखाली हा अभ्यासक्रम घेतला जातो. या सर्वांसाठी मी आयएफएसईचे प्रमुख श्री. कुमार अरविंद, आयएफएसइच्या प्राचार्या सौ. बबिता सिंग आणि तेथील सर्व प्राध्यापक यांचाही आभारी आहे.

कतारमध्ये काम करत असतानाही आयएफएसई मधले ते क्षण मी कधीच विसरू शकत नाही.

# यशोगाथा



बबली वासनिक

## कर्तृत्वाला जोड मुक्त विद्यापीठाची

लग्नानंतर तिला सुखी समाधानाचे आयुष्य जगता आले असते. पण तिने वेगळी वाट निवडली. सत्तास्थानांमध्ये पुरुषी मक्तेदारी असलेल्या राजकारणात शिरून ती थेट ग्रामविकासाच्या मुख्य प्रवाहात सामील झाली. एका ग्रामपंचायतीची सरपंच म्हणून...! अमरावती जिल्ह्यातील सुकळी रसूलपूर या गावची बबली राऊत हिने सरपंचपदी आरूढ झाल्यानंतरही यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात अपूर्ण राहिलेले शिक्षण घेऊन आणि राजकीय सहभागातून ग्रामीण भागातील महिलांची सामर्थ्यशीलता वाढू लागल्याचे दाखवून दिले आहे.



२००२ मध्ये लग्न होऊन बबली सासरी आली. पती गणेश वासनिक हे वाहनचालकाचे काम करायचे, तर सासरे मुरलीधर वासनिक यांचा शेतीचा व्यवसाय होता. एकीकडे बबली संसाराचा गाडा आनंदाने पुढे नेत असताना दुसरीकडे स्थानिक राजकीय गटबाजीमुळे अस्वस्थ होऊ लागली. रस्त्यांची बिकट अवस्था, शाळेच्या खोल्यांचे अपूर्ण बांधकाम, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गावकऱ्यांना सतत भेडसावत होता. सुकळी-रसूलपूर या दोन गावांना जोडणाऱ्या पुलाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. त्यामुळे पावसाळ्यात विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. एकूणच गावातील विकासकामे ठप्प झाली होती. अशा परिस्थितीत राजकारणाचा कोणताही गंध नसलेल्या बबलीने महिला राखीव गटातून २००७ ची ग्रामपंचायत सदस्यपदाची निवडणूक लढण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि त्या निवडणुकीत ती विजयी झाली. देशाच्या कारभारातला ग्रामपंचायत हा सगळ्यात तळातला घटक आहे. शासकीय योजना गावपातळीपर्यंत खेचू आणून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी कणखर व्यक्तिमत्त्वाची गरज असते. परंतु बबली ही गावची सून आणि सुनेने गावचा कारभार हाकाव अशा वातावरणात पदाच्या आरक्षणानुसार ती थेट सरपंच झाली आणि आ गावाचा कायापालट झाला.

सरपंच म्हणून हातात सत्ता आल्यावर योग्य वापर करून गावकऱ्यां जास्तीत जास्त फायदा करून देणे, सरकारी योजना राबवणे, त्यांच अंमलबजावणी करणे या सगळ्य जबाबदाऱ्या बबली आपल्य क्षमतेनुसार समर्थपणे हाताळ असताना अपूर्ण शिक्षणामु येणाऱ्या उच्च स्तरावरी प्रशासकीय अडचणींना सामो जाताना तिची घुसमट वाढत होती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच आदर्श ती मानत असल्या 'शिका आणि संघटित व्ह या विचाराने प्रभावित होऊनह आपण दहावी नापास असल्या शल्य तिला सतत बोचत होत या वैचारिक संघर्षातून ती घोळ निघत असताना दुसरीकडे तिच्याच काळातील इतर महिलांची विवि क्षेत्रातील कामगिरी, झपाट्याने बदलणारं सांस्कृतिक पर्यावरण, स्त्रीजीवन झालेली परिवर्तने या बदलांचा परिणाम तिच्या मानसिक घडणीवर हो गेला. त्याचवेळी गावातील आदिनाथ नांदणे या पत्रकाराने बबलीला पुढी शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. तिच्या आत्मविश्वास निर्माण केला. ए नवी दिशा दिली आणि शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बबलीने अ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतला.

मुक्त विद्यापीठाचा 'पूर्वतयारी शिक्षणक्रम' उत्तीर्ण केल्यानंतर तिचा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन अधिक प्रगल्भ होत गेला. त्या बदलत्या आत्मभानाचा अधिक सकसतेने व ताकदीने वेध घेत, अर्ध्यावर शिक्षण सोडलेल्या स्वतःच्या नणंदेसह गावातील इतर महिलांनादेखील शिक्षणासाठी प्रवृत्त करून, मुक्त विद्यापीठात प्रवेश मिळवून दिला. 'स्व'ची जाणीव झालेल्या, स्वतःचा शैक्षणिक मार्ग निवडणाऱ्या बबलीने पूर्वतयारी शिक्षणक्रमानंतर मुक्त विद्यापीठाच्याच 'जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या' या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि आजतागायत शिक्षण सुरूच ठेवले आहे.

बबलीने मागील तीन वर्षांच्या सरपंचपदाच्या कार्यकाळात गावातील रस्ते, खडीकरण, डांबरीकरण, राजीव गांधी निराधार आवास योजनेतून लाभार्थ्यांना घरकुले, सर्वशिक्षा अभियानअंतर्गत शाळेच्या खोल्यांची दुरुस्ती तसेच सुकळी-रसूलपूर या गावांना जोडणाऱ्या मुख्य पुलाचं बांधकाम करून गावकऱ्यांना रस्ता उपलब्ध करून दिला. नियमित ग्रामसभा घेऊन गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेत त्यांचे प्रश्न निकाली काढून गावाला विकासाच्या दिशेने नेले. महिलांच्या सामाजिक, आर्थिक गरजा ओळखून महिलांनी केवळ कौटुंबिक चौकटीत न अडकता त्यांच्या विकासासाठी महिला बचत गटाची स्थापना केली. घरबसल्या व्यवसाय आणि रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टीने बँकेत खाते उघडून अनुदान जमा करण्याची सवय लावली. महिलांचा थेट निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढवून आपल्या आंतरशक्तीचा परिचय प्रशासनाला करून दिला. गावाच्या विकासाच्या प्रश्नांकडे ते सोडवताना येणाऱ्या अडचणींकडे, त्या अडचणींवर योजण्याच्या उपायांकडे महिलांच्या नजरेतून बघण्याची दृष्टी दिली. त्यामुळे आज गावाची विकासाची भूमिका आणि कृती समतोल बनली.

शिक्षणाने बबलीला आलेला आत्मविश्वास, अंतर्मनातील उर्जा आणि मनापासून काम करण्याची शक्ती मिळाली. तिने केवळ बुद्धीने निर्णय घेण्याऐवजी बुद्धी आणि भावना दोन्हींचा समतोल राखून आत्तापर्यंत गावाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. सचोटी आणि प्रामाणिकपणाच्या गुणांवर सरपंच म्हणून आपले वेगळं निर्माण केले. घर आणि सरपंचपदाची दुहेरी जबाबदारीही आतापर्यंत संयमाने आणि समर्थपणे पेलली. अजूनही गावातील अज्ञानाआड दडलेल्या अनेक रूढीपरंपरेने जखडून ठेवलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी तिला ताकदीने निर्णय घ्यायचे आहे तसेच पुढील दोन वर्षांच्या कार्यकाळात महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि कृषी विकासावर भर देणार असल्याचे बबली सांगते.

# यशोगाथा



## विठोबा सावं[त]

# पत्रकारितेच्या वारीतील विठोबा

पत्रकारिता... एक आव्हानात्मक क्षेत्र बनले आहे. त्यातही इलेक्ट्रॉनिक माध्यमात काम करायचे असेल तर सर्जनशीलता आणि वेग या दोन्ही गोष्टी खूप महत्त्वाच्या. दिवसभर बातम्यांचा रतीब घालताना अजिबात उसंत नसते. हे आव्हान पेलताना कल्पनाशक्ती, लेखनकौशल्य आणि तांत्रिक माहिती याची गरज असते आणि हे कौशल्य..., अनुभव... प्रशिक्षणातून मिळत जातो.

मी पत्रकारितेत आलो तो बी.ए.झाल्यानंतर. बारावीपर्यंतचं शिक्षण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हरकूळ खुर्द आणि फोंडाघाट येथे पूर्ण केल्यानंतर पदवीचे शिक्षण मुंबईत घेतले. मुंबईत वृत्त मानस आणि नंतर साप्ताहिक महाराष्ट्रमध्ये काही महिने उपसंपादक-वार्ताहर म्हणून काम केल्यानंतर थेट ई टीव्हीत नोकरी मिळाली आणि थेट इलेक्ट्रॉनिक माध्यमात काम करण्याची संधी चालून आली. मराठी वृत्तवाहिन्या तेव्हा नुव्यानेच आल्या होत्या आणि या माध्यमाची आम्हा नवख्या तरुणांसह सर्वांनाच नवलाई होती. प्रत्येक तासाला पाच मिनिटांच्या बातम्या आणि दिवसभरात अर्ध्या तासाची ठरावीक बातमीपत्रे असे त्यावेळच्या इन्फोटेन्मेंट चॅनेलमधील बातम्यांचं स्वरूप होते. त्या वेळी पत्रकारितेचे शिक्षण देणाऱ्या संस्था फारच कमी होत्या आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाबाबत प्रशिक्षण देणारे अभ्यासक्रम तर जवळजवळ नव्हतेच. आमचे अनेक सहकारी या नव्या माध्यमात काम करता करता शिकत गेले आणि विस्तारणाऱ्या या क्षेत्रात नव्या संधी मिळवत राहिले.

पत्रकारितेची आवड हेच माझ्यासारख्या अनेकांचे या क्षेत्रात येण्याचे कारण ठरले. मला पाच-सहा वर्षांच्या या प्रवासानंतर पत्रकारितेचं औपचारिक शिक्षण घ्यावे असे वाटले आणि अर्थातच पूर्णवेळ नोकरी करत असल्याने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पत्रकारिता अभ्यासक्रमाचा पर्याय पुढे आला. तेव्हा मी ई टीव्ही सोडून बेळगाव तरुण भारतच्या मुंबई ब्युरोत मंत्रालय रिपोर्टर म्हणून काम करत होतो. पत्रकारितेत असलेल्या काही मित्रांनी मिळून आम्ही मुंबईतील सेंटरवर पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आणि नंतर पदवीसाठी. प्रत्यक्ष त्या क्षेत्रात काम करत असल्याने आम्हाला हे क्षेत्र नवं नव्हतं पण औपचारिक शिक्षण म्हणून या अभ्यासक्रमाचा फायदा जरूर झाला. अनुभवातून आपण बऱ्याच गोष्टी शिकत असतो. पण या औपचारिक शिक्षणातून काही कल्पना, संज्ञा कळणे सोपे होते. अनुभवातून शिकताना त्या गोष्टींची कल्पना जरूर असते पण तज्ज्ञांच्या अभ्यास आणि अनुभवातून तय[ार] झालेल्या अभ्यासक्रमामुळे आणखी ज्ञान मिळते. यशवंतराव चव्हाण महारा[ष्ट्र] मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचा फायदा त्यामुळे मलाही जरूर झाला. शिवा[य] पत्रकारितेचे शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था या काळात निर्माण झाल्या असल्[या] तरी या विद्यापीठाच्या पदवीला सरकार मान्यता असल्याने या अभ्यासक्रमा[चं] महत्त्व त्या दृष्टीनेही वेगळे ठरले. दरम्यानच्या काळात २४ तास वृत्तवाहिन्यांच[ा] मराठीतही प्रवेश झाला आणि पहिलीच २४ तास मराठी वृत्तवाहिनी असलेल्[या] झी २४ तासमध्ये मला संधी मिळाली. इन्फोटेन्मेंट चॅनेलपेक्षा हा अनुभव वेगळ[ा] आहे. दिवसभर बातम्या देणे, त्यात नावीन्य आणणे, वेगवेगळ्या अंगाने बातम्यां[चं] सादरीकरण करणं आणि या माध्यमाचा वेग राखणं हे तसे सोपे काम नाह[ी.] कौशल्य, सर्जनशीलता याचा कस येथे क्षणाक्षणाला लागतो. या क्षेत्रात प्रचं[ड] स्पर्धा आहे. तेवढाच ताणही. या सगळ्याला व्यवस्थापनाची जोडही आता गरजेच[ी] होऊ लागली आहे. त्यामुळे पत्रकारितेच्या औपचारिक शिक्षणाबरोबर व्यवस्थाप[न] कौशल्य प्रशिक्षणाचा या अभ्यासक्रमात समावेश करण्याची गरज आहे. सोश[ल] मिडियाचं महत्त्वही वाढलं आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पत्रकारितेत होणाऱ्या य[ा] बदलांची दखल घेऊन अभ्यासक्रमात नवी भर टाकत राहील याची मल[ा] खात्री आहे. तसं झालं तर खाजगी संस्थांमध्ये महागडं शिक्षण घेणं शक्[य] नसलेल्या लाखो विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांचा निश्चितच फायदा होईल आ[णि] पत्रकारितेची ही वारी सर्वांनाच लाभदायी ठरेल.

**''पत्रकारितेच्या वारीतील काहीसे पुण्य माझ्याही पदरी पडले ते मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणानं. गेल्या काही वर्षांत पत्रकारितेचे शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था निर्माण झाल्या असल्या तरी या मुक्त विद्यापीठाच्या पदवीला शासन मान्यता असल्याने या अभ्यासक्रमाचं महत्त्व त्या दृष्टीनेही वेगळे ठरले.'' - विठोबा सावंत**

यशोगाथा



सौ. आरती अभ्यंकर

# जिद्दीला मिळाला आधाराचा हात

मी सौ. आरती अभ्यंकर, एप्रिल २०११ मध्ये बी. टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स फायनल परीक्षा पास झाले. १९ मार्च २०१२ रोजी पदवीदान समारंभ होता. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या आवारात नाशिक येथे हा समारंभ आयोजित केला होता. माझे कुटुंब आणि माझे आई-वडील असे सर्व जण पदवीदान समारंभास उत्साहाने नाशिक येथे हजर झालो. खरंच हा पदवीदान समारंभ, या समारंभाचे आयोजन, नियोजन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने चालू झाले.

ज्या विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य म्हणजे सुर्वणपदक मिळवले होते त्यांना स्टेजवर बोलावून सत्कार करण्यात आला. आपण कष्ट करून मिळविलेल्या पदवीचे आणि यशाचे अशा तऱ्हेने कौतुक होताना पाहून मन भरून आले. नंतर जेवण करून विद्यापीठाचा परिसर पाहून आम्ही नाशिकहून मुंबईकडे यावयास निघालो. पदवी घेऊन येताना आकाश अगदी ठेंगणे वाटू लागले होते पण ती पदवी मिळविण्यासाठी जे कष्ट, जो निर्धार केला होता त्याची आठवण झाली.

मी मूळची सांगलीची. शालेय शिक्षण घेताना अनेक क्षेत्रातली प्रशस्तिपत्रकांची शिदोरी घेऊन महाविद्यालयात प्रवेश घेतला. विज्ञान शाखेला असतानाही कला, क्रीडा क्षेत्रात प्रशस्तिपत्रक आणि प्रावीण्य संपादन केले. बारावी झाल्यावर मला मेडिकलला थोडक्यात प्रवेश हुकला. त्यामुळे मला पदविकेच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यावा लागला. पदविका पूर्ण झाल्यावर मला पदवी अभ्यासक्रमासाठी नांदेड इथे प्रवेश मिळाला. पण सांगलीहून नांदेड फारच लांब आहे या सबबीवर मी तो प्रवेश नाकारला. पण मनात कुठेतरी टोचत राहिले की आपण आलेली संधी घालविली. नंतर लगेचच छोट्या मोठ्या नोकऱ्या मिळत गेल्या. नोकऱ्या मात्र मला सर्व मनासारख्या मिळाल्या. त्यातलीच एक म्हणजे बायोमेडिकल इंजिनीअर हीसुद्धा. मिरजेच्या एका नावाजलेल्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये मी नोकरी केली तीसुद्धा एका नावाजलेल्या अमेरिकन डॉक्टरांसोबत. तिथे नोकरी करताना खूप नवनवीन अनुभव येत होते. ही नोकरी सुरू असतानाच मला रेडिओ आणि दूरदर्शनची नोकरी करण्याची संधी मिळाली. केंद्र सरकारची नोकरी असल्याने मी या सेवेत रुजू झाले. माझी नियुक्ती मुंबईला झाली. पाठोपाठ लग्न होऊन मी मुंबईलाच स्थायिक झाले.

सांगलीहून मुंबईला आल्यावर सुरुवातीला जरा धावपळीची सवय होईपर्यंत जडच गेले. पण हळूहळू धावपळीची सवय झाली. रोज डोंबिवलीहून वरळीला जायचे त्यातून इंजिनीअरची ड्यूटी ही चारही पाळ्यात सुरू असायची. घरात माझ्या मुलाला सांभाळायला माझ्या सासूबाई असल्याने तणावरहित अशी मी नोकरी करू लागले. दूरदर्शन केंद्रामध्ये आमचे काम म्हणजे वेगवेगळ्या कार्यक्रमांचे चित्रीकरण करून ते रेकॉर्ड करणे आणि प्रक्षेपण करणे. हे काम करतानासुद्धा नवनवीन माहिती मिळू लागली. वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवर मंडळी, कलाकार, साहित्यिक, कवी, अर्थतज्ज्ञ, डॉक्टर, समाजसेवक, राजकीय पुढारी अशा समाजातील अनेक कर्तृत्ववान लोकांच्या मुलाखती, भेटी यांचे रेकॉर्डिंग करताना त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीची, आलेल्या अडथळ्यांची, अडथळे पार करताना आलेल्या अनुभवांची शिदोरीच मला खूप काही शिकवून गेली.

या लोकांचे अनुभव ऐकल्यावर मनात कुठेतरी वाटायचे, आपणही

**''शिक्षणाचे विशिष्ट वय असतं असा एक समज आहे. पण आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर माणूस एक विद्यार्थीच असतो, असा अनुभव मला नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने दिला. मुंबईसारख्या शहरात घर आणि नोकरी अशा दुहेरी जबाबदाऱ्या सांभाळताना माझे उच्च शिक्षण पूर्ण करण्याची संधी मला मुक्त विद्यापीठातील अभ्यासक्रमामुळे मिळाली. त्या अभ्यासक्रमातील ज्ञानाचा फायदा मला माझ्या नोकरीत करून घेता आला. अनेक अडथळ्यांना सामोरे जात जे पारंपरिक विद्यापीठात साध्य झाले नसते ते उद्दिष्ट मला मुक्त विद्यापीठामुळे गाठण्यात मदतच झाली. माझ्या मनातील जिद्दीला विद्यापीठाचा आधाराचा हात मिळाला.''**

**- सौ. आरती अभ्यंकर**

काहीतरी केले पाहिजे. पण मुलगा लहान असल्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष करून मला काही मिळवायचे नव्हते. प्रथम प्राधान्य त्याचे भविष्य घडवायचे मग आपले करिअर वगैरे. त्याचा अभ्यास घेणे, त्याला मार्गदर्शन करणे या गोष्टींकडे मी प्रथम लक्ष दिले. मुलगा हळूहळू मोठा झाला. बारावी झाला. त्याला मुंबईतल्या नावाजलेल्या इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला आणि माझ्या मनातील एक इच्छा जोर धरू लागली. आपणही आता परत राहिलेले शिक्षण का पूर्ण करू नये? असा विचार मनात घोळू लागला पण आता वय बरेच वाढले होते. इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त करण्यासाठी मला आता कोण प्रवेश देणार? चाळिशी उलटल्यावर हा विचार मनात येऊन काय उपयोग? असेही विचार मनात आले.

आमच्या घराजवळ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची एक शाखा होती. बरेच दिवस मीही पाहत होते पण आत जाऊन चौकशी कशी करायची ते आता काय म्हणतील असे अनेक प्रश्न भेडसावत होते.

पण एक दिवस चौकशी करून आले. आपल्याला कशा प्रकारच्या अभ्यासक्रमाची निवड करायची आहे, कशी करायची आहे याची सर्व माहिती मी गोळा केली. या माहितीच्या आधारे लवकरच मी बी.टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यायचे ठरविले. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मी माझा प्रवेश पक्का केला. या अभ्यासक्रमामध्ये मला एकूण तीस पेपर्स सोडवायचे होते. अभ्यासक्रमात समाविष्ट केलेले विषयसुद्धा माझ्या आवडीचे होते. विषयांची मांडणी अतिशय सोप्या पद्धतीने केली होती. अशा तऱ्हेने अभ्यासक्रमाची आखणी पाहून मी मनाशी ठरवून टाकले, काहीही झाले तरी हा अभ्यासक्रम पूर्ण करायचा. कमीत कमी आपले ज्ञान तरी अपडेट होईल. प्रवेशप्रक्रिया पूर्ण केली खरी पण प्रश्न होता आता इतक्या वर्षांनी आपल्याला सर्व काही जमेल का? कारण कॉलेज सोडून म्हणजे पदविका पास होऊन बावीस वर्षे झाली होती. आता अभ्यास करणे, परीक्षा देणे वर्गात बसून शिकणे, प्रॅक्टिकल करणे याची सवय मोडली होती. शिवाय बरोबरीचे सर्व विद्यार्थी कमी वयाचे, आपणच तेवढे सीनिअर विद्यार्थी. त्यातून घरातून खूप पाठिंबा असा नव्हताच. पण तीव्र विरोधपण नव्हता. घरच्यांनी असहकार घोषित केला नाही एवढेच. तू तुझी नोकरी, घरच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये करून हे सर्व करू शकशील का एवढेच त्यांचे विचारणे होते. पण मला आतून वाटत होते की, आपण हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकू.

पण इतक्या वर्षांनी इतका मोठा खंड पडल्यावर सुरुवातीला कोणताही विषय समजायचा पण लिहिताना मात्र जड जायचे. लिहिण्याचा वेग कमी झाला होता. सुरुवातीचे माझे पहिले सत्र होते डॉट नेटवर्किंग. हा विषय माझ्यासाठी खूप नवीन होता. जाड जाड पुस्तके पाहिल्यावर वाटले पुस्तकाचे एकेक पान तरी वाचून होईल का माझ्या हातून. दर शनिवार आणि रविवारी सकाळी क्लास सुरू झाले. माझी शिफ्ट ड्यूटी असल्याने सुरुवातीला सर्व सुरळीत सुरू झाले पण नंतर अडचणी सुरू झाल्या. मग मी अभ्यास करण्यासाठी रात्रपाळी करू लागले. रात्री ऑफिसमधील काम संपल्यावर दिवसभरात काय शिकविले याची उजळणी करावी लागे. पहिल्या सत्राचा अभ्यास बराच पूर्ण होत आला असताना विद्यापीठाकडून अचानक अभ्यासक्रम बदलल्याची सूचना आली. परीक्षेला फक्त एक महिना उरला असताना परत सर्व पुस्तके बदलली. परत नव्याने अभ्यास सुरू झाला. त्यातच माझ्या सासूबाईंची तब्येत बिघडली. परीक्षेला फक्त वीस दिवस राहिले होते आणि त्यांना दवाखान्यात ॲडमिट करावे लागले.

घर, नोकरी आणि दवाखाना, अभ्यास याची तारेवरची कसरत करत करत मी परीक्षा दिली. सुरुवातीला पेपर लिहिण्यास वेग येईना. तीन तास पेपर लिहिण्यास वेळ लागला. असेच चिकाटीने पाच पेपर लिहिले. परीक्षा संपली आणि माझ्या सासूबाईंचे निधन झाले. अभ्यासाला वेळ कमी पडल्यामुळे माझा एक विषय राहिला. पण आता पहिल्यापेक्षा बराच आत्मविश्वास वाढला होता. परीक्षेचा नव्याने अनुभव आला होता आपला लिहिण्याचा वेग वाढविला की, आपल्याला सर्व काही जमेल असे वाटू लागले. मागच्या सत्रामध्ये झालेल्या चुका आणि राहिलेल्या त्रुटी सुधारून पुन्हा दुसऱ्या सत्राच्या तयारीला लागले. आता घरात मदतीला सासूबाई नव्हत्या घरची सगळी जबाबदारी माझ्यावर पडली होती. नवीन सत्राचे पाच विषय आणि मागील सत्रातील एक असे सहा पेपर मी दिले.

या सत्रामध्ये मात्र मी मागच्या अपयशाची कारणे शोधून वेळेचे आणि अभ्यासाचे गणित घातले होते. काळ, काम आणि वेग याचे नियोजन आखणीबद्ध रीतीने केले तरच आपले साध्य पूर्ण होईल हे कळून चुकले म्हणून मी वेळ मिळेल तेव्हा अभ्यासाची पुस्तके चाळू लागले. कमीत कमी काही गोष्टी वारंवार डोळ्याखालून गेल्यामुळे विषयाचे आकलन लवकर होऊ लागले. रोज रात्री झोपताना आज आपण काय वाचले यावर चिंतन मनन करू लागले. उद्या काय वाचायचे याचे नियोजन करू लागले. हळूहळू अभ्यासाचा वेग वाढू लागला. कोणताही विषय पटकन समजू लागला. दो सत्रे पूर्ण झाल्यावर आणखी एक अडचण दत्त म्हणून हजर झाली. मी ज्या संस्थेतून प्रवेश घेतला होता तिथे फक्त दोनच सत्रे शिकवायची परवानगी होती त्यामुळे मला आता दुसऱ्या संस्थेत नाव नोंदवून पुढील अभ्यासक्रम पूर्ण करण्याशिवाय पर्याय नव्हता.

मग मी ऐरोलीच्या दत्ता मेघे महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे जायचे म्हणजे दोन लोकल बदलून जावे लागे. आता मात्र वाटू लागले की इतके सगळे आपल्याला जमेल की नाही? मनाचा निर्धार करून मी तिथल्या महाविद्यालयात जाऊ लागले. तिथला अभ्यासक्रम कोण, कसे, केव्हा शिकवितात याची माहिती मिळविली. पण दर शनिवारी मी रात्रपाळी करून सकाळी साडेदहा ते दुपारी एक पर्यंत क्लासला जाऊ लागले पण या वेळी मात्र तब्येत साथ देईनाशी झाली. थकवा जाणवू लागला. मग मी ठरविले फक्त जेव्हा काही अडचण असेल तेव्हा कॉलेजला जायचे बाकी इतर वेळी घरीच अभ्यास करावा. जाण्यायेण्याच्या वेळात आपला घरीच अभ्या होईल व श्रमपण वाचतील, असा विचार करून फक्त आवश्यक असे तेव्हाच मी क्लासला जाऊ लागले. परीक्षेच्या आधी फक्त १५ दिवस मी सुटी घेत असे. आणखी एक विचार मला सुचला तो म्हणजे या पंधरा दिवस आधी मी माझ्या बाबांना इकडे बोलवण्याचा. ते इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग

प्राध्यापक असल्याने त्यांची मदत झाली. शेवटच्या दोन सत्रांच्या वेळी आणखी एक समस्या उभी राहिली ती म्हणजे मला टायफाइड झाला. दोन वेळा उलटल्यावर मला दवाखान्यात भरती व्हावे लागले. योग्य उपचार झाले तेव्हा कुठे बरे वाटले. आजारपणामुळे बराच अभ्यास बुडाला होता. मनात विचार आला यावेळी परीक्षेला बसावे की नाही पण दुसरे मन सांगत होते, काही नाही नेटाने अभ्यास कर, अजून वेळ गेलेली नाही. त्याप्रमाणे १५ दिवस रात्र मेहनत करून अभ्यास केला आणि सर्व विषय सोडविले. राहिले आता शेवटचे सत्र पण त्या वेळीही अडचणींनी पाठ सोडली नाही. या वेळी मला चिकुनगुणिया झाला. चिकुनगुणियामुळे चालतासुद्धा येत नव्हते. पण परत माझ्या बाबांच्या मदतीने बसून अभ्यास पूर्ण केला. चिकाटीने सर्व पेपर लिहिले. नेहमीप्रमाणे या परीक्षेतसुद्धा यश मिळालेच.

अशा अनेक अडचणींवर मात करत जिद्दीने बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स ही पदवी मी संपादन केलीच आणि माझ्या मुलाबरोबर लावलेली पैज जिंकलेसुद्धा! आयुष्यात प्रामाणिकपणे आणि चिकाटीने केलेल्या प्रयत्नाला अखेर यशाची गोड फळे आलीच...

# यशोगाथा



## डॉ. दीपक साळवे

## अखेर फाईल मंजूर झाली...!

आयुष्यात काहीतरी करून दाखविण्याची मनीषा बाळगणाऱ्यांना डॉ. दीपक महादेव साळवे यांच्यासारख्यांच्या गोष्टी अतिशय प्रेरणादायी ठरतात. एका अतिशय गरीब घरात जन्मलेल्या डॉ. साळवे यांनी अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करून दाखविली आहे.

त्यांचे वडील एका हॉस्पिटलमध्ये वॉर्डबॉयचे काम करीत आणि आई साधी गृहिणी होती. अतिशय प्रतिकूल परिस्थिती असूनही दीपकला डॉक्टर करण्याचे त्यांचे स्वप्न होते. मेहनती आणि उत्साही दीपकलाही वडिलांची इच्छा पूर्ण करण्याची जिद्द होती. पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते.

मनात खूप इच्छा आकांक्षा घेऊन मोठ्या उमेदीने दीपक मुंबईत आपल्या बहिणीकडे आला. बहीण आणि मेहुण्यांनी त्याला मदत करण्याचे आश्वासन दिले होते. वैद्यकीय शिक्षणासाठी लागणारा पैसा जवळ नसल्यामुळे नाइलाजाने त्याला कॉमर्सकडे वळावे लागले. पुढे याच क्षेत्रात दीपकला नेत्रदीपक यश मिळेल असे तेव्हा कोणालाही वाटले नव्हते. झेरॉक्सच्या दुकानात काम करून आपल्या शिक्षणासाठी दीपक पैसे कमावू लागला. त्यानंतर मुरूगप्पा ग्रुपमध्ये शिपाई म्हणून कामाला सुरुवात करून विक्री अधिकारी आणि त्यानंतर सुधीर जेनसेट येथे व्यवस्थापक या पदापर्यंत दीपक पोचला. दीपकचा शैक्षणिक क्षेत्राकडे ओढा होता. त्याच क्षेत्रात काम करण्याचे ठरवून २००१ सालापासून दीपक तिकडे वळला. २००६ मध्ये त्याला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रॅन्टरोड येथील कार्यालयात परीक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. डॉ. विद्या हट्टंगडी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएचडीची तयारी सुरू केली. बरीच चर्चा आणि विचार करून विषय ठरला. मुक्त विद्यापीठाच्या अनेक कर्मचाऱ्यांनी या वाटचालीत त्यांना साथ दिली आणि त्यांचे मनोबल वाढविले. मुक्त विद्यापीठ त्यांना एखाद्या मार्गदर्शकाप्रमाणे वाट दाखव[त] राहिले. पावलोपावली त्यांना मनापासून सर्वतोपरी मदत करणारी माण[से] भेटली. मुक्त विद्यापीठाचे माजी उपकुलगुरू डॉ. पंडित पलांडे, डॉ. सु[...] पाटोळे आणि डॉ. संजय, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे संचाल[क] कप्तान यांचे त्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.


दीपक यांचा प्रबंध प्रथम मंजूर झाला नाही. त्यात काही बद[ल] सुचविण्यात आले. बऱ्याच प्रयत्नांनंतर त्यांचा प्रबंध मंजूर झाला आणि त्यांच्या नावापुढे डॉक्टरेट ही पदवी लागली. मात्र हे बघायला त्यांचे वडील हयात नव्हते याचे त्यांना मनोमन दुःख होते.

डॉ. दीपक यांच्यासमोर एकामागोमाग एक आव्हाने येत गेली. त्यातू[न] तावूनसुलाखून बाहेर येताना ते अधिकाधिक मजबूत बनत गेले. त्यांचा प्रबंध पूर्ण झाल्यावर २०११ मध्ये शासननियमानुसार त्यांना वेतनवाढ मिळायला हवी होती पण त्यांनी त्यांची फाइल पुढील कार्यवाहीसाठी पाठविल्याव[र] त्यांना एक धक्कादायक बातमी मिळाली. मुक्त विद्यापीठामध्ये संपाद[न] केलेली ही पदवी ही वेतनवाढीसाठी स्विकारता येत नाही, असे त्यां[ना] कळविण्यात आले. त्यांनी डॉ. पंडित पलांडे यांचा सल्ला घेतला[.] विद्यापीठाच्या उपकुलगुरूंना पत्र लिहून कळविण्यास सांगितले. डॉ. पलां[डे] यांनी संचालक, उच्च शिक्षण पुणे आणि मंत्रालयातील संबंधित अधिका[री] यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. भगीरथ प्रयत्नांनंतर डॉ. दीप[क] यांची फाइल मंजूर झाली.

''मी स्वतःला अजूनही विद्यार्थीच समजतो. मी जिथे शिकलो तिथे[च] परिक्षक म्हणून काम करण्याचे भाग्य मला मिळाले आहे. जे काही मुक्[त] विद्यापीठासाठी करण्यासारखे आहे ते मी नक्कीच करीन.''

# यशोगाथा

## रमेश घोलप



## इच्छा तेथे मार्ग...

'इच्छा तेथे मार्ग ही म्हण आपल्या सर्वांच्याच परिचयाची आहे. नेटाने प्रयत्न केल्यास क्षेत्र कुठलेही असो यश हमखास मिळतेच. आपल्या अवतीभोवती विविध क्षेत्रातील अशी अनेक मंडळी यश मिळवण्यासाठी सातत्याने धडपडत असतात, प्रयत्न करीत असतात. त्यांची ही झुंज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते. असेच उदाहरण रमेश घोलप या तरूणाने सर्वांसमोर ठेवले आहे.




जन्मतःच अपंग असूनही कुशाग्र बुद्धिमत्ता, उत्तुंग यश मिळवण्याचे ध्येय व चिकाटीच्या जोरावर - मध्ये झालेल्या एमपीएससी परीक्षेत रमेश घोलप हे राज्यात प्रथम झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत याने यश संपादन केलंय.

बार्शी तालुक्यातील महागांव इथं राहणारा रमेश घोलप हा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा पदवीधर आहे. घोलप याच्या यशामुळे मुक्त आणि दूरशिक्षण पद्धतीचं प्रभावीपण सिद्ध झालं आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून एमपीएससी च्या परीक्षेत प्रावीण्य मिळविणा-या रमेश घोलपसारख्या तरुणाची कहाणी ही परीक्षा देणा-या तरुणांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरू शकेल.

छोटय़ाश्या खेडय़ातल्या रमेश घोलपने कतृत्वाच्या जोरावर साऱ्या राज्याचे लक्ष खेचून घेतले आहे. छोटय़ाश्या खेडय़ातला हा तरूण आता डेप्युटी चीफ एक्झ्युक्युटीव्ह ऑफीसर/ ब्लॉक डेव्हलपमेण्ट ऑफीसर (अप्पर ग्रेड) या मोठय़ा हुद्दय़ावर आसनस्थ होऊन कारभार हाकणार असला, तरी त्याचा आजपर्यंतचा प्रवास मात्र अत्यंत खडतर असाच होता. बारावीत ८९ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होत पुढील भविष्याची स्वप्न रंगवत असतानाच रमेशच्या वडीलांचे दुर्दैवी निधन झाले. त्याची आई घरोघरी जाऊन बांगडय़ा विकून व भाऊ खाजगी कंपनीत नोकरी करून कुटुंबाचा डोलारा कसाबसा सांभाळीत असताना त्यांना हातभार लावण्याच्या उद्देशाने रमेशने नाईलाजाने डी. एड ची पदविका मिळवली व सोलापूर येथील पालिकेच्या शाळेत शिक्षकाची नोकरी पत्कारली.

बारावीनंतर नोकरीची वाट धरली असली, तरी कसे का होईना पण ग्रॅज्युएशन पूर्ण करायचे असा ध्यासही रमेशने घेतला होता. त्यासाठी पुणे येथील यशवंतराव मुक्त विदय़ापिठाचा त्याला आधार मिळाला. येथून बी.ए ची पदवी घेत रमेशच्या आकाक्षांना अधिक धुमारे फुटू लागले आणि यापेक्षाही उंच उडी मारत यशाच्या क्षितीजाला स्पर्श करण्याचा मोह रमेशला होऊ लागला. गावात असताना लहानसे सामाजिक उपक्रम,सांस्कृतिक कार्यक्रमात रमेशचा नेहमीचाच सहभाग असायचा. त्यानंतर डी.एड च्या विदय़ार्थी संघटनेचा सेक्रेटरी आणि नेहरू युवा मंडळाचे काम करताना सामाजिक कार्याची आपसूकच त्याच्यात आवड निर्माण झाली. 'आय.ए.एस ऑफीसर होऊन शासकीय नोकरीच्या आधारे ही आवड जपत समाजाचे भले करायचा विचारही तेव्हाच त्याच्या मनात घोळू लागला. अन सुरू झाली अथक परिश्रमाची गाथा. 'युपीएससीच्या पहिल्या प्रयत्नात अपयश हाती आले,तरीही न डगमगता त्याने माग्रात्मकण करणे सुरूच ठेवले. घरच्या गरीबीशी झुंज देत कुठल्याही स्पेशल क्लासच्या आडमार्गाने न जाता दिवसातील सोळा-सोळा तास अभ्यास करीत या पठ्ठय़ाने दुसऱ्या प्रयत्नात थेट महराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत प्रथम क्रमांकाला गवसणी घालत केंद्रीय लोकसेवा आयोगातही बाजी मारली.

- संतोष साबळे

# यशोगाथा



रविंद्र आखाडे

## वृत्तपत्रविक्रेता ते उपसंपादक

दहावीत तब्बल पाच विषयांत नापास असतानाही मुक्त विद्यापीठातून पत्रकारितेची पदवी पूर्ण करून सध्या नाशिकमधील एका आघाडीच्या दैनिकात उपसंपादकपदावर कार्यरत असलेल्या एका दहावी नापास मुलाची गोष्ट त्याच्याच शब्दात... पंधरा वर्षांपूर्वी कोण्या ज्योतिषाने जरी मला सांगितले असते की, भविष्यात तू पत्रकार होणार आहेस, तर माझा त्यावर विश्वास बसला नसता. कारण त्या वेळची घरची आर्थिक परिस्थिती आणि माझी शैक्षणिक पात्रता बघता कुणाचाही यावर विश्वास बसला नसता.

आम्ही मूळचे संगमनेर तालुक्यातले, परंतु रोजगारासाठी वडील नाशिकमध्ये स्थायिक झाले. माझा जन्म नाशिकचाच, वडील हमाल, तर आई विडी कामगार, घरात अठराविश्व दारिद्र्य. वडिलांना दारूचे व्यसन. आम्ही चार भावंडे. त्यात थोरली बहीण आणि त्यानंतर आम्ही तिघे भाऊ. माझ्यापेक्षा एक मोठा, तर एक लहान भाऊ. अशा परिस्थितीत आई-वडिलांनी स्वतः उपाशी राहून आम्हा भावंडांचे शिक्षण केले. आम्हीही तिघा भावंडांनी शाळा शिकता-शिकता मिळेल ते काम करत कुटुंबाला हातभार लावला.

पुढे मी पेपरची लाइन टाकायला सुरुवात केली. याबरोबरच माझ्या मामांनी पानटपरी टाकून दिली. पहाटे पेपरची लाइन, सकाळी शाळा आणि दुपारनंतर पानटपरी असा माझा दिनक्रम सुरू झाला. अभ्यासाकडे दुर्लक्ष झाल्याने नववीपर्यंत पहिल्या पाचमध्ये उत्तीर्ण होणारा मी दहावीला नापास झालो. नुसता नापासच नाही तर तब्बल पाच विषयांत धप्पा. केवळ विज्ञान हा एकच विषय पास झालो. बरोबरची मुले पुढे निघून गेली. त्यामुळे पुढे शिकण्याची इच्छाच राहिली नाही. शिक्षण बंद झाल्याने पेपरची लाईन आणि पानटपरीकडे पूर्णवेळ लक्ष देऊन व्यवसायात प्रगती करण्याकडे लक्ष केंद्रित केले. माझ्यापाठोपाठ लहान भावानेही दहावीनंतर शिक्षण बंद केले. त्याचीही मला व्यवसायात मदत होऊ लागली. आता कशीबशी घरची परिस्थिती आवाक्यात आली होती. दरम्यानच्या काळात बहिणीचे लग्न झाले. आम्ही दोघांनी शिक्षण बंद केले; धाकट्या भावाने मात्र जिद्दीने शिक्षण सुरूच ठेवले. दहावीला तब्बल ७८ टक्के गुण मिळवूनही त्याने लवकर नोकरी मिळेल या आशेने आयटीआय केले. त्यानंतर सिन्नरच्या एका कंपनीत प्रशिक्षणार्थी म्हणून काम केले. एके दिवश कंपनीत बॉक्स पॅकिंगच्या पेपरवर 'युपीएससी' विषयी माहिती त्याच्या वाचना आली. घरी आल्यावर त्याने घरात 'युपीएससी'विषयी माहिती सांगितली. मल आयएएस व्हायचेचं, असं आत्मविश्वासाने सांगत त्यासाठी केवळ तुमच्य पाठिंब्याची गरज असल्याचे तो म्हणाला. भाऊ, तू बिनधास्त तयारी कर. आम्ह आहोत घरचे सांभाळून घ्यायला, असे सांगत आम्हीही पाठिंबा दर्शविला. भा यूपीएससीच्या तयारीला लागला. यासाठी त्याने पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करू थेट पुणे गाठले.

इकडे मी व लहान भाऊ टपरी व पेपरची लाइन सांभाळू लागलो. टपरीव बसल्या-बसल्या मला वृत्तपत्रांमधील आवडणारे लेख, बातम्या, अग्रलेख यां कात्रण जमा करण्याचा छंद जडला. यातूनच आपणही पत्रकार व्हावे, अश मनात इच्छा निर्माण झाली. एकदा मोठ्या भावाला याविषयी विचारल्यावर त्या मला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून पत्रकारितेची पदवी पू करण्याचा सल्ला दिला. नुसता सल्लाच नाही तर, त्यासाठीचा अर्जही भाव माझ्याकडून भरून घेतला. त्या वेळी दहावी अनुत्तीर्ण असताना पदवी क मिळू शकेल, असा प्रश्न मला पडला होता. मग सर्वप्रथम मी मुक्त विद्यापीठा पूर्वतयारीची परीक्षा उत्तीर्ण केली. त्याआधारे पुढे तीन वर्ष पत्रकारितेची पद पूर्ण केली. त्यानंतर सुरुवातीस 'लोकमत'मध्ये वार्ताहर म्हणून, तर 'देशदूत'म उपसंपादक म्हणून काम केले. काही दिवसांनी पुन्हा 'लोकमत'मध्ये उपसंपाद म्हणून बोलावणे आले. आज तीन वर्षांपासून मी लोकमतमध्ये उपसंपाद म्हणून कामगिरी बजावत आहे. विशेष म्हणजे दैनिकात रुजू होण्यापूर्वी म संगणकाचे शून्य ज्ञान होते. दैनिकात रुजू झाल्यानंतर मी संगणक हाताळण्या शिकलो. आजही मी दहावी नापास आहे मात्र; पुणे विद्यापीठातून ए जर्नालिझमच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत आहे हे सर्व शक्य झाले ते केव मोठ्या भावाचे मिळालेले मार्गदर्शन आणि मुक्त विद्यापीठाने माझ्यासार विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेली शिक्षणाची संधी यामुळेच.

# यशोगाथा



## स्वामिनी वाघ

# शिक्षणाची स्वामिनी

मला काय व्हायचंय? या प्रश्नाशी निगडीत स्वप्न आपण बालवयापासूनच रंगवीत असतो. पुढे प्रत्येक वळणावर भोवतालची परिस्थिती आणि आपली स्वप्ने यांची सांगड आपण घालत असतो. आपल्या मध्यम वयातही आपले उच्च शिक्षण सुरू राहावे असे स्वप्न मीही बघितले. आपले स्वप्न केवळ स्वप्नच राहणार अशी भीती वाटत असताना मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणप्रणालीने हात दिला. अन् मी माझ्या स्वप्नापर्यंत पोचले.

बी.एस्सी.पर्यंतच शिक्षण मग लग्न, लग्नानंतर बी.एड. पुढे शिक्षिकेची नोकरी असा माझा साधारण प्रवास सुरू होता. अधूनमधून उच्च शिक्षणाचे स्वप्न मनात डोकावत होते पण माझ्याकडे पदव्युत्तर पदवी नव्हती. हा प्रश्न कसा सोडवावा, अशा विचारात असतानाच २००५ साली मला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची माहिती मिळाली.



विद्यापीठातील शैक्षणिक सेवा विभागाच्या पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च प्रोग्रामची (पी.जी.आर.पी.) माझे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी मदत झाली.

नोकरी अन् शिक्षणाची सांगड घालता येईल का? शिक्षणासाठी सुट्ट्यांचे गणित कसे जमेल? कोणाचे मार्गदर्शन मिळेल का? अशा अनेक शंका मनात घेऊनच मी माहितीपत्रक उघडले.

रोज कॉलेजला जाण्याची गरज नाही. फक्त कृति सत्रांना उपस्थित राहायचे तेही शनिवारी अन् रविवारी. मे महिन्यात परीक्षा द्यायची हे वाचून खूपच हायसे वाटले.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण संकल्पनेशी माझा परिचय होत होता. अभ्यासक्रमाचे विषयही खूप वेगळे आणि चांगले वाटले. मुख्य म्हणजे या अभ्यासक्रमात संशोधनासाठीही मोठी संधी होती. संशोधनाचे स्वप्न गाठण्यासाठीच मी एम.ए. (शिक्षण संप्रेषण) या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला.

संप्रेषण हा माझ्या अभ्यासक्रमातील मुख्य विषय. संप्रेषणाशिवाय आजच्या जगाची कल्पनाही करता येत नाही. आणि प्रभावी संप्रेषण दर्जेदार शिक्षणप्रणालीत मोलाची भूमिका बजावते.

'शिक्षणातील संज्ञापन प्रकार' या विषयाच्या अभ्यासाने मला विद्यार्थी, पालक, सहकारी आणि मुख्याध्यापक या सर्वांशीच सुसंवाद साधता आला.

'अनुदेशन प्रणाली अभिकल्प' या विषयाच्या अभ्यासाने माझ्या अध्यापनकार्यात सुसूत्रता आली. आपल्याला कोणती उद्दिष्टे साधायची आहेत? ते कार्य पद्धतशीरपणे कसे करता येईल? कार्यपूर्तीसाठी कोणते प्रशिक्षण आवश्यक आहे? अशा तऱ्हेने सर्वांगीण

> **"यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेण्याचा माझा अनुभव अत्यंत आनंददायी आहे. माझ्या स्वप्नाची उमेद विद्यापीठाने जागविली आहे. त्यामुळे माझा माझ्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि आत्मविश्वास उंचावला आहे."**
>
> **- स्वामिनी सुनील वाघ**

दृष्टीने विचार करण्याची सवय लागली.

'मुल्यनिर्धारण आणि मूल्यमापन' या विषयाच्या अभ्यासामुळे रोजच्या अध्यापन-अध्ययन कार्यालाही चांगली दिशा मिळत गेली.

या अभ्यासक्रमाचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे संशोधन. संशोधन प्रकल्पासाठी 'साधन निर्मिती' या विकल्पाची मी निवड केली. एच.आय.व्ही.-एड्सबद्दल सोप्या आणि चित्रमय रूपाने माहिती देण्यासाठी मी एक सी.डी. बनविली आणि संप्रेषणाच्या दृष्टिने या साधनाच्या उपयुक्तते बद्दल संशोधन करून त्याचा अहवाल तयार केला.

आपल्याच शालेय कार्याशी निगडित या संशोधनामुळे मला नवीन वैचारिक दृष्टिकोन आणि नवनिर्मितीचे समाधानही मिळाले. आपल्यासमोर उभ्या असलेल्या एखाद्या समस्येचा चहूबाजूंनी कसा विचार करायचा? त्यावर वेगवेगळे उपाय कसे शोधायचे? आणि ते कशा तऱ्हेने अमलात आणायचे? असा चौकस विचार करण्याची दृष्टी मला मिळाली.

या अभ्यासक्रमाचा मला वैयक्तीक आणि व्यावसायिक जीवनातही खूप उपयोग झाला. माझ्या अध्यापनाचा दर्जा उंचाविण्यासोबतच पुढील शिक्षणाची दारेही उघडली.

या अभ्यासक्रमात ७१ टक्के गुण मिळवून महाराष्ट्रात पहिली आल्यामुळे यशवंतराव चव्हाण सुवर्णपदक आणि महाराष्ट्र शासनाचे 'दादासाहेब गायकवाड पारितोषिक' तसेच श्री. सुरेश शिवराम साळुंखे यांनी प्रायोजिलेले गुणवंता शिवराम साळुंखे पारितोषिक अशी तीन पारितोषिकेही मला मिळाली.

अतिशय नयनरम्य आणि नियोजनबद्ध अशा दीक्षांत समारंभात, 'द ओपन युनिव्हर्सिटी, यू.के.'या इंग्लंडमधील जगातल्या पहिल्या मुक्त विद्यापीठाच्या तत्कालीन मा. कुलगुरू प्रा. ब्रँडा गुर्ली यांच्या हस्ते ही पारितोषिके प्रदान करण्यात आली.

यामुळे अर्थातच माझा आत्मसन्मान उंचावला. अन् आयुष्यभरासाठ सुखद आठवणीही मिळाल्यो. तसेच पुढच्या स्वप्नासाठी प्रेरणा मिळाली.

त्यानंतर मी माझा शैक्षणिक प्रवास सुरूच ठेवला. समुपदेशनाच डिप्लोमा, शालेय व्यवस्थापनाचा डिप्लोमा, कौन्सलर ट्रेनिंग, एम.एड असे अध्यापन कार्याशी निगडित विविध कोर्सेस पूर्ण केले. आणि सर्वा महत्त्वाचे म्हणजे एड्स जनजागृतीचे कार्य अधिक वाढवून मी माझा पीएच डी.चा प्रबंधही पूर्ण केला. मुक्त विद्यापीठाच्या दूरशिक्षण प्रणालीमुळे मा लहानपणीचे स्वप्न आता लवकरच प्रत्यक्षात उतरणार आहे.

या यशामुळे माझ्या मानसिकतेतही बदल झाला आहे. हातात असले काम उरकण्यासाठी कमीत कमी काय करावे लागेल असा संकुचित विचा न करता ते कार्य अधिकाधिक चांगलं होण्यासाठी कशी मेहनत घेता येईल असा विचार मी करू लागले आहे.

येथे प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने यशस्वी व्हावे आणि जास्ती जास्त पारितोषिक पटकवावीत, अशी विद्यापीठातल्या सर्वांचीच मनापासू इच्छा असते. त्यांची ही कळकळ विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या प्रत्ये व्यक्तीकडून मिळणाऱ्या सहकार्यातून जाणवते.

आपण सर्व विविध जबाबदाऱ्या पार पाडत शिक्षण घेत असतो सर्वांनाच याची जाणीव असते म्हणूनच तेही मदतीसाठी तत्पर असतात आपणही या शिक्षणप्रणालीशी तितकेच एकरूप व्हायला हवे.

**''जरी सरले वय शिक्षणाचे,**
**आणि जबाबदाऱ्या आल्या फार,**
**तरीही, टाक पाऊल मुक्त शिक्षणाकडे,**
**कधीही मानू नकोस हार..''**

# यशोगाथा



हरेश दळवी

## हरेश पोचला सातासमुद्रापार

हरेश दळवीची घरची आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच. त्याचे वडील टपाल खात्यात कारकून. त्यातच कुटुंबातील माणसे जास्त असल्याकारणाने कौटुंबिक पार्श्वभूमी त्याच्या शिक्षणास पोषक नव्हती. राहते घर झोपडपट्टीच्या बकाल महासागरात. अशा विपरीत आणि प्रतिकूल परिस्थितीतही हरेशचा शैक्षणिक प्रवास सुरू होता.

हरेश मुंबईत ज्या झोपडपट्टीत राहायचा तिथे शिकलेली माणसे फारच कमी होती आणि वातावरणही शिक्षणास अनुकूल नव्हते. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर पुढे काय? यथायोग्य मार्गदर्शन मिळणे दुरापास्तच.

अंधारात चाचपडतच हरेशने महाविद्यालयीन शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. मात्र निश्चित दिशा कोणतीही ठरली नव्हती. आप्तस्वकीयांचे मत घेऊन त्याने संगमनेरला महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रारंभ केला.

त्याने बी.एस्सी.साठी प्रवेश घेतला. बी.एस्सी.च का? त्यालाही माहीत नव्हते.

थोड्याच दिवसांत त्याच्या लक्षात आले की, आपण वाट चुकलो आहोत. केमिस्ट्री-फिजिक्समध्ये त्याला अजिबात रस नव्हता. शिवाय ज्या पद्धतीने ते विषय शिकविले जात त्यामुळे तर शिकण्याविषयीची अनास्था व दुरावा वाढतच गेला.

अशा विचित्र क्षणी त्याच्या मार्गावर एक वळण आले. असे वळण, ज्यामुळे त्याचे जीवनच बदलून गेले. आपल्याच महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे एक केंद्र असल्याची त्याला माहिती झाली. संगमनेरला असताना हरेशला शैक्षणिक अनुकूलता भासली ती तेथील शिक्षक आणि मित्रांच्या रूपाने. त्यांनी योग्य वेळी मार्गदर्शन केल्यामुळेच हरेशला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची वाट सापडली.

त्याने मुक्त विद्यापीठाच्या बी.ए.च्या प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला आणि एकाच वेळी पुणे विद्यापीठाची बी.एस्सी. व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची बी.ए. अशा दोन्ही पदवी परीक्षांचा अभ्यास सुरू केला. दोन्ही अभ्यासक्रमांच्या पहिल्या दोन वर्षांच्या परीक्षा तो यशस्वीपणे उत्तीर्ण झाला. मात्र तिसऱ्या वर्षी समस्या उद्‌भवली. किडनी स्टोनचा त्रास बळावला. बी.एस्सी.चा केमिस्ट्री पेपर हुकला. परंतु एक महिन्यानंतर मुक्त विद्यापीठाच्या बी.ए.ची परीक्षा होती ती मात्र निर्विघ्नपणे पार पाडली.

### निकाल काय? बी.एस्सी. नापास, बी.ए. पास!

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामुळे त्याची शिक्षणाची वर्षे वाया गेली नाहीत. पदवी मिळाली. याच पदवीच्या आधारावर त्याला मुंबईच्या टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत एम.एस.डब्ल्यू.साठी प्रवेश मिळाला आणि त्यानंतर हरेशने कधी मागे वळून पाहिलेच नाही.

टाटा सामाजिक संस्थेत चांगला मित्रपरिवार व शिक्षक मिळाल्याने हरेशला भरपूर संधी मिळत गेल्या. गुजरात भूकंप, सुनामी वादळ, मुंबईतील पूर आदी नैसर्गिक आपत्तीत त्याने सेवाकार्य केले.

गुजरातमधील बचतगटात तसेच टाटा रीसर्चच्या सेंटर फॉर एड्स रीसर्च एक्सलंट सेलमध्ये ट्रेनिंग असिस्टंट म्हणून त्याने काम केले. पुण्याच्या जंबोद्वीप प्रकल्पावरही त्याने संचालक म्हणून काम केले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बी.ए.ची पदवी प्राप्त केल्यानंतर हरेशसमोर परदेशात इंडियाना पोलिस येथे जाण्याची संधी येऊन उभी राहिली. परंतु या संधीसोबत एक तांत्रिक अडचणही आमंत्रण न देता आली. इंडियाना पोलिसला जाण्यासाठी बी.ए.चे पदवी प्रमाणपत्र तातडीने सादर करणे आवश्यक होते. परंतु विद्यापीठातून पदवीदान समारंभानंतरच पदवी वितरित केली जाते.

ही कोंडी फोडण्यासाठी हरेश सरळ तत्कालीन कुलगुरू डॉ. राजन वेळूकर यांना भेटला. त्यांनी परिस्थिती समजावून घेतली. विद्यापीठाचे

> **''मुंबईतील एका बकाल झोपडपट्टीतून अमेरिकेतील इंडियाना पोलिस विद्यापीठात! या विलक्षण प्रवास करणाऱ्या प्रवाशाचं नाव हरेश दळवी आणि त्याच्या पंखांना बळ देण्याचं, काम केलंय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने.''**
>
> – हरेश दळवी

नियम विद्यार्थ्यांच्या विकासाआड येता कामा नयेत, या विचाराने त्यांनी सकारात्मक भूमिकेने त्याला मदत करण्याचा निर्णय घेतला. विद्यापीठात प्रचलित असलेल्या नियमांच्या आधारानेच एक खास बाब म्हणून हा प्रश्न उच्चस्तरावर सोडविण्यात आला. कुलगुरूंच्या हार्दिक शुभेच्छांबरोबरच हरेशचा इंडियाना पोलिस विद्यापीठाचा मार्ग सुकर झाला. मुक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या वैयक्तीक आवश्यकतांशी सदैव कसे निगडित असते याचे हे बोलके उदाहरण आहे.


अमेरिकेतील इंडियाना पोलिस विद्यापीठात गेल्या तीन वर्षांपासून तो समाजशास्त्रातील पीएच.डी.च्या शिक्षणाचे धडे घेत आहे. हरेश दळवीच्या या यशोगाथेच्या मुळाशी आहे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. अमेरिकेत समाजशास्त्रात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनाही तो हाक देतो आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पारंपरिक शिक्षणपद्धतीला एक पूरक शिक्षणव्यवस्था सादर केली आहे. ती कालानुरूप व सामान्यांच्या आवश्यकतेनुसार तयार केलेली असल्याने अल्पावधी लोकप्रिय ठरली आणि गावोगावी जाऊन पोचली. यामुळे यशवंतराव चव्ह महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने सर्वांना शिक्षणाची संधी निर्माण करून दि त्यामुळेच हरेश दळवीसारख्या अनेक पक्ष्यांच्या पंखांना बळ मिळाले.

वर्षानुवर्षे हाल-अपेष्टा सहन करीत शिक्षणाकडे धावत जाण्याचे दि आता इतिहासजमा झालेत. शिक्षणाची गंगाच मुक्त विद्यापीठाच्या रू प्रत्येकाच्या घरात येऊन उभी राहिली. सामाजिक निवडक लोकांसाठ मर्यादित राहिलेले शिक्षण मुक्त विद्यापीठामुळे सर्वांसाठी बंधमु झाले. दैनंदिन काम करतानाच आवश्यकतेनुसार घरच्या घरी शिक्ष या विद्यापीठाच्या मूलमंत्रामुळेच लक्षावधी अंधारलेल्या घरांमध्ये अ शिक्षणाची पहाट उगवली आहे. वंचितांसाठी बंद असणारी शिक्षणाची कव मुक्त विद्यापीठामुळे खुली झाली आणि महाराष्ट्रात एक नवी शैक्षणिक क्रां झाली.

-संतोष साब

# यशोगाथा



## हरप्रीत सिंग

## ज्ञानगंगा सीमारक्षकांपर्यंत...

मी भारतीय लष्करातील जवान आहे. जवळजवळ १४ वर्ष मी लष्करी सेवेत आहे. मी दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत असलेल्या एका अतिशय गरीब घरात जन्माला आलो.

माझ्या आई वडिलांची मी खूप शिकावे अशी इच्छा होती. म्हणूनच मी १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण करू शकलो. १२ वी नंतर माझ्या वडिलांनी मला लष्करात जाण्याचा सल्ला दिला आणि मी त्यासअढ!! अर्ज केला. मला माझं नेमणूकपत्र मिळालं त्यानुसार मी तोफखान्यामधे गोलंदाज (गनर) या पदावर रूजु झालो. माझं प्रशिक्षण पूर्ण करून मी जम्मू काश्मिर मधल्या तोफखान्याच्या पलटणीत रूजू झालो. माझी नाईक पदावर ब्अढ!ती झाल्यावर मला अतिशय समाधान झाले.नाईक पदासअढ!! परिक्षा द्यावी लागते. या परिक्षेसअढ!! अभ्यास करताना मला अभ्यासाची गोडी लागली.




मी तोफखान्यात काम करत असताना तिथे मुक्त विद्यापीठातर्फे एका व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्या भाषणामुळे मला पुढील शिक्षण घेता येईल हे समजले. एरवी लष्करात असताना पुढील अभ्यास करायचा असल्यास कॉलेज मधे नाव घालून त्या कॉलेजच्या वेळापत्रकाप्रमाणे परिक्षा द्याव्या लागतात. पण आमच्या कामामधून त्याच वेळी रजा मिळणे कठीण असते. मी लगेचच मुक्त विद्यापीठाच्या लष्करी जवानांसअढ!! असलेल्या कला शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासअढ!! (बी.ए.) प्रवेश घेतला. मुक्त विद्यापीठाकडून मला अभ्यासाची पुस्तकं देण्यात आली. ही पुस्तकं खास आमच्यासअढ!! तयार केलेली , समजायला सोपी अशी होती. या पुस्तकांवरून अभ्यास करून आमच्याच केंद्रातून ऑनलाइन परीक्षा द्यायची होती. मी प्रथम संगणकावर परीक्षा देण्याबाबत जरा साशंक होतो. पण मग असं लक्षात आलं की संगणकीय यंत्रणा खूपच सोपी आहे. मी तीनही वर्षांच्या परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झालो. मुक्त विद्यापीठामुळे माझ्यासारख्या लष्करी जवानांना पुढील शिक्षणाची उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. आम्ही लष्करातून लवकर निवृत्त होत असल्यामुळे आमच्या त्यानंतरच्या आयुष्यातील वाटचालीसअढ!! , नोकरी व्यवसायासअढ!! या शिक्षणाचा खूप उपयोग होतो. माझ्या गावातही माझा मान या पदवीमुळे वअढ!ला. मला कधी आपण पदवीधर होऊ असं वाटलं नव्हतं. पण मुक्त विद्यापीठामुळे मला हे शक्य झालं आणि त्यासअढ!! मी मुक्त विद्यापीठाचा कायम ऋणी राहीन. मला अजुनही शिकण्याची इच्छा आहे त्यासअढ!! लवकरच मी अजुन एखाद्या अभ्यासक्रमासअढ!! नाव नोंदवणार आहे. आपली शैक्षणिक पात्रता वअढ!विण्यासअढ!! लष्करातील सर्व जवानांना मी मुक्त विद्यापीठातील अभ्यासक्रमांचा फायदा घेण्याचा सल्ला देइन. मुक्त विद्यापीठाने दिलेली ही मोलाची संधी सर्व लष्करी जवानांनी जरूर घ्यावी. मुक्त विद्यापीठातील सर्व शिक्षक आणि कर्मचा ॰ यांचा त्यांनी केलेल्या मदतीसअढ!! मी नेहमीच आभारी राहीन. संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर मुक्त विद्यापीठ सर्व थरातील लोकांसअढ!! शिक्षणाचे केंद्रस्थान बनले आहे. एखाद्या रोजंदारीवर काम करणा॰ ापासून सर्व भारतीयांना मुक्त विद्यापीठाने शिक्षणाचा आणि त्यामुळे आपले जीवन सुधारण्याचा राजमार्ग दाखवून दिला आहे.

– कर्नल व्ही. के. मलिक

# यशोगाथा



प्रा. रेखा कढणे

## ...आणि माझी जीवनरेखा उंचावली

मी रेखा कढणे. माझे पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण नाशिकरोडच्या महानगरपालिकेच्या शाळेत झाले. पाचवी वी ते दहावी यशोदामाता डाह्याभाई बिटको गर्ल्स हायस्कूलमध्ये, तर महाविद्यालयीन शिक्षण आरंभ महाविद्यालयात येथे झाले.

वडील रिक्षाचालक. त्यामुळे घरची परिस्थिती बेताचीच. त्यामुळे नोकरी करणे गरजेचे होते. बी.कॉम.चे शिक्षण घेत असताना मी नाशिक येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कॉम्प्युटराइज्ड फायनान्शिअल अकाउंटिंग हा डिप्लोमा केला असल्याने मला अकोल्यात कॉम्प्युटर टीचर म्हणून नोकरी मिळाली. चार वर्षे ही नोकरी करत माझे एम.कॉम.चे शिक्षण मी पूर्ण केले. एम.कॉम.मुळे मला राजूरच्या अॅड. नानासाहेब देशमुख महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. प्राध्यापक म्हणून नोकरीत कायम होण्यासाठी सेट/नेट पात्रता धारण करणे गरजेचे होते. परंतु कालांतराने त्यास एम.फिल.चा पर्याय उपलब्ध झाला. याचाच फायदा घेत मी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अनंतराव थोपटे महाविद्यालय या अभ्यासकेंद्रातून प्रवेश घेऊन एम.फि पदवी प्राप्त केली आणि नोकरीत कायम झाले.

विद्यापीठाला पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा!

**"आज मी याच महाविद्यालयात वाणिज्य शाखेचे विभागप्रमुख म्हणून काम पाहत आहे. यशवंतराव चव्हाण महारा मुक्त विद्यापीठामुळे माझ्या आयुष्याला कलाटणी मिळाली आणि मला आणि माझ्या कुटुंबाला समाजात प्रतिष्ठादेखील मिळाली माझ्यासारख्या नोकरी करून शिक्षण घेणाऱ्या अनेकांचे उज्वल भविष्य घडविण्यात विद्यापीठाचा मोलाचा वाटा आहे."**

**- प्रा. रेखा कढ**

# यशोगाथा



संगीता ढोके

## संगीताला गवसला लाखमोलाचा सूर...!

धनगर समाज म्हटला की, मेंढपाळ करणारा, रानावनात भटकणारा असे चित्र डोळ्यापुढे उभे राहते. इतकेच नाही तर शेळी-मेंढी पालन हि पुरुषांचीच मक्तेदारी आहे, असेही वाटते. परंतु या मक्तेदारीला संगीता ढोके हिने छेद दिलाय. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शेळी-मेंढी पालनाचा व्यवसाय करून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून अर्धवट सुटलेले शिक्षण तर पूर्ण केलेच शिवाय या व्यवसायातून महिलांनादेखील वर्षाकाठी ६० लाख रुपयांची उलाढाल करता येऊ शकते हे सिद्ध करून दाखविले.

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुट पालन, गायी, म्हशी पाळणे, भाजीपाला लागवड याकडे पाहिले जाते. अलीकडे त्यात शेळी-मेंढी पालन यांची भर पडली आहे. अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील लाडकी (बु) या गावाच्या ढोके परिवाराचा शेळी-मेंढीपालन हा पारंपरिक व्यवसाय. परंतु जगन्नाथराव ढोके यांनी शेळीमेंढी पालन बाजूला सारून पत्रकारिता, एक छोटं किराणा दुकान व घर बांधकामासाठी लागणाऱ्या बांबू-फळ्यांचा व्यवसाय सुरू केला. या जोडव्यवसायातून मिळणाऱ्या अल्पशा मिळकतीवर जगन्नाथराव ढोके हे संसाराचा गाडा पुढे रेटत होते. कधी निसर्गाचा लहरीपणा, तर कधी कामांचा अभाव यामुळे व्यवसायातून मिळणारी आवकही हळूहळू कमी होत गेली. या विवंचनेत ढोके यांना 'अस्थमाने' रोगाने वेढले. दीर्घकाळ आजाराशी झगडत अखेर २००० साली जगन्नाथ ढोके यांचे निधन झाले. परिणामी येणारा पैशाचा ओघही थांबला.



संगीता ही भावंडांपैकी थोरली. वडिलांच्या निधनानंतर कुटुंबप्रमुखाची जबाबदारी संगीतावर आली. एकीकडे कुटुंबाचा उदरनिर्वाह, तर दुसरीकडं बहीण, भाऊ व स्वतःच्या शिक्षणाचा खर्च या वैचारिक, मानसिक संघर्षातून ती घोळून निघू लागली. या अवघड परिस्थितीत तिने कुक्कुटपालनाचा व्यवसाय करण्याचा निर्धार केला. त्या व्यवसायातही तिला अपयश आले. ते अपयश पचवून परिस्थितीपुढे हतबल न होता, तिने शेळी-मेंढी पालनाचा व्यवसाय करण्याचे ठरविले. सुरुवातीला थोडेफार पैसे जुळवून ५ शेळ्या विकत घेतल्या. रानावनात न भटकता, घरच्या घरीच शेळ्यांची देखभाल करून अवघ्या तीन वर्षांतच २० शेळ्या तयार केल्या. मात्र पुरेशा भांडवलाअभावी शेळ्यांकरिता निवारा बांधणे तिला शक्य नव्हते. त्यातूनही मार्ग काढीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विकास महामंडळाकडून तिने तीन लाखांचे अर्थसाहाय्य घेतले व शेळ्यांकरिता उत्तम निवारा उभा केला. शेळ्यांना गोठ्यात वावरताना नैसर्गिक वाटावे म्हणून तिने गोठ्यातले बांधकाम दगड, झाडे, लोखंडी बार यांच्या सहाय्याने विशिष्ट पद्धतीने केले.

शेतकरी आत्महत्यानंतर केंद्राच्या पॅकेज अंतर्गत तालुक्यातील काही बचत गटांना शेळ्या विकत घेण्याकरिता अनुदान देण्यात आले. त्या बचत गटांना संगीताने शेळ्यांची विक्री केली, तर काही स्वतःकरिता छोटी पिल्लं विकत घेतली. ती पिल्ले मोठी झाल्यावर त्यांचीही विक्री केली. छोटी पिल्लं विकत घ्यायची व ती मोठी झाल्यावर विकायची यातून संगीताकडे भांडवल सतत खेळते राहू लागले. एकीकडे आर्थिक भरभराट होत

असतानाच दुसरीकडे तिने पाच एकर बागायती शेती खरेदी केली. शेतीत स्वतः राबून जमीनही कसून घेतली. त्यानंतर धनगर व्यावसायिकांकडून तिने शेळ्या, बोकड नगाप्रमाणे विकत घेऊन, बचत गट व आदिवासींना वजनाप्रमाणे विक्री केली. यातूनही ती चांगले अर्थाजन करू लागली. या व्यवसायात तिला काम करताना अनेकदा विरोध झाला, तर काही शेळी-मेंढी पुरवठादारांचे नातेवाईक महामंडळात उच्च पदावर असल्यामुळे, कंत्राट मिळू नये म्हणून अडचणी निर्माण करण्यात आल्या, तरीही न डगमगता ती जोमाने काम करीत राहिली. संगीताची जिद्द व कामावरची निष्ठा बघून, शेळी-मेंढी महामंडळाने व्यापारी कार्यक्रमांतर्गत शेळ्यांचे पुरवठादार म्हणून तिला कंत्राट दिले. विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, भंडारा, नागपूर व वर्धा या ६ जिल्ह्यांना शेळी-मेंढी पुरवठा करण्याचे संगीताचे काम नियमित चालू आहे. यातून ती वर्षाकाठी तब्बल ६० लाख रुपयांची उलाढाल करतेय.

शेळीपालनाचे कोणतही शास्त्रोक्त शिक्षण संगीताने घेतले नसले तरी, शेळ्यांचे आजार, औषधोपचार, चारा, गाभळ शेळ्या व दुभत्या शेळ्यांची विशेष काळजी, शेळ्यांच्या व्यालाची तारीख, शेळ्या फळल्याची तारीख याविषयीची सर्व माहिती तिने आत्मसात करून घेतली आहे.

संगीताने शेळी पालन व्यवसायाच्या माध्यमातून चांगले आर्थि स्थैर्य मिळवून कुटुंबाला आधार दिलाय. कधीकाळी विस्कटलेल्या आर्थि घडीमुळे अर्ध्यावर सोडावे लागलेलं स्वतःच शिक्षण मात्र ती विसरली नाह वडील पत्रकार असल्यामुळे संगीतानेही मुक्त विद्यापीठाच्या 'जनसंज्ञा व वृत्तपत्रविद्या' या पदवी शिक्षणक्रमाला प्रवेश घेतला. समाजाभिमु पत्रकारितेचे व्रत स्वीकारून तिने आपल्या धारदार लेखणीतून अनेकां न्याय दिला. त्यासोबतच रूढीपरंपरेने जखडून ठेवलेल्या समाजाला बा काढण्यासाठी अनेक आंदोलने, उपोषण करून सामाजिक चळवळीम प्रत्यक्ष सहभागही नोंदविला.

शेळीपालन व्यवसायातून आर्थिक प्रगती साधलेली संगीता अ स्वाभिमानाने व सन्मानाने जगतेय. सामाजिक व पत्रकारिता क्षेत्र उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र दलित साहित्य अकादमी २०० सावित्रीबाई फुले समाजसेविका २००३, सोलापूर येथील समाजसेवि २०१३ व समाजगौरव २०१०-२०११ या पुरस्कारानेही तिला सन्मानि करण्यात आलेय. संगीताची आजपर्यंतची वाटचाल निश्चितच अभिम वाटणारी आहे आणि म्हणूनच पुढच्या पिढीसाठी आदर्शवतही...!

**- आशिष याव**

# यशोगाथा



## डॉ. प्रेरणा दहिवलकर

## प्रेरणा ठरली अनेकांची प्रेरणा

माझा जन्म कोकणात खेडमध्ये झाला. माझे माहेर तिसंगी खेडेगावात आहे. माहेरचे नाव वासंती सुतार असे आहे. तिथे माझे दहावीपर्यंत शिक्षण झाले. २ मार्च १९९१ ला *श्री. प्रदीप कृष्णा दहिवलकर (रा. वेरळ, ता. खेड, जि. रत्नागिरी)* यांच्याशी माझा विवाह झाला. संसार सुरळीत चालत असताना ६ सप्टेंबर १९९८ मध्ये माझे पती प्रदीप यांचे वटपौर्णिमेच्या दिवशीच सर्पदंशाने निधन झाले. त्या वेळी माझी मुलगी पल्लवी सहा आणि मुलगा वैभव दोन वर्षांचा होता. दुःखाचा मोठा डोंगर उभा राहिला. कुटुंबाची आणि दोन मुलांची जबाबदारी माझ्यावर पडली.

अशा परिस्थितीपुढे हतबल न होता कौटुंबिक जबाबदारीचे भान ठेवून धैर्य, चिकाटी, जिद्द व आत्मविश्वासाच्या जोरावर अविरत मेहनत घेतली. काही करून मुलांना उच्च शिक्षण देऊन त्यांना स्वबळावर उभे करायचे असे ध्येय उराशी बाळगले. मुलांच्या भवितव्यासाठी मी धाडसी आणि ध्येयप्रेरित झाले.

सहजीवन शिक्षण संस्थेच्या आय.सी.एस. महाविद्यालयात १ ऑगस्ट १९८९ रोजी प्रयोगशाळा परिचर म्हणून नोकरीला लागले. तेव्हा माझे शिक्षण फक्त दहावी पास होते. संसार, प्रपंच, खेड्यामध्ये राहणे, नोकरी, मुलांचे संगोपन, घरात पैशाची अडचण, वादविवाद, मानसिक त्रास, घरगुती ताणतणाव या सर्व गोष्टींवर मात करण्यासाठी पुढील शिक्षण पूर्ण करण्याचा विचार केला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या आय.सी.एस. कॉलेज, खेड या केंद्रावर पूर्वतयारी परीक्षेसाठी अर्ज केला. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या ध्येयप्रेरित व्यक्तींसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हा मोठा दिलासा आहे. मी सप्टेंबर २००० मध्ये या विद्यापीठातून पूर्वतयारी अभ्यासक्रम पास झाले. नंतर प्रथम, द्वितीय वर्ष पास झाले. नोव्हेंबर २००६ मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बी.ए. पदवी संपादन केली. त्यामुळे विद्यापीठाविषयी आम्हाला फार जिव्हाळा आहे. या विद्यापीठाने मला पुढील शिक्षणासाठी प्रेरणा दिली आहे.

एप्रिल २००९ मध्ये मुंबई विद्यापीठातून वराडकर बेलोसे आर्टस्, कॉमर्स कॉलेज येथे एम.ए. इतिहास उच्च द्वितीय श्रेणीत ही पदवी संपादन केली.

२५ जानेवारी २०१४ ला मी जगदीशप्रसाद जाबरमल तिब्रेवाला विद्यापीठ, राजस्थान या विद्यापीठाकडून 'रत्नागिरी जिल्ह्यातील मंदिरांचा ऐतिहासिक अभ्यास' या विषयाची पीएच.डी. प्राप्त केली आहे. माझे मार्गदर्शक मुधोजी कॉलेज फलटण, जि. सातारा येथील डॉ. सदाशिव मारुती गावडे सर यांनी मला प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आय.सी.एच. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. बी. सारंग सर यांचे मला मोलाचे प्रोत्साहन आणि सहकार्य लाभले. तसेच आय.सी.एच. महाविद्यालय शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

मी नोकरी करत असताना मुलांचे शिक्षण आणि त्याचबरोबर माझे शिक्षण पूर्ण केले आहे. माझी मुलगी पल्लवी ही बी.एच.एम.एस. या अभ्यासक्रमासाठी डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयात शेवटच्या वर्षात शिकत आहे आणि मुलगा वैभव हा जी.पी.पी. कॉलेज, पुणे येथे मेकॅनिकल इंजिनीअर या शैक्षणिक वर्षात शिकत आहे. मुलांना परिस्थिती आणि जबाबदारी यांची जाणीव लवकर आल्यामुळे मला काहीही त्रास न देता स्वतः अभ्यास करून उच्च शिक्षण घेत आहेत. तसेच माझे संशोधन कार्य करीत असताना माझा मुलगा वैभव याने अविरत मेहनत घेतली. माझ्याबरोबर राजस्थानला सोबत येऊन पूर्ण प्रवासात माझी काळजी घेतली.

**"मुक्त विद्यापीठाद्वारे शिक्षणापासून वंचित असलेल्यांना सुवर्णसंधीच प्राप्त होते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रमही इतर विद्यापीठांपेक्षा सोपा व सुटसुटीत वाटतो. विद्यापीठाची अनेक वर्षांपासूनची माफक फी व दर्जेदार पुस्तके ही या विद्यापीठाची जमेची बाजू आहे. अशी सुवर्णसंधी कोणीही गमावू नये असे वाटते."**

**- डॉ. प्रेरणा दहिवलकर**

तेथील कॉम्प्युटर वर्क, थेसीसचे सेटिंग, दुरुस्ती आणि बाईंडिंगचे काम वैभवने केले आहे. हे सगळे त्याने मेकॅनिकल इंजिनीअरिंगचा अभ्यास सांभाळून केले आहे.

त्याचप्रमाणे मी मुक्त विद्यापीठाची संमंत्रक आहे. माझ्याकडून प्रेरणा घेणारे मुले-मुली तसेच ज्यांचे काही कारणास्तव शिक्षण अपूर्ण आहे त्यांना मी कळकळीने निवेदन करते की, त्यांनी शिक्षण अपूर्ण न ठेवता मुक्त विद्यापीठाद्वारे पदवीधर व्हावे. त्याशिवाय विद्यापीठाद्वारे चालू केलेल्या विविध अभ्यासक्रमांची माहिती मिळवावी व आपले अपूर्ण शिक्षण पू करावे. नोकरी व्यवसाय, घर, संसार इत्यादी सांभाळून जास्तीत जा व्यक्तींनी, महिलांनी मुक्त विद्यापीठाद्वारे पदवीधर व्हावे, असे मी कळकळी आवाहन करते.

मला दहावीनंतर पीएच.डी.पर्यंत शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करणाऱ्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची मी शतशः ऋणी आहे.

यशोगाथा

## डॉ. शिवाजी चव्हाण

# निवृत्तीनंतरची डॉक्टरेट...

मी डॉ. शिवाजी चव्हाण वय वर्षे ६९. आज मी रयत शिक्षण संस्थेतून प्राध्यापक म्हणून निवृत्त होऊन निवृत्तीचे जीवन जगत आहे. त्या आधी सातारा येथे महात्मा फुले प्रशिक्षण महाविद्यालयात प्राचार्य म्हणूनही मी काम पाहिले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे पीएच.डी.पूर्ण केल्यानंतर समाजामध्ये वावरताना आम्हास खूप उपयोग झाला. त्याबद्दल मी विद्यापीठाचा ऋणी आहे. विद्यापीठातील अभ्यासाची 'शिव-छत्रपतींची स्त्री नीती' या अत्यंत समाजोपयोगी पुस्तकाचे लेखन करण्यास फार मोलाची मदत झाली. तसेच विविध वर्तमानपत्रातून सदर विषयावरती लेखन करण्याची संधी लाभली.

सातारा आकाशवाणी, पुणे आकाशवाणी आणि विविध ठिकाणी समाजप्रबोधनात्मक स्त्री-सक्षम करण्यासंबंधी व्याख्याने देण्याची संधी मला मिळत आहे. माझ्या या यशामध्ये विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे संचालक डॉ. उमेश राजदेरकर व विद्यापीठाचा सिंहाचा वाटा आहे. विद्यापीठात केलेल्या संशोधनाचा अभ्यास आणि मिळालेले मार्गदर्शन लाखमोलाचे ठरत आहे. विद्यापीठाप्रति आम्हास खूप आदर आहे. या विद्यापीठाचे शिक्षण क्षेत्रात मोठे काम आहे. विद्यापीठाच्या यशस्वी वाटचालीला लाख लाख शुभेच्छा!

**"वाढत्या वयाची कुठलीही आडकाठी न येता आपली शिक्षणाची इच्छा पूर्ण करायची असेल तर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची दूरस्थ शिक्षणपद्धतीच उपयुक्त आहे, हे मी स्वतः अनुभवले आहे. कारण सेवानिवृत्तीनंतर २०१३ साली मी मुक्त विद्यापीठातून पीएच.डी. केली."**

**- डॉ. शिवाजी चव्हाण**

# यशोगाथा



## डॉ. उल्का निंबाळक

## उल्का उजळते तेव्हा...

आपल्या प्रकाशाने आकाश उजळून टाकणारी उल्का आपण पाहतो. पण एक 'उल्केला' उजळवून टाकणारे आकाश लाभले ते यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या रूपानं...

माझे शालेय शिक्षण शिरूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे येथे, तर महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या प्रसिद्ध एस.पी.महाविद्यालयात झाले.

मी अतिशय जिद्दीने एमपीएससीची परीक्षा दिली आणि वर्ग १ अधिकारी म्हणून माझी निवड झाली. त्यामुळे माझ्या आनंदाला पारावर राहिला नाही. आता आपले व आपल्या कुटुंबाचे स्वप्न साकार होणार याबद्दल मनात शंका नव्हती. शिकण्याची ऊर्मी कमी झाली नव्हती. त्यामुळे डॉक्टरेट करायचे ठरविले आणि त्या तयारीनेच मुक्त विद्यापीठाचे दार ठोठावले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून 'महाराष्ट्रातील आदिवासी साहित्य : प्रेरणा, स्वरूप आणि चिकित्सा' या विषयावर संशोधन पूर्ण केले. विद्यापीठात शिकविण्यात आलेल्या संशोधन कार्यपद्धतीचा उपयोग आज शासकीय कामकाजात होत आहे. तसेच एखादा विषय सखोल समजून घेता येणे शक्य झाले ते केवळ विद्यापीठातून मिळालेल्या ज्ञानामुळे. विद्यापीठातून वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळे आणि सहकार्यामुळे म आदिवासी समाज समजला. माझ्या जाणिवा समृद्ध झाल्या. माणसे सम घेता आली. तसेच महाविद्यालयीन स्तरावर विविध विषयांवर व्याख देण्याची संधी प्राप्त झाली. त्यामुळेच जुन्नर येथे पार पडलेल्या १५ समरसता साहित्य संमेलनात 'आदिवासी साहित्य' या विषयावर व्याख देता आले. हा आत्मविश्वास वाढीला लागला तो केवळ विद्यापीठा मिळालेल्या ज्ञानामुळे... पदवीमुळे...

**"मला नोकरी, संसार सांभाळून मुक्त विद्यापीठातून संशोध करता आले. वेळोवेळी संशोधनकरिता सूचना मिळाल्या. याकरि विद्यापीठाचे आभार. विद्यापीठाच्या वैविध्यपूर्ण संशोधना समाजाला निश्चितच फायदा होईल. सध्या मी विक्रीकर उपायु म्हणून कोल्हापूर येथे कार्यरत आहे."**

**- डॉ. उल्का निंबाळक**

# यशोगाथा



## सुशिला निर्मल

# मायलेकी बनल्या विद्यार्थिनी

मुलीने शिकावे हे आईचे स्वप्न... त्या स्वप्नासाठीच तिनेही शाळेत पाऊल ठेवले. शिकण्याची इच्छा मनात असूनही मायलेकींना परिस्थितीअभावी शिकता आले नाही. पण आज त्या दोघीही आनंदाने मुक्त शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. शिकायला वय नसते, तसेच मनात जिद्द, ध्यास आणि आत्मविश्वास असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही, हे दोघींनी दाखवून दिले.

सरकारी नोकरीतून निवृत्त झालेल्या ५० वर्षीय मुलीला महाविद्यालयात जायची, परीक्षा द्यायची लाज वाटते म्हणून तिच्या ६५ वर्षे वयाच्या आईनेच वर्षभरापूर्वी पुढाकार घेऊन बारावीला प्रवेश घेतला आणि दोघींनी औरंगाबाद शहरात एकाच परीक्षा केंद्रावर पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा बरोबरच दिल्या. शांतिपुरा छावणी येथील रहिवासी सुशीला आर. निर्मल यांनी २१ मे २०१४ रोजी कला शाखेच्या पहिल्या वर्षाचा पेपर दिला. शहरातील सरस्वती भुवन कला महाविद्यालयात सकाळी साडेदहा ते दुपारी दीड या वेळेत त्यांचा पेपर असतो, तर त्यांची मुलगी उज्ज्वला निर्मल-दत्त या दुसऱ्या वर्षाचा पेपर दुपारी अडीच ते सायंकाळी साडेपाच या वेळेत त्याच महाविद्यालयात देतात. आई परीक्षा हॉलमध्ये जाते तेव्हा मुलगी बाहेर अभ्यास करत बसते, तर मुलगी परीक्षागृहात गेल्यावर आई तिची प्रतीक्षा करते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून या मायलेकी कला शाखेची पदवी मिळवीत आहेत.



**आईमुळे आत्मविश्वास**

'...आई आपल्याला जगात वावरायलाच नाही तर आत्मविश्वासाने जगायला शिकवते. हे केवळ ऐकत होते; परंतु याचा प्रत्यक्ष अनुभव मी आता घेते आहे. आईने शिकायला सुरुवात केल्यामुळेच पुन्हा शिकण्याची, पदवी पूर्ण करण्याची प्रेरणा मला मिळाली आहे.'

**- उज्ज्वला निर्मल**

बारावीनंतर एकच वर्ष शिक्षण घेऊ शकलेल्या आपल्या मुलीने आता स्वेच्छानिवृत्तीनंतर तरी पदवी घ्यावी आणि कायद्याचा अभ्यास करावा, असा आग्रह सुशीला निर्मल यांनी उज्ज्वला दत्त यांच्याकडे धरला होता. पण या वयात अभ्यास करायचा, परीक्षा द्यायची आणि त्यासाठी महाविद्यालयात जायचं ही कल्पनाच उज्ज्वला यांना पटत नव्हती. त्यांचा संकोच आईच्या आग्रहाला यश येऊ देत नव्हता. त्यामुळे या संकोचाला आपणच उत्तर द्यायचं असा निर्णय सुशिला यांनी घेतला आणि बारावीच्या परीक्षेचा अभ्यास त्यांनी सुरू केला.

**''माझ्या मुलीने माझ्याप्रमाणे अर्धवट शिकून पुढील आयुष्य काढावे हे मान्य नव्हते. पण तिला या वयात शिकण्याचा संकोच वाटत होता. त्यामुळे तिच्यासाठी पुन्हा शिकण्याचा मी निर्णय घेतला. हे शिक्षण केवळ दाखवण्यासाठी अथवा प्रतिष्ठेसाठी नाही तर महिला म्हणून सक्षम होण्यासाठी आम्ही घेत आहोत. माझ्या मुलीने विधीची पदवी घ्यावी अशी इच्छा आहे. त्यासाठी मी सदैव तिच्यासोबत उभी राहीन.''**

**- सुशीला निर्मल**

आश्चर्य म्हणजे वयाच्या ६५ व्या वर्षी त्या बारावीची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. लगेचच त्यांनी बीएच्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेतला. त्यामुळे मुलीलाही पुन्हा पदवीचे शिक्षण पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली. आज या मायलेकी खऱ्या अर्थाने तरुणांसाठीही प्रेरणास्थान बनल्या आहेत.

शिक्षणाबद्दलची सुशीला निर्मल आणि उज्ज्वला निर्मल यां मायलेकींची ही जिद्द तरुणाईलाही लाजवेल अशीच आहे. त्या आपल्याबरोबरच इतरांना जगण्याची ऊर्मी देतात ही बाब कौतुकास्पद अशीच आहे. शिक्षणाबद्दलची आस्था टिकवून ठेवणाऱ्या या मायलेकींना अंतःकरणापासून सलाम!

**- संतोष साब**


# यशोगाथा



दत्तू ढगे

## रोपवाटिकेने केली जीवनात 'हरितक्रांती'

करिअरमध्ये भौगोलिक प्रदेशांच्या सीमा ओलांडणे केवळ शिक्षणपद्धतीवर अवलंबून नाही. ध्येय आणि आत्मविश्वास यांची सांगड घातल्यास दूरस्थ शिक्षणपद्धतीही नेतृत्वाला पूरक ठरू शकते. याचा प्रत्यय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी दत्तू रामभाऊ ढगे यांना आला. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेतर्फे 'कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण प्रयोग' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा दिल्लीमध्ये अलीकडेच पार पडली. त्यात कृषी विज्ञान केंद्रासह राज्याचेही प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान त्यांना मिळाला.



नाशिक परिसरात भाजीपाल्याची स्वतंत्र रोपवाटिका नव्हती. ती आपण सुरू करावी, असा विचार करून त्यांनी त्या दिशेने वाटचाल सुरू केली. लोक हसू लागले. टिंगल करायचे. भाजीपाल्याची अन् रोपवाटिका असा प्रश्न विचारून वेड्यात काढायचे. मात्र खचून न जाता व्यवसायात उडी घेतली.

२००६ मध्ये जुन्या वापरात नसलेल्या द्राक्षाच्या अँगलचा उपयोग करून १० बाय ४ फुटांच्या पॉली टनेल शेडमध्ये रोपवाटिकेची सुरुवात केली. घरच्या घरीच रोपे बनविली. शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन रोपे तयार केली जाऊ लागली. सुरुवात २० हजार रोपांनी केली. गावातील आणि आजूबाजूचे शेतकरी येऊ लागले. नंतर मागणी मोठ्या प्रमाणात वाढल्याने टप्प्याटप्प्याने वाढ करत आता ७० गुंठ्यांवर पॉलीहाऊस उभारण्यात आले आहे. टोमॅटो, सिमला, ज्वाला मिरची, पिक्याडो, वांगी, कारले, भोपळे, दोडके, गिलके, काकडी, टरबूज, खरबूज, भेंडी, फ्लॉवर, कोबी, वाल त्याचप्रमाणे परदेशी भाजीपाल्यांच्या विविध व्हरायटी मिळून जवळपास १५० प्रकारची महिन्याकाठी सुमारे १२ लाख रोपे तयार केली जातात.

सात-आठ वर्षांपूर्वी त्र्यंबक भागातील लोक शेतीत काही होत नसल्याने भाताचे पीक घेतल्यानंतर रोजगारासाठी इतरत्र जात. तर कित्येक जण स्थलांतर करीत. अनेक जण जमिनी विकत. मात्र या रोपवाटिकेमुळे आता या भागातील लोक भाजीपाला पिकाकडे वळले. कमी पाण्यावर भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात लागवड झाली. लोकांत शेतीची आवड निर्माण झाली. महाराष्ट्रासह गुजरात आणि मध्य प्रदेशातील शेतकरी येथून रोपे घेऊन जातात. त्यांचे राज्यातील तसेच राज्याबाहेरील प्रगतशील शेतकऱ्यांशी आपुलकीचे आणि स्नेहाचे संबंध जोडले गेले. त्यामुळे सातत्याने नवनवीन प्रयोग चालू आहेत. कोलंबो (श्रीलंका) आदी ठिकाणच्या शेतकऱ्यांनीही येथे भेटी दिल्या आहेत.

प्रत्येकात क्षमता दडलेली असते. ती सादर करण्यासाठी संधी आणि

**''यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एक महिन्याच्या रोपवाटिका शिबिरात सहभाग घेतला. येथे मिळालेल्या तंत्रशुद्ध माहितीमुळे दिशा मिळाली आणि दत्तू रामभाऊ ढगे यांच्या जीवनाला वेगळी दिशा मिळाली. एक महिन्याचे शिबिर टर्निंग पॉइंट ठरले.'' – दत्तू ढगे**

आत्मविश्वासाची गरज असते. विद्यापीठाच्या 'रोपवाटिका व्यवस्थापन' प्रशिक्षणामुळेच मला राष्ट्रीय स्तरावर स्वतःला मांडण्याची संधी मिळाली.

**गौरव महाराष्ट्राचा**

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्लीचे महासंचालक डॉ. एस. अय्यपन यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. या कार्यशाळेत दत्तू ढगे यांनी 'कमी खर्चाच्या हरितगृहात मोठ्या प्रमाणातील भाजीपाला रोपे निर्मिती' या विषयावर यशस्वी सादरीकरण केले. संशोधन व कृषी उत्पादन यामध्ये केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल देशातील ५१ संशोधक शेतकऱ्यांचा गौरव मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. देशातील ५१ शेतकऱ्यांना स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले. यामध्ये फळबाग क्षेत्रात देशात वेगळा ठसा उमटविणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील दत्ताजी ढगे आणि कृषी मालाच्या मार्केटिंगमध्ये विशेष काम करणाऱ्या पुणे जिल्ह्यातील अभिनव ग्रुपचा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गौरव केला.

## भावी संकल्प

- रानावनातील दुर्मीळ आणि नामशेष होत चाललेल्या वनस्पतींचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न.
- शेतकऱ्यांबरोबरच शहरी लोकांनाही भाजीपाल्याची आवड रुजावी, ताजा भाजीपाला मिळावा या हेतूने फूल, फळ आणि भाजीपाला शेती विकसित करणे.
- आरोग्य आणि पर्यावरण उत्तम राहण्यासाठी घराच्या अथवा बंगल्याच्या सुशोभीकरणासाठी अन्य झाडांची निवड करण्यापेक्षा तुळशीच्या कुंपणाची लागवड करावी यासाठी प्रयत्न करणार.
- औषधी वनस्पतींचे संवर्धन करणे असे भावी प्रकल्प दत्तू ढगे यांच्या मनात आहेत.

**– संतोष साबळे**

# यशोगाथा

## डॉ. ठका गोराणे

# शिक्षणाबरोबरच सामाजिक जाणीव

उत्तर महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या प्रभावी अंधश्रद्धा आणि त्यांचे निर्मूलन यासाठी उपाययोजनांचे संस्कृतीकेंद्री 'संप्रेषण : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर मी पीएच.डी.साठी शोध प्रबंध सादर केला. प्राचार्य डॉ. किशोर पवार यांचे मला मार्गदर्शन मिळाले. हा विषय घेऊन समाजाच्या तळागाळातील वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मला दिशा मिळाली.

संशोधन आणि आपले दैनंदिन जीवन यांचा परस्परसंबंध आहे, याचा अनुभव मी घेतो आहे. तळेगाव, अंजनेरी येथील विद्याप्रशाला हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज येथे प्राचार्य म्हणून मी जबाबदारी सांभाळतो आहे. या पदावर कार्यरत असतानाही मुक्त विद्यापीठात घेतलेले संशोधनाचे धडे माझ्यासाठी उपयुक्त ठरत आहेत.

प्राचार्यपद हे शालेय प्रशासनाशी निगडित आहे. यामुळे या प्रशासकीय कामाचे नियोजन, हेतू, उद्दिष्ट, मांडणी, कार्यकारी, मूल्यमापन, पडताळणी, पुनर्भरण या संशोधनातील प्रत्येक पायरीचा उपयोग माझ्या कामकाजात होतो. पथदर्शी प्रकल्प आणि कृती संशोधनातून समस्यांचे निराकरण करता येते. विद्यार्थी, पालक, सहकारी यांच्याशी चर्चेतून, संवादातून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यासाठीही प्रयत्नांना ऊर्जा मिळते. याचा फायदा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना करून देता येतो, याचाच जास्त आनंद आहे.

संशोधन कार्यातून प्रेरणा मिळाल्याने मी कृतिशील शिक्षणावर भर दिला. परिणामी आदिवासी भागातील आमच्या शाळेला राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात पारितोषिक मिळाले. या पारितोषिकाने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीला लागला आहे.

दोन दशकांपासून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसोबत मी कार्यरत आहे. 'अंनिस'ने मला सामाजिक कार्यासाठी पाठबळ दिले. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कार या विषयावर आजवर सुमारे ५०० पेक्षाही अधिक व्याख्याने मी दिली आहेत. समाजातील भोंदूगिरीविरोधातही चळवळ-आंदोलन आदी मार्गांनी मी योगदान दिले आहे. अंधश्रद्धेपोटी पशुबळीच्या अनिष्ट प्रथेविरोधात सलग १४ वर्षांपासून मी कार्यरत आहे. माझ्या या सर्व उपक्रमांना योग्य दिशा देण्याचे कार्य मुक्त विद्यापीठातील संशोधन अभ्यासक्रमाने केले आहे.

सामान्य माध्यमिक शिक्षकाला सामाजिक संशोधनाची संधी देऊन मुक्त विद्यापीठाने अप्रत्यक्षरीत्या सामाजिक विकासालाच पाठबळ दिले आहे. विद्यापीठाचा हा दृष्टिकोन सामाजिक विकासाचा खरा राजमार्ग आहे.

**''हाती असलेल्या जबाबदाऱ्या सांभाळूनही सामाजिक कार्यात योगदान देण्याचे अनेकांचे उद्दिष्ट असते. समाजातील शोषण आणि मानसिक गुलामगिरीच्या विरोधात उभे राहावे असे मला सातत्याने वाटायचे. पण एका दुर्गम भागातील शाळेत माध्यमिक शिक्षकाची नोकरी करताना हे उद्दिष्ट कसे गाठायचे? मनातील स्वप्नाला आकार कसा द्यायचा? हे प्रश्न अनेकदा सतावत असायचे. समाजातील अंधश्रद्धा नष्ट होण्यासाठी काय करता येईल, या दृष्टीने मी मुक्त विद्यापीठातून पीएच.डी.ला सुरुवात केली. संशोधन म्हणजे नेमके काय? आणि त्याचा सामाजिक विकासात नेमका उपयोग कसा करावा? याचे सूक्ष्म मार्गदर्शन मला या विद्यापीठात मिळाले. शाळेतील मुख्याध्यापकपदाची जबाबदारी सांभाळण्यासोबतच विकासात्मक सामाजिक संवादाच्या माझ्या आवडीत मला संशोधनाचा फायदा होतो आहे.''**

**- डॉ. ठका रघुनाथ गोराणे**

# यशोगाथा



## प्रा. डॉ. सुनंदा पाटील

## शहाणे करुन सोडावे सकल जन

उच्च शिक्षणाची एक पायरी ओलांडून संशोधन या विषयाकडे वळण्याची भीती अनेकांना वाटते. प्रपंचातल्या बसलेल्या घडीतून संशोधन या किचकट वाटणाऱ्या विषयाला वेळ द्यावा, तर प्रपंचाची घडी विस्कटेल काय? असाही निरर्थक विचार करून अनेक जण 'संशोधन' या व्यापक दृष्टी देणाऱ्या विषयाकडे पाठ फिरवितात. माझ्या सर्व जबाबदाऱ्यांना संशोधनातून मिळालेल्या व्यापक दृष्टीने पाठबळच दिले आहे.

दैनंदिन कामकाजातही संशोधनवृत्तीचा निश्चित फायदा होतो. याचा प्रत्यय मी वेळोवेळी घेते आहे. याचे मोठे उदाहरण म्हणजे वेळ होय. वेळेच्या नियोजनाचे महत्त्व शिकायला मिळते ते संशोधनातून! मुक्त विद्यापीठातील संशोधन कार्यात दैनंदिन कामकाजाचा आढावा हा भाग असल्याने ती एक शिस्त आपोआपच लागत गेली. कोणत्याही गोष्टीचे सूक्ष्म निरीक्षण, परीक्षण करण्याची सवय जडली. अगदी किरकोळ भाजी घ्यायची तरी आपोआप टीव्हीवरील कृषीदर्शनसारख्या कार्यक्रमात भाजीचे भाव, पेपरमध्ये, रेडिओवर व प्रत्यक्ष भाजीचे भाव यातील तफावत कळू लागली आणि चौकस दृष्टी प्राप्त झाली.

दैनंदिन जीवनात संशोधनवृत्तीचा फायदा आपल्या बोलण्या व वागण्यातून जास्त दिसू लागतो. कारण बिनबुडाची विधाने संशोधनात चालत नाही त्यामुळेही नकळत लागलेली सवय खूप उपयोगी ठरते. बोलताना आपला विषय, विचार सूत्रबद्ध रीतीने मांडायची सवय लागते. आपले म्हणणे थोडक्यात पण सांगण्याबरोबरच प्रसंगी विस्तारित रीतीनेही मांडता येते. थोडक्यात, संशोधनाचा विषय प्रत्यक्ष व्यवहारातही किती उपयोगाचा आहे? यावर प्रश्नचिन्ह असले तरी 'संशोधनवृत्ती', 'कामाची शिस्त', 'टाईम मॅनेजमेंट' या गुणांचा उपयोग दैनंदिन जीवनात नक्कीच होतो.

माझ्या पीएच.डी. संशोधनाचा मुख्य हेतूच 'समाजस्वास्थ्य' सुधारावे असा होता. विशेषत्वाने 'स्त्रीसमाज' सबलीकरण हा विषय जास्त केंद्रस्थानी ठेवला. खानदेशातील गोर बंजारा लोकसंस्कृती व लोकसाहित्य या विषयावर मी प्रबंध सादर केला. बंजारा स्त्रिया बुद्धीने, शरीराने अतिशय सक्षम आहेत, पण शिक्षण, दारिद्र्य, काही अनिष्ट रूढीपरंपरांनी त्या आजही पीडित आहेत. हे लक्षात येताच बंजारा समाजाचा इतिहास, लोकसंस्कार, लोकश्रद्धा, अंधश्रद्धा, लोकरूढी आदी बाबींचा प्रत्यक्ष तांड्यामध्ये जाऊन अभ्यास केला. लोकसाहित्याचे अभ्यासक व पूर्वसूरीच्या अभ्यासकांनी आखून दिलेल्या पाऊल खुणांचाही उपयोग करून समाजप्रबोधनपर निष्कर्ष मांडले. त्यात समाजऱ्हासाची कारणमीमांसा दिली. पुढील उपाययोजनाही सुचविली. थोडक्यात सांगायचे तर नवता व परंपरा यातील स्थित्यंतराची दर्शने आणि बदलत्या समाजाचा कानोसा येथे घेण्यात आला आहे.

डॉ. रमेश वरखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमानसाच्या सामूहिक उणिवेतील अनुभव संचितांचा मार्ग काढण्यासाठी प्रस्तुत संशोधन प्रकल्पात भाषिक सर्वेक्षण केले. म्हणी व वाक्प्रयोगांचे कोश संपादित केले आहेत. म्हणी व वाक्प्रचारांच्या माध्यमातून उपलब्ध होणारा सांस्कृतिक वर्तनव्यवहाराचा पुरावा हा इतर भौतिक साधन वस्तूसारखा थेटपणे अर्थबोध करणारा नसतो. त्यामुळे येथे त्यांच्या बुद्धीचे, सूचकतेचे, भाषिक सौंदर्याचे प्रदर्शन अचूक घडते.

लोकगीते, लोककथा, पुराणकथा, मिथके यातून व्यक्त होणाऱ्या समाजजीवनाचा मागोवाही येथे घेतला आहे. भाषा हेच वास्तव आहे. भाषेबाहेर सामाजिक वास्तव नसते या सपियर वोर्फ यांच्या गृहीतकांनुसार भाषिक सामग्रीच्या आधारे गोर बंजारांचे लोकजीवन व वास्तवजीवन शैली

**"विद्यापीठाच्या ब्रीदवाक्यानुसार ज्ञानगंगा घरोघरी हे भगिरथ कार्य विद्यापीठाने हाती घेतले आणि सत्यात उतरविले. हजारो विद्यार्थी आपल्या औपचारिक शिक्षणात सातत्य ठेवू शकले नाही. अशा शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना त्यांच्या गरजांनुसार शिक्षण देणारे हे विद्यापीठ अशा दुर्लक्षित विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणते आहे. त्यासाठी जातीचे बंधन नाही, वयाचे नाही. जेव्हाही संधी मिळाली तुम्ही आयुष्यभर शिकू शकता अशी सोय उपलब्ध करून दिल्याने निरक्षरतेचा कलंक पुसला जातो आहे."**

**प्रा. डॉ. सुनंदा पाटील**

स्पष्ट केली आहे.

थोडक्यात सांगायचे झाले तर भाषा अभ्यासाच्या माध्यमातूनही गोर बंजारांची लोकजीवनशैली तपासून पाहिली आहे. तसेच त्यांच्या रूढी, परंपरा, श्रद्धा, समजुती इ. लोकतत्त्वीय भूमिकेतून गोर बंजारा लोकांच्या स्वभावातील चातुर्य, ज्ञान, त्यांचा हजरजबाबीपणा कसा प्रदर्शित होतो तेही स्पष्ट केल्याने गोर बंजारा समाजाचा एक वेगळा पैलू येथे दिसतो. समाजभान जपण्याची भूमिका येथे घेतली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाचे प्रधान विशेष म्हणजे जन्माबरोबरच नाव घेऊन आले. विद्यापीठाला काय नाव द्यायचे यावर नसते वाद घालण्यात वेळ खर्ची गेला नाही. त्यामुळे फारच कमी कालावधीत हे विद्यापीठ नावारूपाला आले.

या विद्यापीठाचे अभ्यासक्रमही अतिशय लक्षणीय आहेत. फळबाग, फुलबाग, भाजीपाला यांसारखे अनेक विषय कृषी-अभ्यासक्रमाशी निगडित आहेत. ज्याचा उपयोग आपल्या कृषिप्रधान देशासाठी जास्त होऊ शकेल. याशिवाय गवंडी, प्लंबर, वायरमन, फिटर, ब्यूटीपार्लर यांसारखे तत्काळ रोजगार मिळवून देणारे अभ्यासक्रम असल्याने बेरोजगारी वाढविणारे हे शिक्षण नाही. येथील शिक्षणप्रणाली ही विद्यार्थीकेंद्री असून, स्वयंअध्ययनाला प्राधान्य देणारी आहे.

अनेक जण मुक्त विद्यापीठाची तुलना इतर विद्यापीठातील बहि:स्थ शिक्षणप्रणालीशी करतात. पण येथे दोन्ही शिक्षणप्रणालीत निश्चित तफावत आहे. कारण बहि:स्थमध्ये प्रवेश प्रक्रिया आणि परीक्षा या दोनच पायऱ्या आहेत, तर मुक्त विद्यापीठात संपर्क वर्ग, संवाद कौशल्य, दृक्श्राव्य माध्यमे, इंटअनेट, इमेल, स्वाध्याय या माध्यमांमुळे विषय परिपुष्ट होत जातो. अर्थात या सर्वांना श्रेयांक पद्धती असल्याने अभ्यासक चौफेर अभ्यास करायला शिकतो.

या शिक्षणप्रणालीचा आणखी एक वाखाणण्याजोगा भाग म्हणजे मार्गदर्शक पुस्तक संच. अतिशय अभ्यासपूर्णरीतीने व तज्ज्ञांच्या विचारमंथनातून निर्माण झालेली पुस्तके एखादा विषय अवघडाकडून सोप्याकडे आणणारा आहे. त्यामुळे माहितीचा स्रोत म्हणूनही ही पुस्तके संग्रही ठेवण्यासारखी आहेत.

तसेच येथील संशोधनपद्धती एम.फिल. व पीएच.डी. अतिशय काटेकोर व शिस्तबद्ध आहे. येथील तज्ज्ञ प्राध्यापक विषयाची निवड, विषय संप्रेषण, कालावधी सारेच काटेकोर आहे. त्यामुळे असंख्य संशोधक विद्यार्थी असतानाही कोणताही गोंधळ होत नाही. याचा अनुभव मी संशोधनादरम्यान घेतला आहे. महाराष्ट्रातील अनेक वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणून या विद्यापीठाने आजवर अतुलनीय योगदान दिले आहे. शहाणे करून सोडावे, सकल जन! या संतवचनानुसार विद्यापीठाचे आदर्श कार्य भविष्यातही अखंडपणे सुरू राहील.

यशोगाथा



सुनील सोनवणी

# मुक्त विद्यापीठाने जागविला आशावाद

जीवनाच्या एका टप्प्यावर प्रतिकूलतेशी दोन हात करण्याची वेळ येते. अशा वेळी आशा-निराशेचा पाठशिवणीचा खेळ सुरू असतो. मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह या पदावरील अस्थिर नोकरीपासून तर ग्रंथालयशास्त्र या विषयात सेट परीक्षा (स्टेट इलिजिबिलीटी टेस्ट) उत्तीर्ण होईपर्यंतच्या अत्यंत खडतर वाटचालीत मुक्त विद्यापीठाच्या धोरणांनी मला आशावाद दिला. अन् स्थिर जीवनाचे माझे उद्दिष्ट विद्यापीठामुळे पूर्ण होऊ शकले.

मी मूळचा निफाडचा. वडील शिक्षक. त्यांनी निफाडच्या सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्यवाह म्हणून जबाबदारी सांभाळली होती. मी औषध कंपनीत मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह या पदावर काम करीत होतो. सन २००४ ची गोष्ट. एक दिवस के. के. वाघ कॉलेजची जाहिरात प्रसिद्ध झाली. त्यात लॅब असिस्टंट या पदाची प्रोस्ट होती. माझे शिक्षण बी.एस्सी. (केमिस्ट्री) होते. शैक्षणिक पात्रतेमुळे मी मुलाखतीला गेलो. मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हची नोकरी खूप फिरतीची होती. कामाचा दबाव आणि असुरक्षितताही नोकरीत होती. कंपनीला उत्पादन विक्री हवीच नाही तर नोकरी धोक्यात. माझे त्या वेळी लग्नही झालेले असल्याने नोकरीची टांगती तलवार कायम होती. त्यामुळे कमी पगाराची पण थोडीफार सुरक्षित नोकरी निवडावी या विचारात मी होतो. मी के.के. वाघ महाविद्यालात मुलाखतीला गेलो. त्या वेळी माझे शिक्षण पूर्ण होऊन ८ वर्षे झाली होती. त्यामुळे प्रथम लेखी परीक्षेत पास होऊ की नाही अशी धास्ती मनात होती. पण मी त्या लेखी परीक्षेत प्रथम आलो. मुलाखतीलाही चांगली उत्तरे दिल्याने माझी लॅब असिस्टंट म्हणून निवड झाली. रानवड साखर कारखाना येथे नवीनच आर्टस, कॉमर्स कॉलेजला जॉईनही झालो. पगार होता ७० रुपये रोज. त्यामुळे रविवार व सुटीचे वार पकडून अवघा १७०० रुपये पगार मिळायचा. मी निफाडहून कॉलेजला जायचो त्यामुळे एवढ्या कमी पगारात कसे तरी घर चालायचे. आई-वडिलांनी त्या वेळी मानसिक व आर्थिक मदत केली. मी ही नोकरी करायला पत्नीसह सर्वांचा विरोध होता. एवढ्या कमी पगारात घर कसे चालणार? ही रास्त विचारणा त्यांच्याकडून होई. पण माझा निश्चय पक्का होता. म्हणून मी नोकरी सोडली नाही. शिपाई व मी जवळपास सारखेच काम करायचो व पगार पण जवळपास सारखाच होता पण मी ठरविले की, यातूनही काही मार्ग काढू अन् मी कॉलेजला आलेले संगणकावर टायपिंग शिकलो. त्यातून कॉलेजची कामे करून त्यावर सही घेण्यासाठी डॉ. बी. ई. कुशारे सर यांच्याकडे जायचो. त्या वेळी त्यांनी कॉलेजच्या मिटिंगमध्ये विचारले की, तू ग्रंथालय सांभाळशील का? मी लगेच हो म्हणालो. यावर संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी लगेच माझी रोजंदारीची ऑर्डरवरून पूर्णवेळची म्हणजे १२ महिन्यांची ऑर्डर काढायला सांगितले आणि मला ग्रंथालयशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यास सांगितले. यानंतर मी व पत्नीने एलटीसी अभ्यासक्रमाला दत्ता पगार सरांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश घेतला. यात मी केंद्रात दुसरा आलो. मला ग्रंथालयाची आवड निर्माण झाली. मग मी व पत्नी दोघांनीही बी.लिब. अभ्यासक्रमाला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे ॲडमिशन घेतले परंतु पैसे भरायचे कसे? मग मुक्त विद्यापीठातील जयंत खडताळे सरांना भेटलो. त्यांना आमची अडचण सांगितली. त्यांनी दोन टप्प्यात फी भरण्याची परवानगी दिली. आमची अडचण काही अंशी दूर झाली. त्या वर्षी आम्ही बी.लिब. अभ्यासक्रमाला निफाडहून शनिवारी कॉलेज करून यायचो. रविवारी क्लास करून संध्याकाळी पुन्हा निफाडला जायचो. त्या वर्षी मी नाशिक केंद्रात प्रथम आलो. मला ७२.७ टक्के मिळाले होते. त्यावर्षीची श्री. औरंगाबादकर पुरस्कार मला डॉ. श्री. सदानंद मोरे यांच्या हस्ते मिळाला. पत्नीही उत्तीर्ण

**"अस्थिर नोकरीत विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर घेऊन चालणाऱ्या माझ्यासारख्या होतकरू माणसाची नाव अखेर किनाऱ्याला लागली. पण या खडतर अन् अनिश्चित प्रवासात मुक्त विद्यापीठाची साथ मला निश्चितपणे मिळाली. यामुळे मी माझ्या जीवनात सकारात्मक परिवर्तन अनुभवतो आहे. या शिक्षणप्रणालीचा उपयोग आपणही आपल्या जीवनासाठी करून घ्यायला हवा."**

**- सुनील सोनवणी**

झाली. त्यानंतर एम.लिब. अभ्यासक्रमाला ॲडमिशनच्या वेळेस पैसेच नव्हते. घरी दरवेळेस पैसे मागायला योग्य वाटत नव्हते. कारण घरातून भरपूर आर्थिक मदत वेळोवेळी व्हायची. माझा पगारच २३०० रुपये होता. त्यामुळे नाइलाज होता. शेवटी मी एकट्यानेच ॲडमिशन घ्यावे असे पत्नीने सुचविले. फी भरण्यासाठी सोने मोडावयाचे ठरविले. ही गोष्ट घरच्यांना कळू द्यायची नाही, असे दोघांनीही ठरविले. मी एम.लिब.ला ॲडमिशन घेतले. मी पास झालो. ५८ टक्के मार्क्स् मिळाले. मी खूप निराश होतो. कारण मी कायम मेरीटमध्ये येत असे. पण डॉ. मधुकर शेवाटे सर, डॉ. प्रकाश बोडके सर, डॉ. राजेंद्र कुंभार सर यांनी मला सेट/नेट परीक्षा देण्याविषयी सुचविले. मी पुन्हा जोमाने अभ्यासाला लागलो. सेट त्या वेळेस डिस्क्रिप्टिव्ह होती. त्यामुळे इतरांचे मार्गदर्शन, नोटस वाचायला लागलो. दुसऱ्या वेळेस नेट व सेट पर्यायी झाल्यानंतर श्री. शेवाळे सरांनी मला इंटअनेटचा उपयोग करत जा व ज्या ग्रंथालयशास्त्रातील नव्या संकल्पना येत आहेत त्या समजावून घेत जा, असे सांगितले. मी भुजबळ नॉलेज सिटी कॉलेजला नोकरीला असल्याने विश्वस्त शेफाली भुजबळ या आम्हाला पुढचे शिक्षण घ्या, थांबू नका, असे सांगायच्या. त्यामुळे प्रेरणा मिळाली व सेट-नेट चा जोरदार अभ्यास सुरू ठेवला. पण परीक्षा देऊनही यश हुलकावणी देत होते. नेटची परीक्षा अवघ्या दोन मार्कांनी नापास झालो, तेव्हा सेट/नेट काहीच करायचे नाही, असे ठरविले. सर्व दोष नशिबाला देत होतो. शेवटी सर्व मार्गदर्शकांनी मला पुन्हा प्रयत्न करायला सांगितले. मला सेट परीक्षेत ६३ टक्के मिळाले पण कट ऑफ लिस्ट ६५ टक्क्याला लागली. मी पुन्हा निराश झालो. त्यामुळे डिसेंबर २०१३ ची नेट परीक्षाच दिली नाही. शेवटी डिसेंबर २०१३ मध्ये मी सेट परीक्षा पास झालो. याच्यावर माझा व पत्नीचा विश्वास बसत नव्हता कारण दरवेळी नशिबाने दगा दिला होता. पण ज्या वेळी यादीत नाव वाचले त्या वेळी मला अतिशय आनंद झाला व पहिली आठवण श्री. शेवाळे सर, बोडके सर, कुंभार सर यांची झाली. त्यांच्याच प्रोत्साहनाने मी ही परीक्षा उत्तीर्ण होऊ शकलो.

# यशोगाथा



**रमेश चौधरी**

## दुर्गम मार्ग झाला सुकर

मी एसएससी आणि डी.एड. पूर्ण करून प्राथमिक शिक्षक म्हणून नंदुरबार जिल्ह्यात रुजू झालो. पुणे विद्यापीठाकडून बहिस्थ बी.ए. पदवी घेऊन पुढे काय करायचे? या विचारात होतो. मुक्त विद्यापीठाने हा प्रश्न सोडविला. पुढे खूप शिक्षण घ्यावे, असा विचार करूनच एम.ए. शैक्षणिक संप्रेषणासाठी नाशिक अभ्यासकेंद्रामध्ये प्रवेश घेतला. या शिक्षणक्रमासाठी संशोधन अहवाल अनिवार्य असल्याचे समजल्याने आपण संशोधन पूर्ण कसे करणार? यात साशंकता निर्माण झाली. परंतु विद्यापीठाची सखोल पुस्तके, संमत्रणे व संशोधन मार्गदर्शनामुळे एम.ए. पदवी सन २००३ मध्ये प्राप्त केली. नंतर विद्यापीठाशी ऋणानुबंध वाढतच गेले. त्यानंतर या विद्यापीठातून बी.एड. पदवी विशेष प्रावीण्यासह, एम.एड. पदवी प्रथम श्रेणीत व डी.एस.एम. पदवी प्राप्त केली.



प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा करीत असताना या सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासामुळे माझ्या शैक्षणिक कार्यात खूपच सुधारणा व मदत झाली. शाळेत व तालुक्यात नवनवीन उपक्रम आयोजित करणे, शैक्षणिक कृती संशोधने, नवोपक्रम करणे यासह विविध कृती सत्रे व चर्चासत्रांत सहभागी होण्याची संधी मिळाली. यामुळे विविध केंद्रांतील संमेलनासाठी व्याख्यानांना आमंत्रित होत राहिलो. विविध प्रशिक्षणात प्रभावीपणे तज्ज्ञ मार्गदर्शनाची भूमिका करता आली. शिक्षण क्षेत्रात सर्वच पातळीवर नवी ओळख या विद्यापीठामुळे मला मिळाली.

मुक्त विद्यापीठातून एम.एड. पदवी घेतल्यानंतर संशोधनात्मक माहिती चांगल्या प्रमाणात झाल्याने या क्षेत्राची आवड निर्माण झाली. परिणामी शहादा शिक्षणशास्त्र विद्यालयात एम.एड.च्या वर्गात गुणात्मक व्याख्या या विषयावर व्याख्यानाची संधी मिळाली. जिल्हा परिषद नंदुरबार यांनाही तालुक्याला गुणवत्तावाढीसाठी वाचन प्रकल्पावर प्रबंध सादर केला. तसेच डायट नंदुरबारमार्फत कृती संशोधन सादर केले.

मुक्त विद्यापीठात शैक्षणिक संशोधनाचे कार्य उत्कृष्ट केले जाते. शैक्षणिक संशोधनाची परिपूर्ण माहिती येथूनच मिळाली. यासाठी विद्यापीठाचे शिक्षणशास्त्र विभागाचे माजी संचालक डॉ. अनंत जोशी, प्रा. डॉ. मीनाक्षी बरवे, डॉ. संजीवनी महाले, प्रा. माधवी धारणकर यांच्या वैयक्तीक मार्गदर्शनासह सर्वच समंत्रंकांचे मार्गदर्शन मिळाले. मुक्त विद्यापीठात बहिःस्थ व दूरस्थ शिक्षणात पुस्तकांची खूपच मदत झाली. विद्यापीठाचे

> **"नंदुरबारसारख्या दुर्गम तालुक्यात प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झाल्यानंतरही खूप काही कार्य उभारण्याचे स्वप्न मनात होते. भौगोलिक आणि विकासाच्या दृष्टिने दुर्गम अशा या भागात उच्च शिक्षणाच्या संधी कशा मिळणार, असा प्रश्न मनात उभा राहिला होता. पण मुक्त विद्यापीठाने हा प्रश्न सोडविला. माझ्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासाठी हे विद्यापीठच खरी प्रेरणा आणि पाठबळ बनले आहे. नंदुरबारसारख्या दुर्गम विभागातही शिक्षणाची गंगा पोचविण्याच्या माझ्या जबाबदारीत विद्यापीठाचा महत्त्वाचा वाटा आहे."**
>
> **– रमेश चौधरी**

विविध शिक्षणक्रमाची पुस्तके म्हणजे सखोल माहितीचा साठा. या सर्व पुस्तकांचा उपयोग मला अधिव्याख्यातापदासाठीची लेखी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी झाला.

विद्यापीठातून शिक्षण घेत असताना मिळालेली स्वयंअध्ययन पद्धत, कृतिसत्रातून प्राप्त माहिती, स्वाध्याय व संमंत्रणे यामुळे खूप मदत होते. याच कारणाने कोणतीही अवांतर पुस्तके न वाचता मी सन २०११ मध्ये सेट व सन २०१२ मध्ये नेट परीक्षा शिक्षणशास्त्र विषयातून उत्तीर्ण झालो.

माझ्या जीवनात मला जे काही यशाचे क्षण प्राप्त झाले त्यात मुक्त विद्यापीठाचा सिंहाचा वाटा आहे. मी माझ्या दैनंदिन जीवनात व शालेय कार्यात सफलतेने जे कार्य करतो त्यातही विद्यापीठाच्या विचारांचा प्रभाव असतो.

शिक्षणाच्या माध्यमातून वंचित घटकांच्यासाठी कार्याचे ब्रीदही मला मुक्त विद्यापीठाकडून मिळाले आहे. यामुळेच केवळ पारंपरिक शिक्षणाच्या चौकटीत विद्यार्थ्यांना न अडकविता कृतिशील आणि उपक्रमशील शिक्षणावर माझा भर राहिला आहे. याचे खूपच सकारात्मक परिणाम माझ्या प्रकल्पांमध्ये दिसून आले आहेत. याचे बहुतांशी श्रेय मुक्त विद्यापीठाच्या कार्यप्रणालीला जाते.

# यशोगाथा



## निर्मला खळे

## मुक्त शिक्षणातून अवकाश उड्डाण

चूल आणि मूल या चौकटीतून बाहेर पडत आता महिलाही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रगतीची भरारी घेत आहेत. काम करण्याची धमक आता महिलांमध्येही निर्माण झाली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची पदवी घेत अशाच एका शेतकऱ्याच्या मुलीने मुक्त शिक्षणाद्वारे थेट उंच अवकाशात भरारीचे स्वप्न साध्य करण्याची किमया साधली आहे.

**शिकवणीशिवाय यश**

**''कोणाचीही बुद्धी कमी किंवा जास्त नसते. मी खेड्यातली असले, तरी लहानपणापासूनच आयुष्यात काहीतरी वेगळे करण्याची इच्छा होती. मुक्त विद्यापीठाची बी.ए. पदवी मिळाल्याने माझ्यातील आत्मविश्वास वाढला. गावात सुखसोई नसल्याने अनेक अडचणी आल्या मात्र त्यावर मात करून कोणत्याही शिकवणी वर्गाशिवाय यश मिळविता आले. पायलट होण्याची खूणगाठ मनाशी बांधल्याने प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावरच मी आज इथपर्यंत पोहोचू शकले. माझ्या या खडतर प्रवासात वडिलांनी खंबीरपणे उभे राहून पाठबळ दिले. आता प्रत्यक्षात विमान उडविण्यासाठी मी सज्ज झाले याचा आनंद वाटतो.''**

**- निर्मला खळे, पायलट**

येवल्यापासून नऊ किलोमीटर अंतरावर असलेल्या निमगावमढ (जि. नाशिक) येथील या अवकाशस्वामिनीचे नाव आहे निर्मला खळे. घरची परिस्थिती बेताची असली तरी आपल्या आयुष्यात डॉक्टर, इंजिनीअर न होता इतरांपेक्षा काहीतरी वेगळे करून दाखविण्याची खूणगाठ तिने मनाशी बांधली होती. दलित कुटुंबात जन्मलेली निर्मला लहानपणापासूनच हुशार. वडील पुंजाराम खळे शेती करतात तर आई हौसाबाई मोलमजुरी करतेय. निमगावमढच्या प्राथमिक शाळेतच तिचे शालेय शिक्षण, तर गावातल्याच जनता विद्यालयात माध्यमिक शिक्षण झाले. दहावीनंतर एसएसजीएम महाविद्यालय, कोपरगाव (जि. नगर) येथे सायन्स विषय घेऊन अकरावी, बारावीचे शिक्षण सायकलवर जाऊन पूर्ण केले. बालपणी पायलट होण्याचे स्वप्न तिने पाहिले अन् त्या दृष्टीने पावले टाकायला सुरुवात केली. घरचं आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने पारंपरिक महाविद्यालयात प्रवेश घे दुरापास्त होते. पदवी शिक्षण पूर्ण करतानाच आपले पायलट होण्यां स्वप्नही कसे पूर्ण करता येईल, यावर निर्मलाने बराच काळ विचार केल आणि अखेर मुक्त शिक्षण पद्धतीचा पर्याय निवडून यशवंतराव चव्हाण



**बारावीनंतर मुक्त विद्यापीठात बी.ए. पदवी शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानेच आज मला पायलट होण्याचे स्वप्न पूर्ण करता आले. मुक्त विद्यापीठाची पुस्तके अतिशय चांगल्या दर्जाची असल्याने मला स्वयंअध्ययन करण्याची सवय लागली. त्याचा फायदा मला पुढे झाला. मी जेव्हा प्रशिक्षणासाठी हैदराबादला गेले तेव्हा इच्छा असूनही आर्थिक परिस्थिती नसल्याने खाजगी शिकवणी लावू शकले नाही. या वेळी मुक्त विद्यापीठाची स्वयंअध्ययन पद्धतीच माझी मार्गदर्शक बनली.**

**- निर्मला खळे**

महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात बी.ए. शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतला. पुंजाराम व हौसाबाई खळे या दलित कुटुंबातील शेतकऱ्याच्या घरात जन्मलेल्या निर्मलाचे स्वप्न होते, ते काहीतरी जगावेगळे करण्याचे. बी.ए. पदवी घेतल्यानंतर पायलट होण्याची निर्मलाची मनीषा मात्र तिला काही स्वस्थ बसू देत नव्हती. ती पायलट होऊन भरारी घेण्याचे स्वप्न पाहत होती.

आकाशात झेप घेण्यासाठी सज्ज झालेल्या निर्मलाचे पाय आजही जमिनीवरच आहेत. शेतातील सर्व कामे पूर्वीप्रमाणेच करतेय. परिस्थिती प्रतिकूल असली, तरी मिळणाऱ्या किंवा मिळालेल्या संधीचा लाभ उचलता आला, तर संधीचे सोने करता येते हे तिने दाखवून दिले आहे.

### अडचणींवर मात

डॉक्टर, इंजिनीअर तर सर्वच होतात. मात्र पायलट होऊन काहीतरी वेगळे करायचे होते. आता अवकाशात भरारी घेण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याने आनंद झाला असला तरी खेड्यापाड्यातील, ग्रामीण, आदिवासी भागातील मुलींनीही अडचणींवर मात करीत पुढे यावे.

**- निर्मला खळे, पायलट**

### अनोखी भेट

आकाशाला गवसणी घालून निर्मलासारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने रौप्यमहोत्सवी वर्षात अनोखी भेट दिलीय. सोबतच मुक्त विद्यापीठाच्या मुक्त शिक्षणाचे अधिष्ठान किती भक्कम आहे हे आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. यामुळे विशेष आनंद वाटतो.

**- डॉ. अरुण जामकर, कुलगुरू**

**हैदराबादला प्रशिक्षण**

मुक्त विद्यापीठातून पदवी शिक्षण घेतानाच हैदराबाद येथील राजीव गांधी विंग्ज एव्हिएशनमध्ये निर्मलाने पायलट होण्यासाठी अर्ज केला व प्रवेशही मिळाला. मात्र तीन वर्षांसाठी २७ लाख २९ हजार रुपये शुल्क आणायचे कोठून? हा प्रश्न आ वासून पुढे आला होता. मात्र त्यावरही मात करत वाटचाल करणाऱ्या निर्मलाला समाजाकडून मदतीचा हात मिळाला. मात्र यासाठी तिला तब्बल पाच वर्षे संघर्ष करावा लागला. २०१० ते ऑगस्ट २०१३ या कालावधीत कमर्शिअल पायलटचे प्रशिक्षण पूर्ण झाले. स्वप्नांना गवसणी घालत पायलट म्हणून ती बाहेर पडली. तीन वर्षांतील दोनशे हवाई तासांच्या सरावानंतर तिला आता काही दिवसांतच केंद्र शासनाचा पायलटचा अधिकृत परवाना मिळणार आहे. प्रशिक्षणात फ्लाइंग क्लबमध्ये २०० तासांचा फ्लाइंग कोर्स पूर्ण करून सेसना - १५२ए ते सेसना-१७२ एअरक्राफ्ट निर्मला उत्तीर्ण झाली आहे. परवाना मिळाल्यानंतर नोकरीच्या शोधात निर्मलाचा खरा प्रवास सुरू होणार आहे.

### शब्दात मांडता न येणारा आनंद...

निर्मलाचा प्रवेश घेण्यासाठी ज्या दिवशी विद्यापीठात आलो त्या दिवशी शेवटची तारीख होती. घड्याळात साडेपाच वाजलेले. बाहेर पाऊस पडत होता. कर्मचारी घराकडे, तर मी कार्यालयात जात होतो. तिथे डॉ. एन. आर. शिंदे सरांनी अर्ज स्वीकारल्याने ती आज पदवीधर झाली याचा आनंद वाटतो. इथपर्यंत पोचण्यासाठी निर्मलाने खूप कष्ट घेतले. मुलगी असली, तरी मुलाप्रमाणेच तिच्यावर प्रेम केले. आता तिचे प्रत्यक्षात प्रवासी विमान उडविण्याचे स्वप्न पूर्ण व्हावे एवढेच.

**- पुंजाराम खळे, वडील**

घरची परिस्थिती बेताची... सहा जणांचे कुटुंब... अशा परिस्थितीतही उदरनिर्वाहासाठी केवळ शेतीचा सहारा... मात्र तरीही मनातली जिद्द पूर्ण करण्यासाठी कधी काळी कॉलेजला सायकलवरून जाणाऱ्या निर्मलाने हवेत दिसणाऱ्या विमानांवर स्वार होऊन वैमानिकपदाचे स्वप्न प्रत्यक्षात साकारल्याने तिच्या जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर मिळविलेल्या कर्तृत्वाला सलाम...!

**- संतोष साबळे**


# यशोगाथा



## कविता राऊत

## सावरपाडा एक्स्प्रेस

डोंगरदऱ्यांनी वेढलेल्या सावरपाड्यासारख्या दुर्गम भागात तिचे बालपण गेले. पायाखाली दुर्गम वाटा तुडवीत पाण्याच्या शोधासाठी तिने मैलोन्‌मैल भटकंती केली. पण केवळ खडतरता नशिबी घेऊन जन्मास आलेल्या या पावलांना नेमकी दिशा गवसली अन्‌ आंतरराष्ट्रीय धावपटू म्हणून सावरपाडा एक्स्प्रेस अर्थात कविताचा उदय झाला. राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा दबदबा निर्माण करणारी कविता राऊत हिची आजवरची वाटचाल एक दीर्घ साधना बनली आहे.



राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत कांस्य आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्य व कांस्य अशी कमाई करीत लागोपाठच्या या दोन्ही स्पर्धांमध्ये भारताचे नाव उंच करणारी धावपटू 'सावरपाडा एक्स्प्रेस'- कविता राऊत. चीनमधील गुआंगजऊ येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत १० हजार मीटर धावण्यात कविताचे सुवर्णपदक अवघ्या सेकंदाने हुकले. या प्रसंगी एखाद्या अतिमहत्त्वाकांक्षी आईने मुलीला फैलावर घेत दूषणे दिली असती अन्‌ मग मुलगीही आयुष्यभर या प्रसंगाचे ओझे मनावर वाहत राहिली असती. पण या प्रसंगाला कविताची समजूत तिच्या आईने काढली. आईचे बोल ऐकून कविताही आश्वस्त झाली!

अवघी चौथी शिकलेल्या आईच्या समंजस शब्दांनी कविताला आजवर अनेक कठीण प्रसंगांत आधार दिला आहे. गेल्या चार वर्षांपासून ती बंगळूरू येथे सराव करते आहे. वेगळ्या वातावरणाशी जुळवून घेताना अनेकदा ती अस्वस्थ होते, पण आईचे शब्द तिला बळ देतात. 'लंडन ऑलिम्पिक २०१२' नजरेसमोर ठेवून भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) बंगळूरू येथील मुख्य केंद्रात ॲथलिट्सना प्रशिक्षण दिले जात आहे. कविता २००६ पासून या केंद्रात आहे. त्यामुळे वेगवेगळ्या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी ती बंगळूरूहू जाते. साहजिकच नाशिकमधील सावरपाडा य मूळगावी तिचे येणे बरेच कमी झाले आहे. कष्टप्र अनुभवांमुळे कविताचे पाय कणखर बनले. नाशि जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत हरसूलच्य केबीएच विद्यालयाकडून खेळणाऱ्या कविता धावण्यात प्रथम क्रमांक मिळविला. पण ते वेगळेप तिचे वडील रामदास आणि आई सुमित्रा यांना फार तीव्रतेने जाणवले नाही. कविताच्या पायांमधी चमकदार दौड हेरली ती प्रशिक्षक विजेंद्रसिंग यां ते 'साई'चे ॲथलिट प्रशिक्षक.

नाशिकच्या स्पर्धेदरम्यानच विजेंद्रसिं यांनी कविताच्या पायांमधील दौड बघून तिच्य आई वडिलांची मानसिकता तयार केली. अ तिला नाशिकच्या भोसला शाळेच्या मैदाना तंत्रशुद्ध पद्धतीने धावण्याचे धडे देण्यास सुरुवा

**'महिला धावपटू म्हणून सावरपाड्यापासून माझं करिअर सु झालं. शालेय टप्प्यानंतर खेळातलं करिअर आणि शिक्षण यांच सांगड कशी घालावी, असा माझ्या समोरचा मोठा प्रश्न होता. प नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामुळे ह प्रश्नही सुटला. खेळातील करिअर आणि शिक्षण असा दोन्ही रस्त्यावरील प्रवास अखंडितपणे सुरू राहण्यास मदतच झाल आहे. सध्या मी मुक्त विद्यापीठाचा बी.ए. शिक्षणक्रम पूर्ण करी आहे. प्रतिकूलतेशी दोन हात करण्याची मानसिकताच आपल्याल यशाकडे घेऊन जाते, हे मी माझ्या आजवरच्या अनुभवाने सांगते.**

**– कविता राऊत,**
**आंतरराष्ट्रीय धावप**

केली. हिऱ्याला पैलू पाडल्यावर त्याचे तेज अधिकच फैलावले. गांधीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील शालेय स्पर्धेत धावण्यात रौप्यपदक मिळवून तिने यशाचा श्रीगणेशा केला. पुढे मग नाशिक येथे सराव आणि हरसूल येथे शिक्षण अशी कसरत कविता करत होती. कविताची ही ओढाताण पाहून सिंग यांनी तिला अकरावीसाठी भोसला महाविद्यालयातच प्रवेश मिळवून दिला. पण मग ती राहणार कुठे हा कविताच्या आई-वडिलांना पडलेला प्रश्नही सिंग यांनी सोडवला आणि २४ ऑक्टोबर २००२ पासून पुढील पाच वर्षे ती सिंग यांच्या घरीच राहिली. स्वत:चा एक मुलगा आणि एक मुलगी असलेल्या सिंग दाम्पत्याने आपली दुसरी मुलगी म्हणून कविताचा सांभाळ केला. तिच्या धावण्याच्या गतीकडे सिंग यांनी लक्ष पुरवले आणि त्याचे दृश्यपरिणाम दिसू लागले. एकापाठोपाठ एक विक्रम तिच्या नावावर झळकू लागले. पाच हजार मीटर धावणे, दहा हजार मीटर धावणे, अर्धमॅरेथॉन अशा स्पर्धांमधील तिच्या कामगिरीचा दबदबा इतका वाढला, की बीजिंग ऑलिम्पिकच्या संभावित ॲथलेटिक्सपटूंच्या चमूत तिची निवड करण्यात आली. परंतु तब्येत बिघडल्याने ऑलिम्पिकसाठी निवड होण्याचे तिचे स्वप्न भंगले आणि प्रीजा श्रीधरन या केरळच्या धावपटूची निवड झाली. ती निराश झाली, पण लवकरच नैराश्यातून बाहेर पडली. तिने पुन्हा कसून सराव सुरू केला. परिणामी नवी दिल्लीतील राष्ट्रकुल स्पर्धा आणि चीनमधील गुआँगजऊ येथील आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने नवीन इतिहास रचला.




कविताच्या यशामुळे हरसूल, सावरपाडा या भागास नवी ओळख मिळाली आहे. आज केवळ राऊत कुटुंबालाच कविताचा अभिमान वाटतो असे नाही, तर संपूर्ण हरसूल परिसराची हीच भावना आहे. नवी दिल्लीतील राष्ट्रकुल स्पर्धेत कविता धावणार हे समजल्यावर तिची कामगिरी 'याचि डोळा' पाहण्यासाठी ग्रामस्थांनी काय काय तयारी केली होती! ज्या ग्रामस्थांना स्पर्धेविषयी माहिती नव्हती, त्यांना ती व्हावी म्हणून ठिकठिकाणी माहितीफलक लावण्यात आले आहेत. एरवी उशिरापर्यंत त्र्यंबकेश्वरला घुटमळणारी गावातील मंडळी कविताच्या स्पर्धेची वेळ गाठण्यासाठी त्वरेने गावाकडे परतत. हरसूलचे उपसरपंच नितीन देवरगावकर यांच्या सहकार्याने मोठ्या पडद्यावर प्रक्षेपण पाहण्याची सुविधा गावात उपलब्ध करून देण्यात आली होती. कविता जिंकल्याचे जाहीर होताच हरसूल, सावरपाडा येथे जणू काही दिवाळीच साजरी झाली होती. सावरपाड्यात तर एरवी फटाके मिळणे मुश्कील पण काही मंडळींनी आधीच फटाके आणून ठेवले होते. ग्रामस्थांच्या गर्दीने कविताचे घर भरले होते. प्रत्येक जण एकमेकांना पेढे भरवीत होता. जणू काही आपल्याच मुलीने यश मिळविले, हीच सर्व पंचक्रोशीची भावना होती.

याच दृश्याची पुनरावृत्ती कविताला हरसूलला परत आल्यावर पाहायला मिळाली. नवी दिल्ली व चीन गाजवून 'आपली कविता' आपल्या गावी येणार, म्हणून जो तो सकाळपासून राबत होता. हरसूलचा प्रत्येक रस्ता दिवाळीप्रमाणे रांगोळ्यांनी नटला होता. कविताचे कौतुक करण्यासाठी दूरदूरच्या आदिवासी पाड्यांवरून मिळेल त्या वाहनाने किंवा पायी प्रवास करीत हजारो जण उपस्थित झाले होते. आपुलकीने व स्वयंस्फूर्तीने आलेली मंडळी होती. लेकीभोवती निर्माण झालेले वलय, तिला संस्कारासाठी घेऊन जाण्यास येणाऱ्या आलिशान गाड्या, पत्रकारांचा गराडा यामुळे आपली लेक 'लई मोठ्ठी' झालीय, याचे समाधान सुमित्राबाईंच्या डोळ्यामध्ये सहज वाचता येते. त्या मायलेकीचे नाते गहिरे आहे, त्यामुळे बंगळुरूहून कविता रोज किमान एकदा तरी फोनवरून आईशी बोलते.

कविता सांगते, 'आईशी बोलल्यावर मनाला वेगळंच समाधान वाटतं. दिवसभरात जे जे झालं, ते सर्व मी आईला सांगते. मात्र काही त्रास नाही सांगत. माझ्या त्रासाबद्दल ऐकून आईला उगीच वाईट वाटत राहतं ना म्हणून.'

कविता आहेच अशी हळवी. स्टारपदाच्या वलयाने तिच्या स्वभावात काही फरक पडलेला नाही.

कविताचे वडील रामदास राऊत वन खात्यात काही वर्षे नोकरीला होते. पण गोंदिया जिल्ह्यातल्या बदली झाल्याने त्यांनी नोकरीस रामराम ठोकला आणि सावरपाड्यातच शेती सांभाळण्याचा निर्णय घेतला. बापलेकीच्या नात्यातील वीणही तितकीच गहिरी. 'लहानपणी आमचे बोट धरून चालणाऱ्या कविताच्या पायांमध्ये मोठेपणी इतके बळ येईल.' असे तिच्या आई-वडिलांना कधी वाटलेच नव्हते. कविताच्या यशाचे सर्व श्रेय ते प्रशिक्षक विजेंद्रसिंग यांना देतात. कविता जेव्हा प्रतिकूल आर्थिक परिस्थितीशी झगडत होती, तेव्हा तिला आर्थिक मदत मिळावी म्हणून जो जो भेटेल, त्या प्रत्येकास विनंती करण्यात सिंग यांनी कोणताही कमीपणा वाटू दिला नाही. त्यांनी तेव्हा कमीपणा वाटू दिला असता तर कदाचित आज कविता या स्थानापर्यंत पोहचू शकली नसती.

गेल्या चार वर्षांपासून कविता कुटुंबापासून दूर राहत असली तरी तिने सर्वांचे प्रेम जपले आहे. त्यामुळेच चीनमधून भारतात परत

आल्यावर आधी तिने आई-वडील व भाऊ या सर्वांना पुणे ते बंगळूरू असा विमानप्रवास घडवून आणला. लेकीमुळे पहिल्यांदा विमानात बसता आले, याने आईला होणाऱ्या आनंदाचे मोजमाप कसे करणार? कविता वगळता संपूर्ण राऊत कुटुंबाने त्या दिवशी प्रथमच विमानप्रवास केला. कविताने तिच्या कुटुंबीयांना कर्नाटकचे पर्यटन घडविले. मुंबईमध्ये पोलिस सेवेत असलेला कैलास आणि नाशिक येथे एम. कॉम. चे शिक्षण पूर्ण करीत असलेला दिलीप या तिच्या भावांनाही बहिणीचा सार्थ अभिमान वाटतो. आता आपल्याला घरचे सण-समारंभ, उत्सव यांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होता येत नसल्याची खंत कविताला वाटते.

बंगळूरूच्या क्रीडाकेंद्रात कविताला अजून एका तिच्या आवडीच्या गोष्टीपासून दूर राहावे लागत आहे. वांग्याची भाजी आणि नागलीची भाकरी. कवितामुळे सावरपाड्याचे नाव आज सर्वदूर पसरले आहे. कविता तिथल्या मुला-मुलींची रोल मॉडेल झाली आहे. गावातील गरिबी आणि पाण्यासाठी वणवण सहन करणाऱ्या आजच्या पिढीला नवी उमेद मिळाली आहे. आपल्या गावाला मिळालेल्या प्रसिद्धीचा फायदा घेऊन तेथील समस्या दूर करता येतील, या आशावादी विचाराने काही मंडळी कामाला लागली आहेत. हरसूलच्या ज्या के.बी.एच. विद्यालयात कविता शिकली, त्या शाळेत मुलींची संख्या... असूनही तिथे... शिक्षक आहे. मुलींसाठी स्वच्छागृह.... सावरपाड्यापर्यंत जाण्यास रस्ता... पाण्याची व्यवस्था... अशा अनेक कामांना कविताच्या कामगिरीमुळे यश मिळाले आहे.

कोणत्याही खेळाडूसाठी शारीरिक तसेच मानसिक तंदुरूस्तीही महत्त्वाची असते. मानसिक बळ वाढण्यासाठी बंगळूरूच्या केंद्रात खेळाडूंना मार्गदर्शन केले जाते. कविता सरावात कधीच कसूर करत नाही. कविताचे इतर झगमगाटी गोष्टींकडे लक्षही नसते. केंद्रातील काही खेळाडू मनावरचा ताण हलका करण्यासाठी चित्रपटांचा आधार घेतात. कविता मात्र याला अपवाद ठरते. ती तिच्या जीवनप्रवासाची नायिका आहे.

**– संतोष साबळे**

# यशोगाथा



## कु. शीतल सवाईराम

## विद्यापीठ म्हणजे विद्येचे माहेरघर...

'ज्ञानगंगा घरोघरी' खरेच अतिशय सार्थ असे ब्रीद असलेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची मी विद्यार्थिनी. सन १९९६ मध्ये बी.ए.साठी घेतलेल्या प्रवेशाच्या निमित्ताने या विद्यापीठाशी पहिल्यांदा संबंध आला आणि आज माझ्या जीवनातील शैक्षणिक विद्येचे माहेरघर ठरलेल्या या विद्यापीठाचे स्थान अनन्यसाधारण आहे.

मी जिल्हा परिषद शाळा, रेड, ता. शिराळा, जि. सांगली येथे उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहे. डी.एड.च्या प्रवेशादरम्यान मनात एक सौम्य हुरहूर लागली होती की, मला यापुढेही उच्च शिक्षण घ्यावयाचे आहे, कदाचित नोकरीमुळे ती इच्छा अपूर्णच राहणार की काय? पण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने ही हुरहूर दूर तर केलीच, पण जीवनाला योग्य आकार, वळणही दिले.

या विद्यापीठातर्फे मी बी.ए., बी.एड., डी.एस.एम. व एम.एड. शिक्षणक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. एक अभिमानाची गोष्ट मी आवर्जून सांगेन, ती म्हणजे डिसेंबर २०१० मध्ये मी सेट परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झाले. सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यात या विद्यापीठाचे शैक्षणिक साहित्य व विद्यापीठातील आणि अभ्यासकेंद्रावरील प्राध्यापक वर्ग यांचा वाटा खूप मोलाचा आहे.

या विद्यापीठाच्या पुस्तकांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक आशयाला त्यांनी दिलेली दैनंदिन जीवनातील उदाहरणांची जोड होय. त्यामुळे मूळ संबोध तर स्पष्ट होतातच, पण जीवनविषयक व्यवहारज्ञानही समृद्ध होत जाते. मी शिक्षणशास्त्र सेट परीक्षेसाठी या विद्यापीठाच्या बी.एड., एम.एड. व डी.एस.एम. या पुस्तकांचाच अगदी खोलवर केलेला अभ्यास मूलभूत संबोध स्पष्टीकरणासाठी खूपच उपयोगी ठरलेला आहे. त्यामुळे या पुस्तक लेखनात ज्या थोर व्यक्तींनी आपले योगदान दिले आहे ते खरोखर अनमोल आहे.

**''अधिकाधिक विद्यार्थ्यांनी, व्यक्तींनी आपली शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता उंचावण्यासाठीही, पण त्याचबरोबर सर्वंकष विचारपद्धती, दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी जीवनशैली व दर्जा सुधारण्यासाठी, तो योग्य रीतीने विकसित होण्यासाठी या विद्यापीठाच्या ज्ञानप्रवाहामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे ही अगदी आत्मिक इच्छा आहे.''**

– कु. शीतल सवाईराम

# यशोगाथा

## संजय डुंबरे

## मुंबईच्या डबेवाल्यांनाही भरवला शिक्षणाचा घास

सकाळी ९.५८ ची डोंबिवलीवरून सी.एस.टी.ला जाणारी लोकल पकडायची... मस्जिद बंदर गाठायचे... व्यवसाय करणाऱ्या बांधवांपर्यंत अचूक वेळेत डबा पोहचावा यासाठीची घाई... हा मुंबईच्या डबेवाल्यांचा दैनंदिन व्यवहार... विविध रेल्वेस्थानकांवरून हा प्रवास सुरू असतो... संजय रभाजी डुंबरेचाही हा प्रवास १९९९ पासून सुरू झाला... आजही तो रेल्वे पकडण्यासाठी घरातून घाईत निघतो. मात्र डबे पोहचवण्यासाठी नाही तर आपल्या डबेवाल्या सहकाऱ्यांना भविष्य निधी (विमा पॉलिसी) पुरविण्यासाठी... त्यांचे आयुष्य स्थिर व्हावे यासाठी... तो काही ना काही प्रयत्न करीत असतो. मुक्त विद्यापीठातून बी.ए.ची पदवी पूर्ण करून उच्च शिक्षण घ्यायचे आणि आपल्या डबेवाल्या सहकाऱ्यांनाही शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याचा संजयचा मानस आहे.

वडील आणि दोन भाऊ मुंबईत डबे वितरणाचे काम करीत होते. संजय अक्षरशः आइस्क्रीम विकून आपले शालेय शिक्षण अहमदनगर येथे पूर्ण करीत होता... येथे असताना त्याने आपले शिक्षण पुढे रेटले... मात्र, आपल्या भावाच्या निधनानंतर त्याच्या जागेवर डब्यांचे वाटप करण्यासाठी तो मुंबईला आला. मुंबई डबेवाला असोसिएशनचा मेंबर झाला अन् त्याचा दैनंदिन प्रवास सुरू झाला. वेळेवर लोकांना डबे पोचविणे हा नित्याचाच उद्योग असला तरी त्याची शिक्षणाची आवड काकणभरही कमी झाली नाही. आपला व्यवसाय करीत असताना रात्रशाळेत जाऊन अतिशय मेहनतीने संजयने बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले... परंतु नंतर कुटुंबातील जबाबदाऱ्या वाढत गेल्याने शिक्षणाचा खर्च परवडेनासा झाला. पुन्हा शिक्षणात खंड पडला... आर्थिक चणचण आणि काहीतरी नवीन करण्याची जिद्द असल्याने संजय दुपारी मिळणाऱ्या मोकळ्या वेळेत इंग्लिश स्पीकिंग आणि इंटरव्ह्यू स्किल्स शिकत होता.

त्याच्या प्रयत्नाने त्याला २००७ मध्ये फायनान्शियल इन्स्टिट्यूट जीई कॅपिटल या कंपनीत नोकरी मिळाली व आपल्या कौशल्याने सीनिअर एक्झिक्युटिव्ह या पदापर्यंत त्याने मजल मारली. २००७ ते २०११ या कालावधीत नोकरीसाठी तो हैदराबादमध्ये कार्यरत होता. मात्र, याच काळात नोकरी करत असताना हैदराबाद ते मुंबई प्रवास करून त्याने दुरस्थ पद्धतीने बी.ए. प्रथम व द्वितीय वर्ष पूर्ण केले.

आता तो घाटकोपर येथील एस.बी.आय. बँकेत सेल्स विभागात आहे. शिक्षण कधीच वाया जात नसते, उलट ते आयुष्यात आपल्याला पुढेच नेते या मताचा असलेल्या संजयने आता आपल्या डबेवाल्या ५० सहकाऱ्यांना भविष्य निधीचा विमा मोफत मिळवून दिला... कारण, मुंबईतील चार ते पाच हजार डबेवाले रोज वादळ-वाऱ्यात, ऊन-पावसात प्रवास करून डबे वेळेवर पोहचविण्याचे कार्य अविरत आणि प्रामाणिकपणाने करतात त्यांची त्यांच्या कामावर पूर्ण श्रद्धा असल्याचे त्यांच्या मेहनतीतून दिसते. मात्र, रेल्वेतून, सायकलवरून, हातगाडीवरून मुंबईच्या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या या डबेवाल्यांचे अपघाती निधन झाले तर त्यांच्या कुटुंबाचा कुणीही वाली नाही किंवा बचत करण्याइतपत त्यांचे उत्पन्नही नसते. म्हणूनच भावाच्या निधनानंतर जसे संजयला डबे वितरणाचे काम करावे लागले तसेच इतर मुलांनाही आपल्या वडिलांच्या अपघातानंतर करावे लागते. म्हणून संजयने संघटनेतील सर्वच डबेवाल्यांची विमा पॉलिसी काढण्याचे ठरविले आहे.

योग्य मार्गदर्शन नसल्याने आणि कुटुंबाची जबाबदारी पेलण्यासाठी अनेक एम.ए./पदवीधारक आपल्या वडिलांनंतर हा व्यवसाय करताना दिसतात. या मुलांसाठी एक वेबसाइट काढण्याचा विचारही संजय करीत आहे. ज्यावर फक्त डबेवाल्यांच्या मुलांना रोजगार उपलब्ध करून देण्याची सोय असेल. आज संजय आपल्या कुटुंबातील सहा व्यक्तींचा सांभाळ करीत असून मुक्त विद्यापीठात उच्च शिक्षण घेत आहे.

– श्रद्धा मेश्राम

**"मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार यांनी स्वतः डबेवाल्यांची भेट घेऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले याचे मला कौतुक वाटते. हे विद्यापीठ आमच्यासाठी एक आधार ठरले आहे. विद्यापीठाच्या सहाय्याने मला पुढे जाण्याची संधी मिळाली. माझ्या शिक्षणाचा फायदा डबेवाल्यांचे भविष्य स्थिर करण्यासाठी करण्याचा माझा निर्धार संजयने केला आहे. जणू मुंबईच्या डबेवाल्यांना मुक्त विद्यापीठाने शिक्षणाचा घास भरवला आहे असे मला वाटते."**

**–संजय डुंबरे**


# यशोगाथा



## अपर्णा मालीकर

## जिद्दी अपर्णाचा करोडपती श्वास...!

लेट्स प्ले... 'कौन बनेगा करोडपती' असे म्हणत, महानायक अमिताभ बच्चनने प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. प्रश्न कधी सोपा... तर कधी अवघड... कधी उत्सुकता वाढवणारा... तर कधी पेचात टाकणारा... कधी ऑडिअन्स पोल... तर कधी फोन अ फ्रेंड. 'केबीसी'च्या हॉट सीटवरचा हा डाव क्षणाक्षणाला रंगत गेला. अखेर आठव्या प्रश्नापर्यंत पोचत तिने तब्बल सहा लाख चाळीस हजार रुपये जिंकले. तिच्या तल्लख बुद्धीने प्रभावित झालेल्या बिग बी नेही स्वतःच्या मानधनातून ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. अमिताभच्या प्रश्नांची उत्तरे देणारी ही व्यक्ती कुणी जयपूरची कविता शर्मा, दिल्लीची रोमी गुप्ता नव्हती, तर ती होती चक्क यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेत असलेली विदर्भातील एका आत्महत्याग्रस्त कुटुंबाची एकमेव प्रमुख अपर्णा संजय मालीकर...!



यवतमाळ जिल्ह्यातील बारा कवठा येथील अपर्णा ही संजय मालीकर यांची पत्नी. रोहिणी (वय ७) व समृद्धी (वय ४) या दोन मुली. घरची परिस्थितीही बेताचीच. उत्पन्नाचे दुसरे कोणतेही स्रोत नसल्यामुळे संजय मालीकर स्वतःच्या ६ एकर जमिनीत शेती करून, संसाराचा गाडा आनंदाने पुढे रेटत होते. अशातच निसर्गानेही आपली वक्रदृष्टी वळविली. सततच्या नापिकीचा सामना संजय मालीकर यांना करावा लागला. दुसरीकडे कर्जाचे ओझे वाढू लागले. अखेर कर्जबाजारीला कंटाळून २१ ऑगस्ट २००८ रोजी संजय मालीकर यांनी विषारी द्रव्य प्राशन करून आपली जीवनयात्रा संपविली. पतीच्या अकाली जाण्याने अपर्णावर आभाळच कोसळले. एकीकडे बँकेचे कर्ज तर दुसरीकडे मुलींचे आयुष्य या वैचारिक, मानसिक संघर्षातून ती घोळून निघू लागली. पतीच्या निधनानंतर रुढीपरंपरेच्या सामाजिक सक्तीचा जाच न सोसत राहता, कुटुंबाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. येणाऱ्या प्रत्येक अडचणीला सामोरे जात, अपर्णा स्वतः शेती करून मुलींचे शिक्षण करू लागली.

प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्याचे बळ अपर्णामध्ये आलेलं होतं तरीही केवळ शेतीवर आत्मनिर्भर राहून आर्थिक बाजू बळकट होणार नाही, या स्वतंत्र जाणिवेतून तिने 'सोनी' एंटरटेन्टमेंट टेलीव्हिजनवरून प्रसारित होणाऱ्या 'कौन बनेगा करोडपती' या रिॲलिटी शोमध्ये सहभागी होण्याचा धाडसी निर्णय घेतला. विदर्भ जन आंदोलन समितीचे नेते किशोर तिवारी यांच्या पुढाकाराने विदर्भातील दहा शेतकरी विधवा महिलांची नावे 'केबीसी'कडे पाठविण्यात आली. 'केबीसी'ची सहनिर्माती सपना अय्यर यांनी त्यापैकी मंजूषा अंबरवार ही आत्महत्याग्रस्त शेतकरी कन्या व अपर्णा मालीकर या विधवेची निवड केली. अय्यर यांनी २ सप्टेंबरला वारा-कवठा येथे येऊन प्रत्यक्ष आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट घेतली. काही दिवसांनंतर अय्यर यांनी अपर्णा मालीकर हिला 'केबीसी'त सहभागी होण्याकरिता आमंत्रित केले. वडील अरुण ताठे, अपर्णा आणि मंजूषा हे तिघेही विमानाने मुंबईला पोहचले. एरवी पोटाची खळगी भरण्यासाठी वणवण भटकणारी अपर्णा विमानप्रवास, मुंबईचा झगमगाट आणि फाइव्ह स्टार हॉटेलमधील व्यवस्था पाहून गहिवरून गेली.

१० सप्टेंबरला सायंकाळी अपर्णा महानायक अमिताभ बच्चन यांच्या समोरील हॉट सीटवर विराजमान झाली. तो अनुभव तिच्यासाठी स्वप्नवतच होता. सुरुवातीला दडपण आलेल्या अपर्णाने पहिल्या प्रश्नाच्या उत्तरासाठी ऑडिअन्सची मदत घेतली. मात्र हळूहळू महानायकाच्या उदार वाणीने तिच्यावरचे दडपण कमी होत गेले आणि पुढील प्रश्नाला ती धीटपणे उत्तरे देऊ लागली. तीन प्रश्नांच्या उत्तरांसाठी फोन अ फ्रेंड, एक्स्टपर्ट आणि प्रेक्षकांची मदत घेतली. उर्वरित तीन प्रश्नांची उत्तरे तिने स्वतः दिली. अखेर आठव्या प्रश्नांपर्यंत पोहचत तिने तब्बल सहा लाख चाळीस हजार रुपये जिंकले. तिचा संघर्ष आणि साहसाचे कौतुक करून खुद्द अमिताभ बच्चन यांनी वैयक्तिक ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली परंतु प्रत्यक्षात मात्र १ लाख रुपयांचा धनादेश पाठवून बिग बीनेही आपले औदार्य दाखवून दिले.

अपर्णाच्याच काळातील स्त्रियांची विविध क्षेत्रातील कामगिरी, झपाट्याने बदलणारे सांस्कृतिक पर्यावरण, स्त्री जीवनात झालेली परिवर्तने या बदलांचा परिणाम तिच्या मानसिक जडणघडणीवर होत गेला. 'शिक्षण' हेच विकासाचे मुख्य स्त्रोत आहे या प्रगल्भ जाणिवेतून तिने उच्च शिक्षणाचा निर्धार केला. 'शिक्षणाची जिद्द असलेल्या प्रत्येकाला शिक्षण' हा एकमेव उद्देश असलेल्या मुक्त विद्यापीठात अपर्णाने स्वयंसाहाय्य गट प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रमाला प्रवेश घेतला. या शिक्षणक्रमाच्या माध्यमातून बचत गट सुरू करण्याचा मानस तिने व्यक्त केला आहे. अपर्णा म्हणते, 'शहरी भागातील स्त्रियांच्या सामाजिक व कौटुंबिक स्तरावरील प्रश्नांची दग्धता बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे, मात्र ग्रामीण भागातील अजूनही अज्ञानाआड दडलेल्या, रूढीपरंपरेने जखडून ठेवलेल्या महिलांची घुसमट होत आहे. अशा महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे.'

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी विदर्भावरचे अख्खे आभाळच अंधारून गेले असे नाही. त्या अंधारातही नवप्रकाश निर्माण करू पाहणारे काजवे आहेत. अपर्णाही त्यातलीच एक. ज्या अपर्णाचा समय खरेतर तीन वर्षांपूर्वीच थांबला होता. त्या तीन वर्षांमध्ये परिस्थितीशी झगडताना सर्व लाईफलाइनही संपल्या होत्या तरीही दुर्दम्य इच्छाशक्ती आणि कठोर परिश्रमाच्या ताकदीवर तिने आतापर्यंतचा प्रत्येक 'एपिसोड' यशस्वी करून तिच्यासारख्याच अनेकींसमोर आदर्श निर्माण केला आहे. तिला अजूनही खूप मोठी भरारी घ्यायची आहे. आता फक्त स्काय इज द लिमिट...!

**- आशिष यावले**

# यशोगाथा



क्रांती डोंबे

## शिक्षणानेच घडू शकते आयुष्यात 'क्रांती'

बालपणीच वडिलांचे छत्र हरवलेले, आई अंगणवाडी ताई, दहावीपर्यंतचे शिक्षण गावातल्याच जिल्हा परिषदेच्या शाळेत... हा क्रांती काशीनाथ डोंबे या युवतीचा भूतकाळ आहे. पण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत राज्यातून मुलींमध्ये जिल्हा उपनिबंधकाच्या यादीत पहिली येण्याचा मान तिने मिळविला!

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत ४६४ गुण मिळवून क्रांती काशीनाथ डोंबे ही राज्यात जिल्हा उपनिबंधकाच्या यादीत मुलींतून प्रथम आली. तीन महिन्यांपूर्वीच औरंगाबाद येथे विक्रीकर निरीक्षकपदावर रुजू झालेल्या क्रांतीचा आधीचा प्रवास मात्र खडतर आहे.



आजही मराठवाड्यात शिक्षणाविषयीची अनास्था अनेक स्तरांवर दिसून येते. मात्र, गेल्या तीन-चार वर्षांपासून स्पर्धा परीक्षेच्या नकाशावर मराठवाड्यातील युवावर्गाची छाप दिसून येते. पाथरी या तालुक्याच्या ठिकाणापासून जवळ असलेल्या हादगाव येथील क्रांती डोंबे यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. घरात तीन बहिणी, आई गावातच अंगणवाडी ताई. क्रांती दोन वर्षांची असतानाच वडिलांचे निधन झाले. मात्र क्रांतीच्या आईने मुलींच्या शिक्षणासाठी कंबर कसली. प्रसंगी लोकांकडून उसने पैसे घेऊन या मुलींना शिकविले.

क्रांतीचे दहावीपर्यंतचे शिक्षण गावातच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. शिक्षण घेत असताना क्रीडाशिक्षक कैलास माने यांनी तिच्यातील अभ्यासूवृत्ती, चिकाटी, सभाधीटपणा हे गुण हेरले आणि तिचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी विविध प्रयत्न केले. वेळोवेळी तिला स्पर्धा परीक्षा देण्यासाठी मार्गदर्शन करत राहिले. दहावीनंतर क्रांतीने परभणी येथील जिजाऊ ज्ञानतीर्थ निवासी गुरुकुलात शिक्षण घेतले. या ठिकाणी तिला शिक्षकांनीच आर्थिक मदत केली. बारावीला कला शाखेतून मराठवाड्यातून क्रांती दुसरी आली आणि परभणी येथील शासकीय अध्यापक विद्यालयातून तिने डी.एड. पूर्ण केले. मात्र तिच्यातील स्पर्धा परीक्षेला बसण्याची ऊर्मी तिला स्वस्थ बसू देत नव्हती.

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केवळ झापड लावून करणे चुकीचे आहे असे क्रांती सांगते. प्रत्येक मुद्द्याचा अर्थ समजून घेणे आणि प्रश्नपत्रिका सोडविणे महत्त्वाचे ठरते, असे सांगून वेळोवेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, शासकीय सेवेतील अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याने आपला आत्मविश्वास वाढला असल्याचेही ती सांगते.

**''यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बी.ए.ची पदवी घेतल्यानंतर पुणे येथे अभ्यासासाठी गेल्यानंतर मला स्पर्धा परीक्षेचा सखोल अभ्यास कसा करावा, ते कळले. कुठल्याही प्रकाशनाची भरमसाट पुस्तके वाचण्यापेक्षा मी ठरावीक महत्त्वाची पुस्तके जास्तीत जास्त वेळा वाचली. दररोज आठ ते दहा तास सातत्याने अभ्यास केला. पहिली ते दहावीपर्यंतची पाठ्यक्रमावर आधारित पुस्तके सातत्याने अभ्यासली. लोकराज्य योजना, कुरुक्षेत्र ही शासनाची मासिके नेमाने वाचून त्याची टिपणे ठेवली.''**

**- क्रांती डोंबे**

**"कधी कधी त्याकडे विद्यार्थी दुर्लक्ष करतात. मात्र स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने तो मुद्दा महत्त्वाचा असतो. त्यामुळे प्रत्येक मुद्याला सारखेच महत्त्व देऊन अभ्यास करणे उत्तम. नेमाने आपल्या अभ्यासातील उणिवा तपासणे आणि चुका सुधारण्याचा प्रयत्न केल्याने खूप फरक पडतो. आकलनावरही विशेष भर द्यावा."**

**- क्रांती डोंबे**

ग्रामीण भागातील मुलींनी स्पर्धा परीक्षेकडे जास्तीत जास्त वळावे या संदर्भात बोलताना क्रांती म्हणाली की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयीची माहिती व मार्गदर्शन शालेय स्तरावरच मिळणे गरजेचे आहे. शिक्षक, पालकवर्गाने विद्यार्थ्यांना प्रामुख्याने मुलींना स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी उत्तेजन द्यायला हवे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न व्हायला हवेत. तरच आगामी काळात भारताच्या प्रशासकीय सेवेत ग्रामीण भागातील मुली विराजमान होताना दिसतील. काम करताना लोकाभिमुख प्रशासनासोबतच तळागाळातील सर्वसामान्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आपले उद्दिष्ट असल्याचे क्रांतीने नमूद केले.

आता अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत जिल्हाधिकारी होण्याचे तिचे स्वप्न आहे. आपल्या या यशात आईच्या परिश्रमाचा वाटा ती अत्यंत कृतज्ञतेने नमूद करते. कैलास माने यांच्यासारखे शिक्षक जर मिळाले नसते, तर ही धडपड सार्थकी लागली नसती. या यशात त्यांचाही महत्त्वाचा वाटा असल्याचे ती सांगते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर जिद्द, चिकाटी व शिस्त असावीच लागते. कठोर परिश्रमाशिवाय यश मिळविताच येत नाही, असा मंत्र देऊन आपल्या जीवनात क्रांती घडविणाऱ्या क्रांती डोंबे हिच्या जिद्दीला सलाम.

**- संतोष साबळे**

# यशोगाथा




वनमाला भामरे

## प्रतिकूलतेतून अनुकूलता

एका खेड्यात जन्म झालेल्या मुलीची ही गोष्ट प्रतिकूलतेतून अनुकूलता कशी सिद्ध होते याविषयीची. अडचणीचे रूपांतर संधीत करण्याची ही गोष्ट. ही गोष्ट सर्वसामान्याची आहे ज्यात सर्वसामान्य मुलींचे व्यक्तीमत्त्व प्रतिबिंबित होते.

लहानपणापासून शिक्षणाची नितांत आवड, अगदी पास व नापास या शब्दातला फरकही तेव्हा कळत नव्हता. शाळेत जाणे म्हणजे काहीतरी ज्ञान होणे ही भावना आधीपासून. शाळेवर, गुरूंवर मनापासून श्रद्धा, प्रेम व आदर. शाळेला कधी दांडी मारायचा विचारच डोक्यात यायचा नाही. त्यामुळे जसजसे वय वाढत होते तसतसे मोजके वा मर्यादित का असेना पण ज्ञानदेखील वाढत होते.



मुलगी म्हणून जगताना समाजाची उपेक्षा मला खूप जाणवली. घरात जास्त मुली जन्माला येणे म्हणजे जणू पापच अशी भावना माझ्या मनात कोरली गेली. पण आई-वडिलांची खंबीर साथ असल्याने सात मुली असल्या म्हणून काय झाले? त्यांना शिकवायचेच हा त्यांचा विचार पक्का. माझ्या बाबतीत तर वडिलांचे शब्द नेहमीच मुलगी नाही तर मुलगाच आहे असे. त्यामुळे समाजात निर्भीडपणे रुबाबदारपणे जगायचे. वेगवेगळ्या मैदानी स्पर्धांत भाग घेणे त्यामुळे माझी उंची खूप वाढली व हीच नेमकी आयुष्याची भविष्याची सूचक नांदी ठरली. दहावीची परीक्षा चांगल्या गुणांनी पास झाल्यानंतर पुढे कोणत्या फॅकल्टीत प्रवेश घ्यायचा हेच कळले नाही. पण आपण उत्कृष्ट शिक्षक होऊ शकतो म्हणून डी.एड.चे वेध लागलेले. त्यातून कला शाखेस प्रवेश घेतला. परंतु वय वाढले तशी आई-वडिलांची चिंता वाढायला लागली. त्या वयात मला शिक्षणाची चिंता, टक्के मिळवायची धडपड त्याच वेळेस लग्नाची घाई अशी दुहेरी अवस्था माझ्या वाट्याला येत होती. माझी फक्त एकच अपेक्षा मी आई-वडिलांना सांगितली की, मला स्थळ पाहताना एक गोष्ट कबूल करायची ती म्हणजे लग्नानंतर मला शिकविले पाहिजे. त्यावेळेस आयुष्याच्या भावी वाटचालीचे स्वप्न न रंगवता मला शिकून पुढे कसे जाता येईल याचीच स्वप्ने मी पाहत होती. आदर्श व्यक्तिमत्त्वाचा पगडा मनावर होता. त्यामुळे कितीही परिस्थिती वाईट असली तरी ती आपल्याला ध्येयापासून वंचित ठेवू शकत नाही म्हणून जीवनात अनेक अडचणी आल्या; परंतु त्या कधी संकटासारख्या भासल्याच नाहीत एवढी शक्ती देवाने मला कुठून दिली याचेच आश्चर्य वाटते. डी.एड.ला नंबर लागला नाही, एकीकडे संसाराला सुरुवात झाली. एकत्र कुटुंबात सर्व कामांना सामोरे जावे, रात्री पुन्हा वेळ मिळाला तर अभ्यास करणे. घरात वर्तमानपत्रदेखील हातात घ्यायला बंदी असे वातावरण. मग रात्री वाचन करणे असा प्रवास सुरू झाला पण आयुष्यात मला जीवनसाथी एवढे प्रेमळ मिळाले की माझा ध्यास, वाचनवेड त्यांनी ओळखले सर्वांचा विरोध पत्करून या सावित्रीला पुन्हा शिक्षणाची संधी मिळवून दिली ती संधी एवढी मोठी होती की, मी माझ्यासाठी ती एक पर्वणी होती. मला आकाश ठेंगणे झाल्यासारखे वाटत होते. तेव्हा समजले की, प्रेमाची माणसे आपले हित, आपल्या अपेक्षा कशा समजतात. मी पण क्षणाचाही विचार न करता पुढील शिक्षणाला सुरुवात

केली. काही दिवस सासरी, माहेरी काढून माझा शिक्षणप्रवास सुरू झाला. जीवनातील सर्व आलेखित नियमाच्या अधीन राहून शिक्षणप्रवास चालू ठेवला.


ज्या विषयात कमी मार्क्स मिळाले म्हणून डी.एड.ला जाऊ शकले नाही त्याच विषयात बी.ए. पदवी पूर्ण केली. संसारवेलीवर सुंदर बाळ जन्माला येऊन, चूल, मूल व शिक्षण अशी कसरत सुरू झाली.

पण मनात एमपीएससी परीक्षा देण्याची खूप इच्छा पण खेड्यात राहून अनेक संधी गेल्या. पुस्तकांची उपेक्षा, एमपीएससी परीक्षा देणे सामान्य माणसाचे काम नाही, अशी गैरसमजूत. त्यामुळे जीवनाच्या ध्येयापासून विचलित होऊन शिक्षकी पेक्षा मी स्वीकारला.

एक शिक्षिका म्हणून आदिवासी भागात काम करताना मुलांना इंग्रजी विषयाची गोडी लावली. त्यांच्या अडचणी समजून घेऊन मार्गदर्शन केले. त्यातच मी पुन्हा एम.एड.ला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतला. सुरुवातीला मला एम.एड. खूप कठीण वाटत होते. परिस्थितीदेखील खूप बिकट होती. लहान मूल, नोकरी, शिक्षण अशी तारेवरची कसरत चालली होती पण या दिव्यातून पार पडण्यासाठी खूप परिश्रम घेतले. संशोधनाची काहीही कल्पना नसताना संशोधन करणे म्हणजे मोठी अवघड गोष्ट. पण म्हणतात ना 'अ विल फाईंड अ वे.' तशा मार्गदर्शिका श्रीमती धारणकर मॅडम मला भेटल्या व त्यांच्या व्यक्तीमत्त्वातील चुणूक मला इतकी भावली की, त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप आहे. मला माहीत नसलेल्या विषयाबद्दल मी खूप माहिती मॅडमकडून मिळवून घेतली. त्यांनी माझ्यातील गुण ओळखून मला एम.एड. पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. कारण या पदवीस्तर पदवीमुळेच आज मी इथवर पोचले. म्हणून वेळेवर मार्गदर्शन करणारा गुरूदेखील हा मला देवासारखा वाटला. एम.एड. पूर्ण केल्यानंतर मी स्थानिक स्वराज्य संस्थांअंतर्गत विस्तार अधिकारी परीक्षा दिली. त्यात माझी निवड झाली. मला पहिल्यांदा एवढा आत्मविश्वास वाटला की अरे मी स्पर्धेत टिकू शकते. मग कालांतराने हळूहळू एमपीएससी परीक्षेविषयी मी माहिती मिळवायला सुरुवात केली. शैक्षणिक पदव्या घेतल्यानंतर पुन्हा एमपीएससी देण्यासाठी मी स्वतःच अभ्यासाला लागले. त्यामुळे मी गटशिक्षणाधिकारी, गृहप्रमुख अधिव्याख्याता वर्ग १, अधिव्याख्याता वर्ग २, शिक्षणाधिकारी वर्ग १ च्या परीक्षा झपाट्याने पास झाली. नऊ वर्ष माध्यमिक शिक्षिका सेवा केल्यानंतर आज मी जिल्हाशिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे अधिव्याख्याता म्हणून कार्यरत आहे.

आता या विद्यापीठातून पी.एचडी. करण्याची संधी आमच्यासारख्यांना उपलब्ध व्हावी ही अपेक्षा व्यक्त करून माझ्या यशाच्या वाटेकरी असणाऱ्या सर्व गुरूंना, मार्गदर्शकांना, मित्रांना मनापासून नमस्कार करून माझी लेखणी येथेच थांबवते.

# यशोगाथा



## योगेश सुपेकर

## माझ्या विद्यापीठाचा मला अभिमान आहे!

सर्वप्रथम ज्ञानगंगोत्री घरोघरी पोचविणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

मी योगेश राजेश सुपेकर आज जो काही आहे तो या विद्यापीठामुळे.

मी पुण्याच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील आपल्या केंद्रात २००८ साली एफ.वाय.बी.ए. साठी ॲडमिशन घेतले. विद्यापीठामध्ये कला/क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणाऱ्या इंद्रधनुष्य/अश्वमेध या स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मला समजले. मला पहिल्यापासून अभिनेते/नेते यांच्या नकला करण्याची आवड असल्याने मी पुण्यात छोटेखानी कार्यक्रमांतून माझी मिमिक्री सादर करीत असे. त्या वेळी पुणे विभागीय युवा महोत्सव होता. सरांनी सुचविले आणि मी सहभाग घेतला. प्रथम आलो, मला खूप आनंद वाटला.



विद्यापीठाने त्या युवा महोत्सवात घवघवीत यश मिळविले. मुक्त विद्यापीठाचा झेंडा पाच राज्यांतील त्या भव्य युवा महोत्सवात डौलाने फडकला. नामवंत विद्यापीठांवर मात करीत आपल्या विद्यापीठाने बाजी मारली. थिएटर ट्रॉफी जिंकली. माइम, मिमिक्री, एकांकिका, नृत्यस्पर्धा जिंकलो. पाच मिनिटात एकूण १७ जणांचे आवाज काढत मी गुजरातमध्ये मिमिक्री करिता प्रथम क्रमांक मिळविला.

त्यानंतर पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड केलेला संघ विद्यापीठाच्या वतीने बंगालला पोचला. अवघ्या भारतातील विविध प्रांतांतील, भाषा, संस्कृती, काल यांचे दर्शन घडविण्यास भारावून टाकणारा युवा महोत्सव होता.

मी मिमिक्री सादर केली. चार मिनिटे ४० सेकंदांत २२ आवाज काढले. बंगालचा स्टार मिथुन चक्रवर्तीचा बंगाली भाषेत डायलॉग सादर करून स्टेजवरून खाली आलो. आणि अनाउंसमेंट झाली, मिमिक्री फर्स्ट यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र ओपन युनिव्हर्सिटी नाशिक. एकच जल्लोष, एकच आरडाओरडा करीत आम्ही स्टेजच्या दिशेने पळत सुटलो. आम्ही दाखवून दिले आम्ही जरी ओपन युनिव्हर्सिटीचे असलो तरी आम्हाला कमी समजू नका.

टीव्ही ९ मराठी या चॅनेलवर गोष्ट धमाल नेत्यांची ही मालिका सध्या चालू आहे. मी स्वामी विवेकानंद युवा गौरव राज्य पुरस्कार मिळवू शकलो, झी मराठीच्या हास्यसम्राट भाग २ मध्ये सहभागी होऊ शकलो, आत्ताच्या घडीला सांस्कृतिक क्षेत्रात हास्य अभिनेता, म्हणून जी ओळख मला लाभली त्यात खरे श्रेय मी आपल्या विद्यापीठाला देतो.

विद्यापीठातील सांस्कृतिक चळवळ अजून तीव्र झाली पाहिजे. राष्ट्रीय स्तरावर यापुढेही घवघवीत यश मिळविले पाहिजे त्यासाठी चांगले कलाकार विद्यार्थी/विद्यार्थिनींनी सहभाग घेतला पाहिजे.

महाराष्ट्रात कुठेही भेट झाली तरी अभिमानाने ओळख द्या. आणि अभिमानाने सांगा, मी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा विद्यार्थी आहे म्हणून...

**"मुक्त विद्यापीठ नसते तर माझ्यासारखा मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी कधीच राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवू शकला नसता आणि कमी खर्चात पदवीधर होऊ शकला नसता. मनासारखे शिक्षण घेऊ शकला नसता. असे महाराष्ट्रातील तळागाळातील खूप विद्यार्थी मित्रमैत्रिणी आहेत की ज्यांच्या आयुष्याला विद्यापीठाने कलाटणी दिली आहे, बदलवलेले आहे."**

**- योगेश सुपेकर**

# यशोगाथा



## ॲड. हितेश शहा

## ...आणि वाल्ह्याचा झाला वाल्मीकी

वाल्याचा वाल्मीकी झाल्याचे आपण पुराणात वाचले-ऐकले. पण नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात २३ वर्ष शिक्षा भोगलेल्या एका तरुणाने आपल्या आयुष्याची दुसरी इनिंग मोठ्या थाटात सुरू केली आहे. त्या तरुणाचे नाव आहे हितेश शहा.

हितेशने आपल्या आयुष्याची तब्बल २३ वर्षे कारागृहात काढली. मात्र हितेश आता उच्च न्यायालयात वकिली करणार आहे. वाल्याचा वाल्मीकी झालेल्या हितेशच्या आयुष्याची चित्तरकथाही तेवढीच रंजक आहे. मूळचा सुरतचा असलेल्या हितेशच्या हातून १९८९ मध्ये मुंबईत एका व्यक्तीचा खून झाला. १९९२ मध्ये त्याला हत्येच्या आरोपात जन्मठेपेची शिक्षा झाली. संतापाच्या भरात झालेली चूक हितेशला चांगलीच महागात पडली होती. त्यानंतर आजन्म जन्मठेपेअंतर्गत नाशिक रोडच्या मध्यवर्ती कारागृहात साने गुरुजींच्या विचारांचा स्पर्श झाला आणि हितेशचं अवघे आयुष्यच बदलून गेले.

कारागृहात शिक्षा भोगत असतानाच त्याने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची बीए पदवी शिक्षण आणि नंतर एल.एल.बी. शिक्षण दोन्हीही कारागृहाच्या गजाआड राहून पूर्ण केले. चांगल्या वर्तणुकीमुळे त्याला २०११ मध्ये शिक्षेत सूट मिळाली. आता सध्या तो उच्च न्यायालयात वकिली करतोय. अग्नीच्या साक्षीने विवाहबंधनात अडकणारा हितेश आता आयुष्याची दुसरी इनिंग खेळायला सज्ज झाला आहे.

वकिलीचे शिक्षण घेताना म्युट कोर्टातच त्याने प्रॅक्टिस केली आणि जेलमधून बाहेर आल्यावर लगेचच वकिलीही सुरू केली. मात्र हत्येतील गुन्हेगार म्हणून सुरुवातीस त्याच्यावर कोणी विश्वास ठेवत नव्हते. कालांतराने नाशिकमधल्या काही सामाजिक संस्था संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला आणि हितेशला साथ दिली. आज तो मोठ्या आत्मविश्वासाने न्यायालयात फौजदारी वकिली करतोय. शिवाय मुक्त शिक्षणामुळे आपल्या जीवनाला वेगळी दिशा मिळाल्याचेही तो मोठ्या अभिमानाने सांगतोय.

जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर कारागृहात राहूनही आपलं जीवन फुलवण्याची किमया हितेशने केल्याने राज्याच्या विविध कारागृहांत शिक्षा भोगणाऱ्या इतर बंदिजनांनीही हितेश शहाचा आदर्श घ्यावा अशीच त्याची कामगिरी आहे. दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर काही साध्य करणे शक्य आहे मात्र त्यासाठी आवश्यकता आहे ती कष्टांची, जिद्दीची आणि चिकाटीची.

**गुन्हेगार मी कधी एकदा असेल केला गुन्हा**
**क्षमा करीबा समाजपुरुषा कुशीत घेई पुन्हा**

हितेश शहाची मनोकामना पूर्ण झाल्याचे वेगळे सांगायला नकोच.

**– संतोष साबळे**

# यशोगाथा

पंकज भदाणे

## इथे शिकलो सलून टेक्निक्स...

मी सन २००६ पासून नाशिकमधील नांदूर नाक्यावर माझ्या सलूनमध्ये व्यवसाय करीत आहे. सलून व्यवसायाचे प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण मी माझ्या मामांकडून घेतले कारण मी जरी नाभिक समाजातला असलो तरी माझे वडील शेतमजुरी करतात परंतु अल्पमजुरीत चार माणसांचे कुटुंब चालणे अशक्य होत असल्याने मी आमचा पारंपरिक व्यवसाय करण्याचे ठरविले.

मामांकडून शिक्षण घेतल्यानंतर मी एक टपरी टाकून व्यवसाय सुरू केला. काम शिकता शिकता शालेय शिक्षण करून मी दहावी इयत्तेपर्यंत शिकलो. तरीही म्हणावे असे उत्पन्न मिळत नसल्याने संसाराची दोन टोके जुळविणे कठीण जात होते.

असेच एकदा माझे मित्र श्री. संजय गायकवाड यांच्याकडून मला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत सलून व्यावसायिकांसाठी एक प्रशिक्षण कोर्स सुरू झाल्याचे कळले. त्याबाबत संपूर्ण माहिती घेऊन मी ॲडेलाईन इन्स्टिट्यूट, फावडे लेन, नाशिक येथे या कोर्ससाठी प्रवेश घेतला. सप्टेंबर २०१२ ते नोव्हेंबर २०१२ या तीन महिन्यांत मी प्रॅक्टिकलसह हा कोर्स पूर्ण केला.

ॲडेलाइन इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. विजय जाधव यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले. आधुनिक ट्रीटमेंट्स, अत्याधुनिक उपकरणे यांचा योग्य वापर करून सलूनमध्ये येणाऱ्यास उत्तम प्रतीची सेवा देणे मी त्यांच्याकडून शिकलो.

आधुनिक तरुणांना हवे असलेले हेअर कटस मी शिकलो. तरुणाचे पिंपल्स, ब्लॅक हेडस, डँड्रफ, चाई इत्यादी अनेक प्रॉब्लेमची कारणं व त्यावरील उपचारपद्धती मी शिकलो.

याव्यतिरिक्त सलून व्यावसायिकाने कसे राहावे, कसे वागावे, कसे बोलावे वगैरे व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रशिक्षण मला मिळाले. माझ्या गुणवत्तेत आपोआपच वाढ झाली. अजून मला खूप काही शिकायची इच्छा आहे.

मुक्त विद्यापीठाचे अधिकारी श्रीमान विवेक आहिरे साहेब यांनीही वेळोवेळी प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन मार्गदर्शन केल्यामुळे या व्यावसायिक प्रशिक्षणाचा आपल्या उन्नतीसाठी कसा उपयोग करून घ्यावयाचा याबाबत मार्गदर्शन केले. मोना आहिरे मॅडम यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभल्यामुळे लेडीज हेअर कटिंगबाबत प्रशिक्षण मिळाले.

या तीन महिन्यांच्या प्रशिक्षणाचा मला व्यवसाय सुधारण्यासाठी भरपूर मदत झाली. तसेच माझ्या आर्थिक उत्पन्नातही वाढ झाली आहे. एवढ्यावरच मी समाधान मानणार नसून मी सलून व्यवसायातील डिप्लोमा कोर्सला प्रवेश घेतला आहे. एक वर्षाचा हा प्रशिक्षण कोर्स पूर्ण करून मी अत्याधुनिक पार्लर सुरू करण्याची जिद्द बाळगून आहे.

नाभिक समाजाचे श्री. भगवानरावजी बिडवे यांच्या प्रोत्साहनामुळे मला हा प्रशिक्षण कोर्स करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. मन लावून आवडीने अभ्यास केल्यामुळे मी १५८ विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक गुण मिळवू शकलो. नाभिक समाजातील जास्तीत जास्त तरुणांनी ॲडेलाइन इन्स्टिट्यूट, नाशिक येथून प्रशिक्षण घेऊन मुक्त विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या या संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे मी त्यांना सांगू इच्छितो.

# यशोगाथा

कैलास जगताप

## पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड

माझे शालेय शिक्षण दहावीपर्यंत झालेले असून, मी आमचा पारंपरिक सलूनचा व्यवसाय न करता पानाची टपरी सुरू केली. परंतु त्यामुळे चांगल्या लोकांचा संपर्क तुटून व्यसनी व उडाणटप्पू मित्र जमा झाले. शेवटी मला त्र्यंबक येथे माझ्या मेहुण्यांकडे सलूनचे काम शिकण्यासाठी घरच्यांनी पाठविले.

त्र्यंबकला शिक्षण घेऊन आल्यावर मी माझ्या भावाच्या टपरीवर काम करण्यास नकार दिला व स्वतंत्र गाळ्यात काम सुरू केले परंतु आधुनिक तंत्रज्ञान नसल्यामुळे मी फारशी प्रगती करू शकलो नाही.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने सलून व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञान शिकविण्याच्या उद्देशाने प्रशिक्षण कोर्स सुरू केल्याचे वाचण्यात आले. त्यानुसार मी ॲडेलाइन इन्स्टिट्यूट, फावडे लेन, नाशिक येथे तीन महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला.

सप्टेंबर २०१२ ते नोव्हेंबर २०१२ या तीन महिन्यांत या संस्थेचे संचालक डॉ. विजय जाधव यांनी सलून व्यवसायासंबंधी उत्कृष्ट प्रशिक्षण दिले. सलून व्यावसायिकाचा व्यक्तिमत्त्व विकास, एटिकेट्स, शिस्तबद्धता, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा इत्यादी अनेक गोष्टी त्यांनी शिकविल्या.

आधुनिक हेअर कट्स, हेअर कलरिंग, पिंपल्स ट्रीटमेंट, फेअरनेस ट्रिटमेंट, केसांचे विकार व त्यावरील उपचार असे अनेक विषय शिकलो.

डॉ. विजय जाधव यांनी माझ्या सलूनला भेट देऊन मार्गदर्शन केले. मोफत सौंदर्य चिकित्सा शिबिर आयोजित करून मला या व्यवसायातील अनेक बाबींची माहिती दिली.

आता हे प्रशिक्षण पूर्ण केल्यामुळे माझ्या व्यवसायात आमूलाग्र बदल झाला आहे. मी गिरणारे येथे आधुनिक पार्लर सुरू केले असून, अपॉईंटमेंट घेऊन येणाऱ्यांना आधुनिक सेवा देतो.

माझ्या मनासारखा प्रशिक्षण कोर्स मिळाला. डॉ. विजय जाधव व श्री. विवेक अहिरे साहेब यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन मिळाल्यामुळे मी डिस्टिंक्शन मिळवून सर्व विद्यार्थ्यांमध्ये दुसरा क्रमांक मिळविला.

सलून व्यवसायात प्रगती करू इच्छिणाऱ्या तरुणांनी ॲडेलाईन इन्स्टिट्यूट, नाशिक येथून प्रशिक्षण अवश्य घ्यावे, असा सल्ला मी माझ्या अनुभवावरून देऊ इच्छितो.

# यशोगाथा



नंदू कोल्हाळकर

## सलून टेक्निशियन्ससाठी नवे पर्व

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य सार्थक ठरवीत विद्यापीठ नाभिक समाजापर्यंत पोचले. जग हे स्पर्धेच्या युगात असून, नवनवीन गोष्टी उदयास येत आहेत. हे ओळखून विद्यापीठाने सलून व्यावसायिकांना नवसंजीवनी दिली. याचे श्रेय विद्यापीठाचे कुलगुरू, त्यांचे सर्व सहकारी व नाभिक समाजाचे नेते श्री. भगवानराव बिडवे यांना जाते.

विद्यापीठाने सलून व्यावसायिकांना सर्टिफिकेट इन सलून टेक्निक सुरू केले व नाशिक रोडमध्ये यासाठी माझी निवड केली. खऱ्या अर्थाने मला हा सुखद धक्का होता. समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो ही भावना मनात होती. त्याबाबत कसोशीने प्रयत्न करताना मला विविध अडचणी आल्या. मात्र समाजातील व इतर मित्रांच्या मदतीने त्या अडचणी सोडवत आलो. विद्यापीठाशी पत्रव्यवहार पूर्ण झाल्यानंतर केंद्र सुरू करण्यासाठी विद्यार्थ्यांची आवश्यकता होती. यासाठी सहयोग सलूनचे सुटसुटीत व सोप्या भाषेत पत्रक तयार करून शहरासह ग्रामीण भागात ते पोचविण्याचे काम केले. विविध ठिकाणी नाभिक समाजातील व इतर तरुणांच्या बैठकी घेऊन या कोर्सचे व शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्यात सुशिक्षित बेरोजगार तरुणही बरेचसे होते. हे पटवून देताना विद्यापीठाचा चमूही माझ्याबरोबर होता. तसेच श्री. विवेक अहिरे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

पहिली बॅच २०१२ मध्ये सुरू केली आणि अनपेक्षित यश लाभले. सिन्नर या ग्रामीण भागातून जवळपास पंधरा, तर शहरातून वीस विद्यार्थी या कोर्ससाठी मिळाले. अभ्यासक्रम सुरू झाला. केंद्र सुरू झाले. त्या वेळी आनंद तर होताच पण भीतीनेही मनात घर केले होते. कारण आपल्या विश्वासावर विद्यार्थ्यांनी आपल्याकडे प्रवेश घेतला होता. आशाआकांक्षा घेऊन विद्यार्थी ठरलेल्या वेळी केंद्रात येत असत त्या वेळी विद्यापीठातील शिक्षक वेळोवेळी मार्गदर्शन करत होते. विद्यार्थ्यांच्या शंका-कुशंका सोडवत होते व आम्हालाही मार्गदर्शन करत असत. त्यामुळे भीतीही बरीचशी कमी झाली. नंतरच्या काळात विविध ठिकाणी सेमिनार घेण्यात आले. तसेच विद्यापीठातही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढलाच मात्र आपल्यालाही चांगली संधी मिळाल्याने कामाचा उत्साह वाढला. बॅच संपली पहिल्या बॅचचे संपूर्ण विद्यार्थी उत्तीर्ण झाले याचा विद्यार्थ्यांपेक्षा जास्त आनंद मी अनुभवला. कारण प्रत्येक विद्यार्थ्याने विद्यापीठाचे सर्टिफिकेट आपल्या शॉपमध्ये लावले व प्रत्येक जण आपापले अनुभव सांगत असे. आमचे स्टँडर्ड वाढले. आमच्या उत्पन्नात वाढ झाली इत्यादी...

समाधानाचा व आनंदाचा क्षण म्हणजे या बॅचचा एक विद्यार्थी सैन्य दलात या प्रमाणपत्रावर नियुक्त झाला याचे श्रेय केवळ मुक्त विद्यापीठाला जाते. कारण सुलभ अभ्यासप्रणाली, नवनवीन कार्य पद्धतीचा परिचय विद्यापीठाने आपल्या अभ्यास क्रमात केला आहे व त्याचा उपयोग कुशल सलून टेक्निशियन्स तयार व्हायला होतो आहे.

# यशोगाथा



डॉ. शेख बाबू

## ज्ञानगंगा उर्दू भाषिकांच्याही घरी


मुक्त विद्यापीठात पीएच डी करताना समस्या, समस्येची कारणे, समस्या निवारणासाठी उपाययोजना आणि शिफारशी या वैज्ञानिक संशोधनपद्धतीचे ज्ञान अवगत झाल्याने शिक्षकी पेशात अध्ययन, अध्यापन करताना विद्यालयात उद्‌भवणाऱ्या समस्यांकडे दुराग्रहाने न बघता निर्माण झालेल्या समस्येची वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडणी करून समस्येवरील उपाय शोधण्याची दृष्टी मुक्त विद्यापीठात पीएच.डी. करताना प्राप्त झाली. विद्यार्थ्यांनी उशिरा येणे, वर्गकाम किंवा गृहकार्य अपूर्ण राहणे, अभ्यासात रस न घेणे यांसारख्या दैनंदिन अध्यापनातील समस्या सोडविण्यासाठी नवीन दृष्टिकोन संशोधनातून मिळाला. वर्गात उद्‌भवलेल्या समस्येचे तत्काळ निरसन करण्याची दृष्टी संशोधनातून प्राप्त झाली.

पीएच.डी. पदवी मिळाल्याने समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले. पदवी प्राप्त केल्यानंतर शैक्षणिक क्षेत्रातील मानाच्या व महत्त्वाच्या पदांवर विराजमान होण्याची संधी मिळाली आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील खानदेश वस्तुसंग्रहालय व साने गुरूजी अध्यासन केंद्राच्या सल्लागार मंडळाचे सदस्यत्व मिळाले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय इतिहास व साहित्य परिषदांमध्ये शोधनिबंध सादर करण्याची संधी मिळाली. विद्यापीठीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाली. पेपर सेटर, पेपर तपासणी, अभ्यासक्रम निर्मिती, भाषांतरकार अशा विविध क्षेत्रांत काम करून मिळालेले अनुभव अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याची संधी विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. विद्यालयात आपल्या विद्यापीठाचे बी.ए. (उर्दू माध्यम) अभ्यासक्रमाचे अभ्यासकेंद्र सुरू केले. सदर अभ्यासकेंद्राच्या केंद्र संयोजक पदाची जबाबदारी संस्थेने देऊन सन्मानित केले. केंद्र संयोजकाच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित, दुर्लक्षित तरुण-तरुणी पुरुष व महिलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याची संधी मला मिळाली आहे.

आपले दैनंदिन कामकाज सांभाळून आपले ज्ञान वाढविण्याची संधी मुक्त विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. समाजास उपयुक्त आणि रोजगाराभिमुख अनेक अभ्यासक्रम विद्यापीठातर्फे राबविण्यात येत आहेत. या अभ्यासक्रमांमध्ये काळानुरूप व गरजेनुसार बदलही केले जातात ही लक्षणीय बाब आहे.

मागील काही वर्षांपासून विद्यापीठाने अल्पसंख्यांक उर्दू भाषिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरिता त्यांच्या मातृभाषेतून शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली आहे. मौलाना आझाद ओपन युनिव्हर्सिटीनंतर उर्दू भाषेतून पदवीचा अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारे हे देशातील पहिले मुक्त विद्यापीठ आहे. उर्दू भाषेतून पदवी संपादन करण्याची सोय उपलब्ध करून दिल्याने आज हजारोंच्या संख्येने उर्दू भाषिक विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत. शिक्षणापासून वंचितांसाठी त्यांच्या माध्यमातून शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध करून दिल्याने शिक्षणाची गंगा घरोघरी पोचली आणि 'ज्ञानगंगा घरोघरी' हे विद्यापीठाचे ब्रीद सफल झाले. रौप्यमहोत्सव वर्षानिमित्ताने विद्यापीठास हार्दिक शुभेच्छा!

# यशोगाथा



सुनील बत्तीसे

## चिरंतन ज्ञानाची साधना...

'एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना' या गीताने मी माझे दुःख विसरलो तशी माझी घटना २००६ सालची असून जिल्हा सत्र न्यायालय उस्मानाबाद यांनी जन्मठेपेची शिक्षा दिल्यानंतर मला दिनांक १४ जून २००६ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात आणले गेले. मी काही गुन्हेगार प्रवृत्तीचा नसल्यामुळे येथे आल्यावर भांबाऊन गेलो काय करावे कसे राहावे कसे बोलावे कसे वागावे असे अनेक प्रश्नांनी माझे मनही गांगारुन गेले एक तर मी अबोल त्यात जेलः.. परिस्थिती तर बिकटच होती पण नाईलाज होता हळु हळु येथील वातावराची माहिती झाली व स्वतःला त्या वातावरणाशी जुळवून घेतले नंतर काही समवयस्क व त्यातल्या त्यात चांगल्या असलेल्या बंध्यांशी वरकरणी तर ते चांगले दिसतात पण त्यांचे अंतरमन कोणी पाहिले पण शेवटी ओळख तर करावीच लागेल एकलकोंडे राहिले तर दिवस कसे जाणार बोलून चालून मोकळे राहिले पाहिजे तरच शिक्षा समजणार नाही नंतर हळू हळू जेलमध्ये कोणकोणते उपक्रम राबवले जातात याची माहिती घेतली तेव्हा कळाले की येथे वाचनालय आहे व शिक्षेतील बंध्यांना पुस्तके वाचावयास मिळतात मला हे समजल्याने खुप बरे वाटले इतर

मित्रांपेक्षा आपण पुस्तकांनाच मित्र करु या त्यात आपला चांगला वेळ जाईल व आपल्या ज्ञानात भरही पडेल असे म्हणून मी वाचनालयाचा सभासद झालो व मला आवडतील ती पुस्तके वाचनालयातून घेऊन वाचू लागलो. वेळ मिळेल तेव्हा वाचणे मी ज्या बॅरेक मध्ये होतो त्यात टी.व्ही. होता बातम्या व एखादी आवडती सिरियल पाहून मी रात्री ९.३० वाजता झोपत असे व पहाटे १.०० वाजता उठून पुस्तक वाचत असे व सकाळी ४ वाजता झोपत असे तर ओपनिंगलाच उठत असे नंतर मला कळाले की येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र आहे मी सर्व महिती मिळवली तेथील गुरुजींनी मला व्यवस्थित समजावून सांगितले व आपल्याला तर प्रवेश मिळेल याचा मला खूप आनंद झाला कारण आपले अपूर्ण शिक्षण पूर्ण करता येईल मला शिक्षणाची फार आवड शिक्षण घेऊन पूढे काही करता येईल बंधांना कुठलेही कागदपत्र सादर न करता पूर्व तयारीस प्रवेश मिळतो हे विद्यापीठाचे धोरण आमच्या दृष्टीने फारच तारक आहे शेवटी ज्ञान लालसेपोटी पूर्वतयारी अभ्यासक्रमात प्रवेश घेतला त्या वेळेस मी फक्त ९वी पास होतो माझे इंग्रजी थोडे साधारण होते म्हणून मी बाहेरुन प्रो. मा. का. देशपांडे यांचे 'हसत खेळत इंग्रजीङ्ग हे पुस्तक मागविले व माझे इंग्रजी चांगले करुन घेतले अडचण येऊ नये म्हणून डिक्शनरी ही मागवली नेहमीच्या वेळेत उठून पूर्वतयारीचा अभ्यास करु लागलो अपूर्ण शिक्षण पूर्ण होईल या आशेने अभ्यासात जिद्दिने लागलो हे मुक्त विद्यापीठाचे आमच्यावर उपकारच आहे. शिक्षण प्रणाली म्हटली तर सेल्फ स्टटी, प्रवेश घेतल्या नंतर पुस्तके मिळतात ती पुस्तके घेऊन आपणच अभ्यास करावा जेलमध्ये नावर्ग ना कोणी बाहेरचे शिकवायय येत असतात आपणच आपला अभ्यास करावयांचा काही अडल्यास गुरुजी मार्गदर्शन करुन शंकांचे निरसन करतात अशा प्रकारे मुक्त शिक्षणास आनंदाने सुरुवात करुन ध्येय गाठावयाचे ठरविले आहे. स्वयंशिक्षण प्रणाली असल्याने जो हार्ड वर्कर असेल तोच टिकणार म्हणून रात्री उठून अभ्यास केल्या शिवाय गत्यंतर नाही दिवसा तर शक्य नाही दिवसा अभ्यास वर्गाची सोय केली तर आहे, विद्यापीठाने जी पुस्तके तयार केलीत त्यासाठी त्यांनी शिक्षण तज्ञ व अनुभवी शिक्षण प्रेमीची मदत घेतलेली दिसते त्यामुळे पुस्तके फारच चांगली आहेत त्यात भरपूर ज्ञान आहे त्यामुळे ज्ञानात भरचपडून मनुष्य नक्कीच शहाणा होतो हाच मोठा फायदा आहे पदवी मिळते ती वेगळीः जीवनात बदल म्हणजे मी तर सध्या जेल मध्येच आहे पूर्वतयारी ते बी.ए. पर्यंतची पुस्तके वाचून ज्ञानात भर तर पडलीच व पदवी हाताशी असल्याने आपण चांगल्या प्रकारे जीवन जगू शकू असा आत्मविश्वास निर्माण झाला, एखादी नोकरी मिळाली तर ठीकच, काही तरी व्यवसाय करुन उरलेले आयुष्य चांगले प्रकारे घालवता येईल हे तितकेच खरे कारण मी काही मूळात गुन्हेगार नाही अघटित घटनेमुळे आलो पण यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या या योजनेमुळे फायदा झाला कारागृहातील जीवनात दाखल होणेपूर्वी लॉंड्री व्यवसायाच्या साहयाने कुटुंबातील कर्ता या नात्याने वडिलाच्या पश्चात सर्व जबाबदारी सांभाळतांना शिक्षणाचे राहिलेले

स्वप्न आता प्रत्यक्षात येण्यास मदत झाल्याने कारागृहातून मुक्त झाल्यावर भविष्यासंबंधी भेडसवणाची चिंता आता सुखद झाली असून मुक्ततेनंतर निश्चितच स्वयंरोजगार प्राप्त झाल्याने पुढील आव्हाने पेलण्याची माझ्या पंखात मोठी भरारी

घेण्याची क्षमता माझ्यात निर्माण झाली आहे माझ्याप्रमाणे अनेक बंदीबांधव यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या या सुविधेचा लाभ घेऊन स्वत:चे, समाजातील स्थान उंचावण्यास व ताठ मानेने जगण्यास तयार होत आहेत. पुढे मनात तर तीच गोष्ट आहे कारण पुढेचे शिक्षण स्वखर्चाने करावयाचे आहे एक तर एल.एल.बी. करावयाचा विचार आहे कारण येथे बरेच ज्ञान मिळते व अनुभव हाच खरा शिक्षक आहे त्यामुळे बरेच काही शिकावयास मिळते किंवा कॉम्प्युटरचे शिक्षण घेऊन एक तर स्वत:चा व्यवसाय किंवा नोकरी शासनाने नोकरीत बंद्यांना काही जागा ठेवल्यास फारच चांगले होईल नाहीतरी शासनाचे 'सुधारणा व पुनर्वसन' हे ब्रीद वाक्य आहेच येथून सुधारण तर झाली पण पुढे पुनर्वसनाचे काय ? या बाबतीत

शासनाने सहानुभूतीपूर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार करावा शिक्षण घेत असतांना बंद्यांना प्रवेश व पुस्तके विनामुल्य आहेत तसेच वाचनालयाची पुस्तके विना मोबदला आहे रात्री लाईटची व्यवस्था आहे व इच्छा असेल त्याला शिक्षण बाकी जेलच्या सुविधा तर आहेतच विद्यापीठाचे केंद्र असल्याने व जेल प्रशासनाचे सौजन्य अशा दुहेरी सहकार्याने बंदी शिकत आहे व २०१३ पर्यंत ५१ बंदी पदवीधर झालेत व होत आहेत ही आमच्या दृष्टीने फार मोठी संधी आहे व त्यासंधीचा होतकरु

बंदी फायदा घेत आहे शासनच तर आमचे मायबाप आहेत !

# यशोगाथा



दत्ता तोटेवाड

## शिक्षणसेवक ते पोलिस उपअधीक्षक : एक यशस्वी प्रवास

अभ्यासात सातत्य, कठोर परिश्रम आणि प्रतिकूल परिस्थिती यावर मात करून शेतमजुराचा मुलगा आज पोलिस उपअधीक्षक झाला आहे. शिक्षणसेवक ते पोलिस उपअधीक्षक असा यशस्वी प्रवास ग्रामीण भागातील ज्या तरुणाने केलाय त्या तरुणाचे नाव आहे दत्ता लक्ष्मणराव तोटेवाड. विशेष म्हणजे तोटेवाड यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून पदवी संपादन करून कोणत्याही प्रकारची खासगी शिकवणी न लावता केवळ स्वयंअध्ययनावर भर देऊन यश मिळविले आहे.

अर्धापूर तालुक्यातील लहान येथे तोटेवाड कुटुंबीय शेतमजुरी व दुधाचा व्यवसाय करून जीवन चरितार्थ चालवतात. लक्ष्मण तोटेवाड यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये आहेत. घरच्या जेमतेम आर्थिक परिस्थितीमुळे दोघांचेही शिक्षण अर्धवटच राहिले. यामुळे किमान आपल्या दत्ता या मुलाचे तरी शिक्षण पूर्ण व्हावे, अशी लक्ष्मण तोटेवाड यांची इच्छा होती. दैनंदिन खर्च कमी करून, लक्ष्मण तोटेवाड यांनी मुलाच्या शिक्षणासाठी पैसा खर्च केला. तोटेवाड यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण लहान येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत झाले. त्यांना दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळाले व तालुक्यातून ते प्रथम आले. दहावीनंतर शिरूर येथे बाराबीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. बारावीतही चांगले गुण मिळाले. त्यांचे मित्र अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षणाकडे वळले; पण त्यांना आर्थिक परिस्थितीमुळे या शाखांकडे जाता आले नाही. कुटुंबाला आर्थिक मदत होईल व आपल्यालाही आपल्या पायावर उभे राहता येईल, असा अभ्यासक्रम निवडण्याला त्यांनी प्राधान्य दिले. बराच विचार करून अखेर त्यांनी डी.एड.ला प्रवेश घेण्याचे ठरविले. त्यांची डी.एड.साठी निवड झाली. येथेही त्यांनी नैपुण्य मिळविले आणि तब्बल ७८ टक्के गुण घेऊन ते प्रथम आले.

तोटेवाड यांना लहानपणापासुनच अधिकारी होण्याची इच्छा होती. डी. एड. झाल्यावरही त्यांनी अभ्यासात सातत्य ठेवले. नंतर शिक्षणसेवकपदासाठी अर्ज भरला. खुल्या प्रवर्गातून त्यांनी शिक्षणसेवकपदासाठी निवड झाली. भोकर तालुक्यातील मांगदरी येथे त्यांची नियुक्ती झाली. तेथे त्यांनी मुख्याध्यापक म्हणूनही काम केले. अध्यापन करीत असतानाच अध्ययनही सुरूच होते. त्यानंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बी.ए. चे पदवी शिक्षण पूर्ण करता-करता त्यांनी एमपीएससीच्या अभ्यासाला सुरूवात केली. तीन वर्षे मुख्य परीक्षेचा अभ्यास केला आणि तिसऱ्या वर्षी पूर्व परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात केली. आयोगातर्फे २००९ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत सहाय्यक संचालक म्हणून त्यांची निवड झाली.

दरम्यानच्या काळात मूळ पदावर रुजू झाले. नंतर २०१० मध्ये मुख्य परीक्षेसाठी पुण्यात पेपर चालू असताना २००९ चा निकाल हाती आलेला आणि त्यांची सहाय्यक संचालक म्हणून निवड झाली. यानंतर २०१० चे पेपर दिले. डी.वाय.एस.पी. होण्याचे स्वप्न त्यांना शांत बसू देत नव्हते. अखेर २०१० च्या परीक्षेचा निकाल लागला. त्यातही बाजी मारली. अवघ्या चार जागा असल्याने प्रथम प्राधान्य डी.वाय.एस.पी. पदाला देऊन अखेर यश मिळविले.

कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेत सहज यश मिळविता येते. यूपीएससी आणि एमपीएससीच्या परीक्षांमध्ये यश मिळवणं सोपं नाही, पण वाटते तितके कठीणही नाही. निश्चित ध्येय, अपार कष्ट करण्याची तयारी, आत्मविश्वास, स्वयंअध्ययन, ग्रुप चर्चा, एकाग्रपणे आणि चिकाटीने अभ्यास करण्याची वृत्ती यामुळे निश्चितच या परीक्षांत यश मिळते हेच तोटेवाड यांनी दाखवून दिले आहे. दत्ता तोटेवाड यांच्या जिद्दी वृत्तीला सलाम...!

– संतोष साबळे

**'नोकरीसाठी मला रोज दोन कि. मी. पायी जावे लागत असे. तीन वर्षांत एकाही उन्हाळ्यात मी घरी गेलो नाही. या कष्टाचं फळ म्हणजे पहिल्या प्रयत्नात माझे क्लास वन ऑफिसर म्हणून सिलेक्शन झाले आणि दुसऱ्या प्रयत्नात मी महाराष्ट्रात एमपीएससीमध्ये डी.वाय.एस.पी. पदासाठी चौथ्या क्रमांकावर सिलेक्ट झालो. योग्य दिशेने केलेले प्रयत्न हे यशाच्या खूप जवळ घेऊन जातात.'**

**– दत्ता तोटेवाड**

# यशोगाथा



ईश्वर कातकाडे

## 'मुक्त' शिक्षणाचा ज्ञानदीप...

**(राज्यसेवा मुख्य परीक्षा - २०१० राज्यात प्रथम)**

मी ईश्वर मोहन कातकडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या शेवगाव केंद्रातून २००८ साली इतिहास विषयात कला शाखेची पदवी उत्तीर्ण केली. प्रथम मनात थोडीशी भीती होती, आपल्याला एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी. स्पर्धा परीक्षेची तयारी करायची. या स्पर्धांना या विद्यापीठाची पदवी ग्राह्य धरतात की नाही? प्रथम आयोगाकडून खात्री केली व स्पर्धा परीक्षेची तयारी सरू केली. मी ग्रामीण भागातील नगर जिल्ह्यातील शेवगावमधील ठा. निमगावचा आहे. बारावीनंतर डी.एड. केले (२००६) व शेवगावला मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतला. खरंतर या विद्यापीठाची मुक्त शिक्षणप्रणाली विद्यार्थ्यांना खूपच फायद्याची ठरली. सर्व विषयांची पुस्तके घरपोच पोस्टाने मिळाली. मुक्त विद्यापीठाला दाखला (शाळा सोडल्याचा) याची गरज नसते. तसेच पदवीला प्रवेश घेतल्यावर कॉलेजला जाण्याची गरज नसते. यामुळे या विद्यापीठाचा लाभ महाराष्ट्रातून ज्यांना नियमितपणे कॉलेजला जाता आले नाही ते सर्व जण घेत आहेत.

२००८ मध्ये इतिहास विषय घेऊन ७६.२५% मिळवून पदवी घेतली. त्यानंतर २००९ मध्ये राज्यसेवा मुख्य परीक्षा दिली. या परीक्षेत माझी निवड झाली परंतु पद मिळो नाही. त्यानंतर २०१० मध्ये पुन्हा परीक्षा देऊन महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवून माझी पोलिस उपअधीकपदी निवड झाली.

मित्रांनो, तुम्ही मुक्त विद्यापीठातून अभ्यासक्रम पूर्ण करून तुमचे करिअर करू शकता. त्यासाठी स्वत:शी प्रामाणिक राहून अभ्यास केल्यास यश निश्चित मिळेल. सर्वांना आय.ए.एस. होण्यासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा!

''मी बारावी पास झाल्यावर डी. एड. केले आणि प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीला लागलो. त्यावेळी माझ्याच एका सहकारी शिक्षकांचे एम.पी.एस.सी. परीक्षेत सहाय्यक निबंधक म्हणून सिलेक्शन झाले होते. त्यांच्यामुळे एम.पी.एस.सी. परीक्षेबद्दल माहिती मिळाली आणि आपणही ही परीक्षा द्यावी असे मला वाटू लागले. त्याप्रमाणे मी अभ्यास सुरू केला. त्यासाठी आधी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बी.ए. केले.''

# यशोगाथा




## कौस्तुभ दिवेगावकर

## कष्टाविना फळ ना मिळते

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी फक्त पदवी घेऊन बाहेर पडत नाही तर विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या दर्जेदार अध्ययन साहित्याचा संदर्भ साहित्य म्हणून उपयोग करून विविध स्पर्धा परीक्षांमध्येही आघाडीवर आहेत. यात केंद्रीय लोकसेवा आयोग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षांमध्यैही या विद्यापीठाचे विद्यार्थी अग्रभागी आहेत.



मे २०१३ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वतीने भारतीय प्रशासकीय सेवा **(IAS)** या अधिकारी पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत लातूरचा कौस्तुभ दिवेगावकर देशात पंधरावा व राज्यात प्रथम आला. त्याच्या यशस्वी कारकिर्दीविषयी त्याची नीरज पंडित ह्यांनी घेतलेली मुलाखत महाराष्ट्र टाईम्सच्या सौजन्याने पुर्प्रकाशित करीत आहोत. ती ह्या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांना निश्चित मार्गदर्शक ठरेल.

**यूपीएससी करून प्रशासकीय सेवेत जाण्याचा निर्णय कधी घेतला?**

जेव्हा मी कॉलेजला शेवटच्या वर्षात होतो तेव्हा मी प्रशासकीय सेवेत करिअर करण्याचा निर्णय घेतला. त्यात जर अपयश आलेच तर शिक्षक होण्याचे ठरविले होते. टीवायचा अभ्यास करताना मला समाजातील अनेक समस्यांचे आकलन झाले. या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आपण केवळ समस्या जाणून घेऊन उपयोग नाही तर आपण यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न कसा करणार तर यासाठी प्रशासकीय सेवेत राहून चांगले प्रशासन करणे हा मार्ग मला योग्य वाटला. या उद्देशाने मी याक्षेत्राकडे वळलो.

**यूपीएससीमध्ये इतके चांगले यश मिळेल असे वाटले होते का?**

यूपीएससीमध्ये कोणत्याही प्रकारची अपेक्षा करणे खरे तर चुकीचे आहे. या आधीच्या अटेम्प्टमध्ये मी मुलाखतीपर्यंत जाऊन आलो होतो. मात्र त्यात अपयश आले. पण आत्ताच्या प्रयत्नात यशस्वी होईन असा विश्वास मात्र होता.

**तू मराठी विषय आणि मराठी माध्यम घेतले होते. याचा फादा झाला असे तुला वाटते का?**

मराठी विषय आणि मराठी माध्यम या दोन्ही गोष्टी फार वेगळ्या आहेत. प्रथम आपण माध्यमाबाबत बोलूया. मराठी माध्यम घेतले याचे कारण म्हणजे माझे सर्व शिक्षण मराठीत झाले आहे. आपल्याला जी भाषा चांगली येते त्या भाषेतून परीक्षा देणे हे केव्हाही चांगले असते. आपली विचार

> **''केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम उपयुक्त ठरल्यामुळे माझ्या यशात मुक्त विद्यापीठाचा बहुमोल वाटा आहे. या विद्यापीठाचा पदवी अभ्यासक्रम चांगला असल्याने बी.ए.साठी याच विद्यापीठाची निवड केली. शिवाय येथील अभ्यासक्रम यूपीएससीशी सुसंगत असल्याचे दिसून आले. दूरशिक्षण पद्धतीमुळे मुक्त विद्यापीठात शिक्षण घेताना यूपीएससी परीक्षेचा अभ्यास करणेही शक्य झाले.''**
>
> **– कौस्तुभ दिवेगावकर**
> **यूपीएससी परीक्षेत राज्यात प्रथम, देशात १५ वा**

करण्याची भाषा मराठी असेल तर मराठीतून परीक्षा देण्यास काहीच हरकत नाही. यामुळे मराठी भाषा निवडणे हा मराठी मुलांसाठी खूप महत्त्वाचा फॅक्टर ठरू शकतो. आता मराठी वाङ्मय या विषयाबद्दल बोलायचे झाले तर हा विषय किंवा कोणताही विषय निवडताना आपण काळजीपूर्वक निवड केली पाहिजे. याचे कारण म्हणजे यातील सखोल प्रश्न परीक्षेत विचारली जातात. हे प्रश्न विद्यापीठ पातळीवरचे नसतात. यामुळे त्या विषयाचा सखोल अभ्यास असेल तरच आपण त्या विषयाची निवड करावी.

**मराठीत अभ्यासासाठी पुस्तके उपलब्ध नाहीत असे म्हटले जाते. तुला याबाबत काही अडचण जाणवली का?**

सध्या यूपीएससीच्या अभ्यासाची मराठीतील खूपसारी पुस्तके उपलब्ध आहेत. याचबरोबर काही विषयांचा इंग्रजीतून अभ्यास केला तरी आपण ते विषय मराठीत लिहू शकतो. माझे संपूर्ण शिक्षण मराठीतून झालेले असले तरी मीही काही विषयांचा अभ्यास हा इंग्रजीतून केला. सुरुवातीला मला जड गेले, मात्र नंतर ते मला सोयीचे झाले. यामुळे विद्यार्थ्यांनी मराठी पुस्तके नाहीत म्हणून मराठी माध्यम निवडले नाही असे म्हणू नये.

**यूपीएससीमध्ये मार्क्स मिळवणे सोपे जावे म्हणून अनेक उमेदवार काही विशिष्ट विषयांना पसंती देतात. जसे की, अनेक जण पाली साहित्य हा विषय घेतात. याबाबत तू काय सांगशील?**

यूपीएससीमध्ये कोणताही विषय हा स्कोअरिंग नसतो. एखाद्या वर्षी एखादा विषय घेतलेल्या विद्यार्थ्याला यश मिळाले तर बऱ्याचदा दुसऱ्या वर्षी त्याच विषयाची बरेच जण निवड करतात. पण तसे करायची गरज नसते. आपल्याला जो विषय नीट येतो तोच विषय निवडावा. आपल्या उत्तरामधून आपले ज्ञान, आपली बुद्धिमत्ता परीक्षकाला कळत असते. त्या विषयात आपण स्वत:चा किती विचार केला आहे हे दिसणेही महत्त्वाचे असते. एखादा सामाजिक मुद्दा असेल तर त्याचा सखोल अभ्यास आपण केला पाहिजे. मी जेव्हा ही परीक्षा दिली तेव्हा विविध सामाजिक विषयांचा अभ्यास केला होता. याचा फायदा पेपर लिहिताना झालाच तसेच मुलाखतीच्या दरम्यानही झाला. यंदा महाराष्ट्रातील बहुतांश मुलांना दुष्काळ, स्त्रीशक्ती आणि शिक्षण क्षेत्रातील 'असर'चा अहवाल यावर बहुतांश प्रश्न विचारण्यात आले. मी पण अभ्यासासाठी स्त्रीवादाचा विषय आवडतो असे सांगितल्यावर मला त्याचसंदर्भातील प्रश्न विचारण्यात आले. मी दुष्काळाचा अभ्यास करण्यासाठी अनेकांशी चर्चा केली होती, महाराष्ट्रातील दुष्काळी भागांवर विशेष लक्ष दिले होते, याचा फायदा मला नक्कीच झाला. यामुळे उमेदवारांनी केवळ पुस्तकी ज्ञान न मिळवता सामाजिक घटनांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन तयार करून त्यावरून अभ्यास केला पाहिजे.

**नवीन पॅटर्नवर सध्या बरीच चर्चा होत आहे, याबाबत तुला काय वाटते.**

यूपीएससी आता मल्टिटास्किंग होऊ लागले आहे. आता एका प्रशासकीय अधिकाऱ्याला सर्व क्षेत्रातील माहिती असणे आवश्यक आहे. मग ते इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, विज्ञान तंत्रज्ञान असे कोणतेही विषय असोत.सर्वांचे प्राथमिक ज्ञान असणे गरजेचे आहे. यामुळे एक गाइड वापरून आपल्याला अभ्यास करता येणार नाही. नव्या पॅटर्ननुसार आपण अधिक सक्षम अधिकारी कसे मिळवू शकू असा प्रयत्न यूपीएससीमार्फत करण्यात आला आहे. ऑप्शनल विषयांमध्ये नुकसान झाले असे म्हटले जाते. पण निबंधाच्या बाबतीत बोलायचे झाले तर त्यात येणाऱ्या पर्यायांमध्ये आपल्याला विविध विषयांचे पर्याय असतात. यात आपल्या आवडीचेही काही पर्याय असतात. या सर्वांचा विचार करून आपण नव्या पॅटर्नकडे पाहिले पाहिजे.

**नवीन पॅटर्नमध्ये नीतिमूल्यांना विशेष मार्क्स देण्यात आले आहेत. याबाबत तुला काय वाटते.**

अधिकारी चांगली मूल्ये असलेला असावा हे खरेच आहे. यामुळे यूपीएससीने हा बदल केला आहे. यामुळे सरकार प्रशासनाला मानवी चेहरा देण्याचा प्रयत्न करत आहे. मूल्यांमुळे व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास होणार आहे. यामुळे प्रामाणिकपणे काम करणारी प्रशासकीय पिढी तयार करणे हे यूपीएससीचे ध्येय असेल.

**या परीक्षेत मराठी मुलांचे प्रमाण कमी जाणवते, आपण नेमके कुठे कमी पडतो.**

मराठी मुलांचे प्रमाण कमी आहे असे मला वाटत नाही. उलट ते वाढत आहे. पण पहिल्या २००-३०० मध्ये हे प्रमाण नक्कीच कमी आहे. ते वाढण्याची खरोखरच गरज आहे. मराठी मुले अनेकदा करिअरची निवड करताना खूप गोंधळलेले असतात. एकदा का आपण प्रशासकीय सेवेत करिअर करण्याचा निर्णय घेतला तर पुन्हा दुसरीकडे वळून पाहूच नये. तसे झाले तरच आपली मुले यात यश मिळवू शकतील. यश मिळवण्यासाठी प्रचंड चिकाटीची गरज लागते. यात आणखी एक बाब लक्षात येते ती म्हणजे मुंबई, पुणे, नाशिक या भागात ज्या प्रमाणात मार्गदर्शन मिळते त्या प्रमाणात ग्रामीण महाराष्ट्रात ते मिळत नाही. हे प्रशिक्षण त्या भागात मिळणे, तेथे जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. याकडे करिअर म्हणून पाहता येईल अशी परिस्थिती निर्माण करण्यात आपण यश मिळवले तर मराठी मुलांचे प्रमाण नक्कीच वाढेल. याचबरोबर विद्यार्थ्यांना अनेकदा शाळेची पुस्तके वाचण्यास कंटाळा येतो. पण यूपीएससीची तयारी करण्यासाठी शाळांचे पुस्तके वाचणे खरोखरच गरजेचे आहे. यामध्ये आपला पाया अधिक चांगला होतो. शाळेत शिकत असताना आपण त्या वयानुसार विचार करतो पण आता वयानुरूप आपला त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो आणि तो अभ्यास आपल्याला खूप काही चांगली माहिती देऊन जातो. मी माझी तयारी करत असताना एनसीईआरटीची पुस्तके आवर्जून वाचली होती.

**तुला चांगले यश मिळाले, यापुढचे प्रशासकीय सेवेतील तुझे ध्येय काय असेल.**

आपल्याला जे काही काम मिळेल ते संविधानाच्या चौकटीत राहून प्रामाणिकपणे करणे हे माझे मुख्य ध्येय असेल. याबरोबर लोकाभिमुख प्रशासन तयार करण्यासाठी मी विशेष प्रयत्न करीन.

**– नीरज पंडित**

**दैनिक महाराष्ट्र टाइम्सच्या सौजन्याने**

# यशोगाथा

## कॅप्टन डॉ. राजेंद्र सनेर

## शिक्षणाचा महामार्ग

नियतीने आखून दिलेल्या वाटेने सर्वांचीच वाटचाल सुरु असते. पण ह्या वाटचालीत ''आयुष्याचा महामार्ग'' सापडणारे भाग्यवान फार थोडे असतात, मी त्यातला एक आहे.

नाशिकच्या भोसला मिलीटरी स्कूलमध्ये माझे शालेय शिक्षण झाले. त्यानंतर कृषी महाविद्यालय, धुळे आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे महाविद्यालयीन शिक्षण मी पूर्ण केले.

१९८४ साली एम.पी.एस.सी. व यू.पी.एस.सी दोन्ही परीक्षा दिल्या. त्यात माझे सिलेक्शन झाले.

नंतर कंबाईन डिफेन्स सर्व्हिसेस परीक्षा देऊन आर्मीत सेवाकोर मध्ये भांडार व परीवहन खात्यात पाच वर्षे सेवा केली. ह्या अनुभवाच्या पाठबळावर महाराष्ट्र शासनाच्या परीवहन खात्यात विभागीय नियंत्रक म्हणून रुजू झालो. नांदेड, नगर, औरंगाबाद, पिंपरी चिंचवड, नाशिक असा नोकरीचा प्रवास सुरू होता.

नाशिकच्या सिंहस्थाचे नियोजन व ऑपरेशन यशस्वीरीत्या पूर्ण केले. कदाचित त्यामुळेच प्रादेशिक व्यवस्थापक म्हणून मला पदोन्नती मिळाली.

एकंदरीत माझा कामाचा झपाटा व कौशल्य बघुन महाराष्ट्ऽ शासनाने माझी उद्योग खात्यात उपमुख्य अधिकारी म्हणून प्रती नियुक्ती केली. त्यानंतर आणखी एक सन्मानाचा तुरा शासनाने माझ्या शिरी खोवला तो म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या परीवहन खात्याचा महाव्यवस्थापक म्हणून माझी नियुक्ती झाली.

उच्च विद्याभूषीत व्हावं ही माझी पहिल्यापासूनच धारणा होती. त्यामुळेच मी सतत शिकत राहिलो. परीक्षा देत राहिलो. आता माझे स्वप्न होते डॉक्टरेट करायचे आणि मी त्या तयारीला लागलो.

मी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात "A Comparative study of accident roneness and it's relationship with occupational stress and job satisfaction among state transport divers." या विषयावर संशोधन अभ्यासक्रम पूर्ण केला. राज्य परीवहन विभागात कार्यरत असल्यामुळे दौऱ्यावर असताना अधिकारी पर्यवेक्षकीय अधिकारी यांच्या बैठकीत्त अपघात टाळण्याकरिता स्वत:ला लावावयाच्या सवयी, ह्या मी काळजी या संदर्भातील सुचना देण्यासाठी संशोधनाचा उत्तम उपयोग होतो. तसेच 'अपघात' हा समाजाच्या दृष्टिने अत्यंत संवेदनशील विषय असुन त्यासंदर्भात जागरुकता वाढविण्याचा प्रयत्न करता झाला तो संशोाधनाच्या सखोल अभ्यासामुळेच. यशवंतराव चव्हाण विद्यापीठामुळे महत्त्वाच्या पदावर कार्यरत असताना सुद्धा संशोधन करण्याची संधी मिळाली म्हणून विद्यापीठाच्या मोलाच्या मार्गदर्शनाला विनम्र अभिवादन!

# यशोगाथा



## प्रवीण चव्हाण


# संघर्षाला यशाची किनार

मुलांच्या शिक्षणाच्या वयात पतीचे दुर्देवी निधन झाल्याने आभाळ कोसळले. अशा परिस्थितीत मोठ्या असलेल्या प्रविणच्या मदतीने कुटुंब कसेबसे सावरले. प्रविण मोठा व्हावा शिकावा हेच माझे स्वप्न होते ते पुर्ण करण्यासाठी त्याने कसेबसे शिक्षण घेतले. त्याच्या मेहनतीला आता फळ आले आहे. पण त्यानंतर स्वतःमध्येच गुरफटुन न जाता समाज आणि देशासाठी काम करावे, असे मी त्याला सांगितले आहे.... अशा शब्दांत यूपीएससीत देशात ८१५ वी रँक मिळवणाऱ्या मेहुणबारे येथील प्रवीण चव्हाण यांच्या आई वैशाली चव्हाण यांनी आपल्या भावना बोलताना व्यक्त केल्या.

**संघर्षाची कहाणी त्यांच्याच शब्दांत....**

पतीचे निधनानंतर मुलांचे शिक्षणाची जबाबदारी माझ्यावर आली. प्रवीण डॉक्टर, इंजिनिअर व्हावा, असे स्वप्न बाळगून मी त्याला पाठबळ दिले. बारावीत विज्ञानानत ९० टक्के गुण मिळाले; तो कमावता व्हावा म्हणून डीएड करून शिक्षक झाला.

प्रवीणने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केले. माझे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याने दिवसरात्र अभ्यास केला. खासगी शिकवणीही घेतली. दागिने, चांगले कपडे या गोष्टींच्या मोहात न पडता मुलांच्या शिक्षणासाठी पैसे लावले. लाईट नसल्याने कंदील लावून मी त्याच्यासोबत बसायचे. त्यातून मार्ग शोधत त्याने काही काळ पुणे आणि मुंबईतील संस्थांमध्ये अभ्यास केला. यश मिळवून तो अधिकारी झाला तेव्हा माझा आनंद गगनात मावेनासा झाला.



अमृताच्या प्राप्तीसाठी देवांनी समुद्रमंथन केले, पण त्या समुद्रमंथनातून जे अमृत निघाले ते देव प्राशन करून बसले. आता आमच्यासाठी अमृतच शिल्लक राहिलेले नाही. म्हणून आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हांला समर्थ बनावयाचे आहे. समाज जीवन समर्थ बनवावयाचेआहे.

– यशवंतराव चव्हाण


**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२ महाराष्ट्र (भारत)

फोन : ०२५३–२२३१७१४/१५/, २२३०२२७/२८ फॅक्स : ०२५३– २२३०४७०

वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac, http://www.ycmou.ac.in